24-03-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SGJ/ 11:00

24-03-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) A-1

SGJ/ SBT/ MAP/ 11:00

सभापतीस्थानी माननीय उपसभापती

पृ.शी./मु.शी.:तोंडी उत्तरे.

सेझसाठी ५० हजार एकर जमिनीची आवश्यकता

(१) * २४३९२ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री.भास्कर जाधव , प्रा. फौजीया खान , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. दिवाकर रावते , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. अरविंद सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनिल परब , डॉ. दिपक सावंत , श्री.परशुराम उपरकर , श्री. प्रकाश शेंडगे , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री.सय्यद जामा , श्री.कपिल पाटील , प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. लक्ष्मण जगताप : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ७२ सेझ प्रकल्पांसाठी ५०,००० एकर जमिनीची आवश्यकता असून कोकणात २००२ सालात विशेष आर्थिक क्षेत्र जाहिर झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांकरीता शेतकऱ्यांकडील जमीन संपादन करुन त्यांचे मुल्य बाजारभावाप्रमाणे ठरविल्याबाबत व प्रकल्पांमुळे विस्थापित होणाऱ्या कुटुंबाच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, सदर ७२ प्रकल्पांची माहिती देण्यात यावी,

(३) महाराष्ट्रातील विशेष आर्थिक क्षेत्रासाठी नोडल एजन्सी म्हणून राज्य औद्योगिक विकास महामंडळ काम करणार आहे वा इतर विकासक म्हणून कोणास नेमण्यात येणार आहे, तसेच सदर सेझ प्रकल्पाकरीता शासनाकडून कोणती कारवाई करण्यात येत आहे,

(४) सदर प्रकल्पाच्या विरोधात एस.ई.झेड विरोधी कृती समिती व विविध राजकीय पक्षांनी आंदोलने केली आहेत काय, असल्यास, त्यांच्या मागण्यांचे स्वरुप व याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री.अशोक चव्हाण : (१) नाही. राज्यातील विविध विभागामध्ये ७२ सेझ प्रकल्पासाठी अंदाजे ३८८०० हेक्टर क्षेत्र विकसित करण्यात येणार आहे व त्यापैकी कोकणात ३३ विशेष आर्थिक क्षेत्र स्थापण्यास मान्यता (तत्त्वत:/अंतिम) मिळाली आहे.

(२) व (३) ७२ सेझ प्रकल्पांपैकी एकूण ४५ विशेष आर्थिक क्षेत्र ही खाजगी विकासकाकडून त्यांच्या मालकीच्या जमिनीवर विकसीत करण्यात येत आहेत. या जमिनी संदर्भात भूसंपादन किंवा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन हा मुद्दा उपस्थित होत नाही. या व्यतिरिक्त १९ विशेष आर्थिक क्षेत्र ही शासनाच्या उपक्रम (एमआयडीसी/एमअेडीसी) यांच्या मार्फत विकसीत करण्यात येत आहेत. त्यापैकी १८ एसइझेड हे एमआयडीसीने एमआयडी ॲक्ट अंतर्गत संपादित केलेल्या जमिनीवर विकसीत करण्यात येत आहेत. एम.आय.डी.सी. ने त्यांच्या प्रस्तावित धोरणानुसार या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कार्यवाही केलेली आहे. एमआयडीसीतर्फे नागपूर येथे विकसीत होणाऱ्या विशेष आर्थिक क्षेत्रासाठी राज्य शासनाने भूसंपादन कायदा १८९४ या अंतर्गत भूसंपादनाची कार्यवाही करण्यात आली आहे. एमआयडीसीच्या मदतीने खाजगी विकासकांसाठी भूसंपादनाची कार्यवाही करुन विकसीत होत असलेल्या एसइझेडची संख्या ही ६ असून या विशेष आर्थिक क्षेत्रासाठी एमआयडीसी ही त्यांच्या भूसंपादनाच्या प्रचलित पद्धतीनुसार कार्यवाही करणार आहे. त्यामुळे गावठाणे व बागायती जमिनी या भूसंपादनामधून वगळण्यात येतील. तसेच, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची जबाबदारीही एमआयडीसी घेणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाच्या मदतीने एका खाजगी एसइझेडच्या विकासकासाठी भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येत असून सदर प्रकल्पास महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तिचे पुनर्वसन अधिनियम १९९९ या कायद्याखाली कलम ११ (एक) खालील अधिसूचना काढली आहे व सदर प्रकल्प पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १ (४) (क) नुसार अधिसूचित केलेला आहे. तसेच, शासनाने प्रकल्पबाधितांचे पुनर्वसनाचे संदर्भात कंपनीबरोबर सामंजस्य करार दिनांक १५ मे, २००६ रोजी केला आहे. त्यानुसार कंपनीने शासन निर्देशित करेल तो खर्च व सोयी (पॅकेज) देण्याचे मान्य केले आहे.

(४) होय. ज्या सात प्रकल्पांसाठी शासनातर्फे/महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यातर्फे भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. त्यासंदर्भात हरकती उपस्थित करण्यात आल्या असून त्याबाबत योग्य त्या स्तरावर सुनावणी सुरु आहे. या संदर्भातील सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यावरच शासन यावर विचार करु शकेल.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, आज महाराष्ट्रामध्येच नव्हेतर संपूर्ण देशभर सेझ प्रकल्पाबद्दल नाराजीचे वातावरण पसरलेले आहे. विशेषत: शेतकरी बांधवामध्ये याबद्दल शंका निर्माण झालेल्या आहेत. याबाबत सरकारच्या धोरणामध्ये जी स्पष्टता असली पाहिजे ती स्पष्टता दिसत नाही म्हणून याबाबत माझे स्पेसिफिक दोन प्रश्न आहेत.

पहिला प्रश्न असा आहे की, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, शासन यांच्या तर्फे राज्यात कोणत्या 7 प्रकल्पांच्या भूसंपादनाची कारवाई सुरु करण्यात आलेली आहे ? तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, कालच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात सभागृहात उत्तर देतांना स्पष्ट केले आहे की, सेझ प्रकल्पासाठी जमिनीचे भूसंपादन सक्तीने केले जाणार नाही तसेच दुपिकी जमिनीचे भुसंपादनही केले जाणार नाही. त्यामुळे यासंदर्भातील आदेश जिल्हाधिका-यांना देऊन भूसंपादनाची प्रक्रिया थांबविण्यात येणार आहे काय ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांना मला सांगावयाचे आहे की, सेझच्या संदर्भात शेतक-यांची नाराजी नसून जमीन संपादनाच्या संदर्भात शेतक-यांची नाराजी आहे. खाजगीमध्ये शेतक-यांच्या जमिनी संपादन करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या भूसंपादनाच्या संदर्भात ब-याच ठिकाणी नाराजी आहे आहे ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्रात एकूण 72 ठिकाणी सेझ प्रकल्प मंजूर झालेला असून त्यापैकी 7 ठिकाणी अडचणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२४३९२ .....

श्री.अशोक चव्हाण.....

निर्माण झालेल्या आहेत. काही ठिकाणी एमआयडीसी मार्फत जमीन विकसित करण्यात येत आहे. महामुंबई सेझच्या संदर्भात ऊरण, पेन,पनवेल या ठिकाणी जमीन संपादनाविषयी अडचणी निर्माण झालेल्या आहेत. भूसंपादनाच्या संदर्भात शासनाची भूमिका स्पष्ट आहे. सेझच्या संदर्भात काल माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले आहे की, कोणाच्याही जमिनीचे सक्तीने भूसंपादन केले जाणार नाही. शेतक-यांच्या जमिनीला योग्य मोबदला मिळाला गेला पाहिजे. जमिनीचे संपादन करतांना शासन हस्तक्षेप करणार नाही. जमीन संपादन करतांना शेतक-यांना योग्य मोबदला मिळाला तर शासन हस्तक्षेप करणार नाही अशी शासनाची भूमिका आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, सक्तीने भूसंपादन केले जाणार नाही असे शासनातर्फे सांगण्यात आलेले आहे. परंतु भूसंपादन करण्याच्या संदर्भात मुळातच शेतक-यांच्या हरकती आहेत. सरकार शेतक-यांचे म्हणणे ऐकून घेत नाही. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, यासंदर्भात परत एकदा शेतक-यांचे म्हणणे ऐकून घेतले जावे. यासंदर्भात आम्ही वारंवार निवेदनेही दिलेली आहेत. शासनातर्फे सांगण्यात आलेले आहे की, सेझ प्रकल्पासाठी फक्त नापिकी जमिनी घेतल्या जातील परंतु प्रत्यक्षात एकपिकी जमीन, दुपिकी जमिनी घेतल्या जात आहेत. यासंदर्भात माननीय अर्थमंत्री श्री जयंत पाटील साहेबांनी सांगितले आहे की, सेझ प्रकल्पासाठी फक्त नापिकी जमिनी घेंतल्या जातील. या विषयाच्या संदर्भात माननीय पंतप्रधानांनी सांगितले आहे की, "आम्ही सेझ प्रकल्प रद्द करणार नाही, तर या सेझ प्रकल्पाची गती मंद करणार आहोत." त्यामुळे सेझ प्रकल्पाच्या भूसंपादनाच्या संदर्भात ज्या ज्या ठिकाणी शेतक-यांच्या हरकती आहेत त्या त्या ठिकाणी जमीन संपादन करण्याचे आदेश थांबविणार आहात काय ? यासंदर्भात यस ऑर नो असे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24392....

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, एस.ई.झेड मंजूर करण्याचे सर्व अधिकार हे केंद्र शासनाला आहेत. राज्य सरकार फक्त आपल्याकडील एस.ई.झेड संदर्भातील प्रस्ताव पाठविते या संदर्भातील संपूर्ण निर्णय केंद्र सरकार घेते. एस.ई.झेड बाबत 7 प्रकरणांमध्ये विविध स्तरावर भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. भूसंपादनाबाबत प्रथम नोटीफिकेशन काढले जाते. लँड ॲक्विझ ीशन ऑफीसरमार्फत सेक्शन 6 नुसार कार्यवाही केली जाते. भूसंपादनाबाबत शेतकऱ्यांकडून ज्या हरकती येतात त्याची सुनावणी ठेवली जाते. सुनावणी झाल्यानंतर निर्णय घेण्यात येतो. ज्या जमिनी नापिकी आहेत तसेच जे शेतकरी स्वखुषीने जमिनी देत असतील अशा जमिनी संपादित करण्याची भूमिका आहे. शेतकऱ्यांकडून आलेल्या तक्रारींचे निरसन करण्यासाठी दिनांक 8 जून, 2006 रोजी माननीय पुनर्वसन मंत्री डॉ. पंतगराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली एक उप समिती नेमण्यात आलेली आहे. या समितीमध्ये महसूल मंत्री आणि उद्योगमंत्री यांचा समावेश आहे. या उप समितीमध्ये शेतकऱ्यांकडून आलेल्या तक्रारींबाबत सविस्तर चर्चा होते. शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाबाबत कोणते धोरण घ्यावयाचे ? त्यांच्या मागण्या काय आहेत ? या संदर्भात अंतिम निर्णय झाल्यानंतर पुढील कार्यवाही करावी अशी शासनाची भूमिका आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सेझला ज्याठिकाणी विरोध असेल तेथे ते होऊ देणार नाही असे शासन सांगते. इंडस्ट्रीयल झोन आणि रेसिडेन्शीअल झोन ठरविण्याचे अधिकार शासनाला आहेत. 45 गावांमध्ये सेझला विरोध आहे. या गावांमध्ये इंडस्ट्रीयल झोन होऊ नये अशी गावातील लोकांची मागणी आहे. तेव्हा त्या गावांमध्ये इंडस्ट्रीयल झोन होणार नाही असे शासन याठिकाणी सांगणार काय ? रायगड जिल्ह्यात इंडस्ट्रीयल झोन नको असे तेथील शेतकरी सांगत असताना रायगड जिल्ह्यात एम.आय.डी.सी.ने जमिनी संपादित केलेल्या आहेत. उदाहरण सांगावयाचे झाले तर महाड येथे 4 हजार एकर जमीन संपादित करण्यात आलेली आहे. भिरा येथे 3 हजार एकर जमीन संपादित करण्यात आली आहे. उसर येथे 2 हजार एकर जमीन संपादित करण्यात आली आहे. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, सेझ राबविण्यासाठी शासनाची घाई कशासाठी चालू आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24392....

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, सेझ कोणत्या ठिकाणी असावा, हा विकासकाचा चॉईस आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. राज्यात विविध ठिकाणी एकूण 72 सेझ मंजूर झालेले आहेत. बऱ्याच ठिकाणी एम.आय.डी.सी. अंतर्गत संपादित केलेल्या जमिनीवर सेझ विकसीत करण्यात येत आहे. काही ठिकाणी इंडस्ट्रीयल झोन नसताना विकासकांनी तेथे पसंती दाखविली आहे. विशेषत: मुंबई जवळील भागास विकासकांची पसंती आहे. सेझमध्ये उत्पादित होणारा माल विदेशामध्ये एक्स्पोर्ट होणार आहे. त्यामुळे त्या मालाची निर्यात करण्यासाठी इंटरनॅशनल एअरपोर्ट, रेल्वे स्टेशन, जे.एन.पी.टी. इत्यादी सुविधा मुंबईत असल्यामुळे मुंबईजवळ जमीन घेण्याबाबत विकासक निर्णय घेत असतो. ज्या ठिकाणी जमीन संपादनाच्या बाबतीत शेतकऱ्यांचा विरोध असेल त्याठिकाणी शेतकऱ्यांच्या वतीने शासन हस्तक्षेप करील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यामध्ये तीन वेगवेगळे विषय आहेत. महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी एम.आय.डी.सी निर्माण झालेल्या आहेत. या एम.आय.डी.सी. निर्माण करण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी मोठ्या प्रमाणावर घेण्यात आल्या.परंतु आज त्या ओसाड पडलेल्या आहेत. असे असताना रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथे नवीन एम.आय.डी.सी. सुरु केलेली आहे त्यास प्रचंड विरोध आहे. तेव्हा तेथील एम.आय.डी.सी. तातडीने रद्द करणार काय ? कारण तेथे रिलायन्सने जमिनी संपादित करण्यास सुरुवात केलेली आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24392....

श्री.दिवाकर रावते....

रिलायन्सचे पॅकेज काय आहे ? ते स्वतंत्र पॅकेज आहे का ? त्याठिकाणची नवीन एमआयडीसी रद्द व्हावी यासाठी माननीय श्री.एन.डी.पाटील यांनी मोठे आंदोलन उभे केले आहे. त्यामुळे ती आपण रद्द करणार का ? यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी काल याठिकाणी जे सुतोवाच केले त्यामुळे आणखी कोंडी निर्माण होणार आहे, असे मला वाटते. त्यांनी काल सांगितले की, मधल्या राहिलेल्या पॅचसंबंधी सरकार निर्णय घेईल. उद्योजकांना तेच हवे आहे. ते सरकारला या पॅचसंबंधी निर्णय घेण्यास भाग पाडतील व ते जागा बळकावतील. त्यामुळे याला शासन बंदी घालणार आहे का ? आपण यामध्ये लोकांना चारही बाजूने कोंडीत पकडणार आहात, असे दिसते. त्यामुळे या बाबतीत शासनाची नेमकी कोणती भूमिका आहे, हे आपण स्पष्ट करावे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, रायगड जिल्हयातील एमआयडीसीमध्ये अद्याप उद्योग आलेले नाहीत. शेजारी विशेष आर्थिक क्षेत्र निर्माण होत असल्याचा माननीय रावते साहेबांनी उल्लेख केला. त्यासंबंधीची माहिती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु आज वस्तुस्थिती अशी आहे की, राज्यातील कुठल्याही चांगल्या एमआयडीसीकडे सध्या जागा उपलब्ध नाही. आज सर्वच ठिकाणी उद्योग जात आहेत.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.अशोक चव्हाण : आज राज्यातील बऱ्याच एमआयडीसीमध्ये जागा उपलब्ध नाही. याठिकाणी औरंगाबाद एमआयडीसीचा उल्लेख झाला. त्याठिकाणी जागा शिल्लक राहणार नाही, अशी परिस्थिती आहे. एकंदरितच उद्योगाला प्रचंड मागणी आहे. याठिकाणी रायगड, जिंतूर, हिंगोली, औरंगाबाद, शेंद्रे, बुटीबोरी एमआयडीसीमध्ये तसेच राज्यातील इतर बऱ्याच चांगल्या एमआयडीसीमध्ये जागा उपलब्ध नाही. आपल्याकडे उद्योगाला प्रचंड मागणी असल्यामुळे आपण ही प्रक्रिया थांबवायची का ? याबाबत आता सभागृहानेच निर्णय घ्यावा. दुसरा मुद्दा रायगड एमआयडीसीसंबधी उपस्थित करण्यात आला, तोही आपण तपासून पाहू. त्याठिकाणची जमीन विनाकारण संपादित करुन पडून राहणार आहे काय ? याबाबत आपण जरुर सत्य तपासून पाहू व

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24392....

श्री.अशोक चव्हाण....

त्यातून अन्य मार्ग काढता येईल का तेही पाहू. कारण, एकदा जमीन संपादित करुन घेतल्यानंतर ती परत करता येत नाही. यामध्ये कायदेशीर बाबींचा अंतर्भाव आहे. तसेच, मागणी येणार नसेल तर त्या जागेचा उपयोग.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, मी मागणी संदर्भात बोललो नाही तर तेथील नवीन एमआयडीसी रद्द करण्यासंबंधी बोललो. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांनी त्यासंदर्भात उत्तर द्यावे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, हा प्रश्न मला वेगळया पध्दतीने तपासावा लागेल.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

उपसभापती : एकंदरीतच हा गंभीर प्रश्न असून सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे मोठया संख्येने हात वर आहेत. त्यामुळे मला असे वाटते की, या प्रश्नाला न्याय देण्याच्या दृष्टीने प्रश्नोत्तराचा तास कमी पडणार आहे. त्यामुळे सभागृहाची अनुमती असेल तर या विषयावर आपण नियम 97 अन्वये चर्चा करु की, जेणेकरुन आपल्याला या प्रश्नास चांगल्या प्रकारे न्याय देता येईल. सभागृहाची अनुमती असेल तर या विषयी आपण नियम 97 अन्वये चर्चा करु.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, या विषयी नागपूर हिवाळी अधिवेशानात चर्चा झालेली आहे. परंतु आताच आपण निर्देश दिल्याप्रमाणे नियम 97 अन्वये चर्चेस उत्तर देण्यास माझी तयारी आहे. परंतु शासनाने याबाबतची भूमिका नागपूर हिवाळी अधिवेशनात स्पष्ट केली आहे व कालच माननीय मुख्यमंत्र्यांनीही याबाबत सुतोवाच केले आहेत. त्यामुळे याबाबत आपणच निर्णय घ्यावा.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवण्याची गरज नाही. मी उत्तर देण्यास तयार आहे.

नंतर श्री.रोझेकर....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.24392 पुढे सुरु</u>.....

उपसभापती : या विषयावर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारावयाचे आहेत, अशी सभागृहातील एकंदरीत परिस्थिती आहे. हा प्रश्न निश्चितपणे गंभीर आहे. कालही या विषयावर सभागृहात चर्चा झाली व जवळ जवळ रोजच चर्चा होत आहे. सर्व सन्माननीय सदस्यांना या प्रश्नाच्या संदर्भात आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी संधी मिळावी, असे वाटत असेल तर याच अधिवेशनामध्ये नियम 97 अन्वये प्रस्ताव चर्चेला घेऊ म्हणजे सर्व सन्माननीय सदस्यांना या प्रश्नावर आपले विचार मांडता येतील व न्याय मिळेल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी अशी सूचना करतो की, नियम 97 अन्वये या विषयावर चर्चा जरुर होऊ द्यावी व सर्व सन्माननीय सदस्यांना आपली भूमिका मांडू द्यावी. परंतु, पोलिसांच्या मदतीने कोणत्याही शेतक-याची जमीन जबरदस्तीने घेतली जाणार नाही व वातावरण अशांत होणार नाही, याची शाश्वती शासनाने द्यावी.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, होय.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी अशी विनंती आहे की, या प्रश्नासंबंधी जवळ जवळ सर्वच सन्माननीय सदस्यांना आपली भूमिका मांडावयाची असल्याने ही चर्चा एखाद्या शनिवारी संपूर्ण दिवसभर घ्यावी.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काशिद (ता.मुरुड, जि.रायगड) येथील अपघातात उपचाराअभावी झालेल्या मृत्यूबाबत करावयाच्या चौकशीबाबत

(२) * २५६८३ श्री.राजन तेली , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे : तारांकित प्रश्न क्रमांक २३९०५ ला दिनांक १५ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काशिद (ता.मुरुड, जि.रायगड) येथे झालेल्या अपघातामधील दोन तरुणांचा जिल्हा रुग्णालयात उपचाराअभावी झालेल्या मृत्यूप्रकरणी वैद्यकीय अधिकारी, रायगड व जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड या दोन अधिकाऱ्याकडून मागविण्यात आलेला खुलासा प्राप्त झाला आहे काय,

(२) नसल्यास, खुलासा तात्काळ मागवून घेवून त्याच्यावर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, डॉ. विमल मुंदडा यांच्याकरिता : (१) होय,

(२) प्रस्तुत प्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड यांना प्रशासकीय कामकाजात व रुग्णालयीन व्यवस्थापनात सुधारणा करण्याबाबत ज्ञापनाद्वारे लेखी समज देण्यात आली आहे. तसेच संबंधित वैद्यकिय अधिकारी यांचा खुलासा अमान्य करुन त्यांची एक वेतनवाढ दोन वर्षासाठी रोखण्यात आली आहे तसेच सदर रुग्णालयातून बदली केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, लेखी उत्तरात असे नमूद केलेले आहे की, प्रस्तुत प्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड यांना प्रशासकीय कामकाजात व रुग्णालयीन व्यवस्थापनात सुधारणा करण्याबाबत ज्ञापनाव्दारे लेखी समज देण्यात आली आहे. तसेच संबंधित वैद्यकीय अधिकारी यांचा खुलासा अमान्य करुन त्यांची एक वेतनवाढ दोन वर्षासाठी रोखण्यात आली आहे. सभापती महोदय, काशिद येथे झालेल्या अपघातामधील दोन तरुणांचा जिल्हा रुग्णालयात उपचाराअभावी व डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झालेला आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे ज्या डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे तरुणांना मृत्यू आला त्या डॉक्टरांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाचा विचार आहे का, तसेच, मृत तरुणांच्या कुटुंबियांना शासन मदत करणार काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, काशिद या ठिकाणी झालेल्या अपघातातील श्री.सुधीर डांगे व दिनेश हंसारे या दोन तरुणांना रायगड जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले होते. पैकी श्री.सुधीर डांगे या तरुणाचा मृत्यू रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच झाला होता व

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.25683 पुढे सुरु.....</u>

श्री.रणजित कांबळे.....

दुसरा तरुण, दिनेश हंसारे यास हेड इंज्युरी झाली होती, त्यांच्या नाकातून व कानातून रक्तस्त्राव होत होता. त्याठिकाणी उपस्थित असलेल्या डॉ.ओझा यांनी सदर तरुणावर उपचार केले. परंतु, या रुग्णालयातील सर्जन, डॉ,अरुण गवळी हे त्यावेळी रुग्णालयात उपस्थित नसल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे तरुणांना मृत्यू आला, अशी परिस्थिती नाही. त्या ठिकाणी डॉक्टर होते, त्यांनी तरुणांवर उपचार देखील केलेले आहेत. परंतु, हे रुग्ण अशा परिस्थितीत रुग्णालयात दाखल झाले होते की, दाखल झाल्यानंतर पाच मिनिटातच त्यांना मृत्यू ओढवला. तरी देखील संबंधित डॉक्टरांवर जी कारवाई करावयाची होती ती विभागाने केली आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, अधिका-यांच्या इनसेंसिटिव्हनेसचे हे एक ज्वलंत उदाहरण आहे. या दोन तरुणांचा मृत्यू डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच झाला आहे. पण, या तरुणांना रुग्णालयात दाखल झाल्यानंतर पाच मिनिटातच मृत्यू आला, असे निमित्त पुढे करण्याचा हा प्रकार आहे. अशी प्रकरणे एवढया लाईटली घेण्याचे शासनाचे धोरण आहे का ? संबंधित डॉक्टरांना लेखी समज काय देण्यात आली आहे, तसेच, शवविच्छेदन अहवालात काय म्हटले आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, कोणतेही प्रकरण लाईटली घेण्याचे शासनाचे धोरण नाही किंवा या प्रकरणी इनसेंसिटिव्हनेसही दाखविण्यात आलेला नाही. रुग्ण रुग्णालयात दाखल झाले त्यावेळी डॉक्टर उपस्थित होते व त्यांनी रुग्णांवर उपचार केलेला आहे. एका रुग्णाचा रुग्णालयात दाखल होण्यापूर्वीच मृत्यू झाला होता तर दुस-या रुग्णाला रुग्णालयात दाखल झाल्यानंतर 7 ते 8 मिनिटातच मृत्यू आला.

यानंतर कुमारी जयश्री.....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

पोस्ट मॉर्टेमचा रिपोर्ट असा होता की, हेड इन्ज्यूरीमुळे त्या दोघांपैकी एकाचा मृत्यू आधीच झालेला होता. सदर ॲक्सीडंट जवळपास रुग्णालयाच्या 25 किलोमीटर दूरच्या परिसरामध्ये झाला होता. मृत तरुणांपैकी एका तरुणावर उपस्थित डॉक्टरांनी ताबडतोब उपचार करण्यास सुरु केल्यानंतर पाच मिनिटातच त्याचा मृत्यू झाला. डॉक्टरांनी ताबडतोब कोणत्या ॲक्शन्स घेतल्या याबाबत लाईन्स ऑफ ॲक्शन्सही माझ्याकडे उपलब्ध आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

E -2....

मोखाडा (जि.ठाणे) पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत

(३) * २४४०२ श्री. संजय केळकर , श्री. विनोद तावडे , श्री. रामनाथ मोते , श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मोखाडा पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचे माहे डिसेंबर, २००६ च्या दरम्यान उघडकीस आल्यावर तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले असून, पाच गटविकास अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, त्याची कारणे काय ?

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : (१) अंशत: खरे आहे. ऑक्टोबर, २००६ मध्ये केलेल्या अंतर्गत लेखा परिक्षणात वित्तीय व लेखा विषयक अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्याने तीन जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून तत्कालिन तीन गट विकास अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.

(२) होय.

(३) व (४) देयकाचे प्रदान प्रकरणी अनियमितता झाल्याचे आढळल्याने १) श्री.पी.के.भोई, सहा.लेखा अधिकारी, २) श्री.सुनिल बांबळे, वरिष्ठ सहा.(लेखा) व ३) श्री.आर.वाय.पराते, रोखपाल, यांना निलंबित केले असून तत्कालिन तीन गट विकास अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटिस देण्यात आली आहे.

श्री.विजयसिंह मोहिते - पाटील : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये पुढील दुरुस्ती करतो. लेखी उत्तर क्र.३ व ४ मध्ये शेवटी " तत्कालीन तीन गट विकास अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे." या ऐवजी " तत्कालीन चार गट विकास अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे." असे वाचावे.

श्री.संजय केळकर : ठाणे जिल्हयामध्ये मोखाडा हा अतिशय दुर्गम व दुर्लक्षित भाग आहे. या ठिकाणी पंचायत समितीच्या अधिका-यांनी मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचे माहे डिसेंबर,२००६ च्या दरम्यान उघडकीस आले होते. तसेच तेथील पंचायत समिती कार्यालयात दीड वर्षामध्ये पाच अधिकारी बदलले गेले, म्हणजे दर तीन महिन्याला एक अधिकारी बदलला गेला. या भागात या अधिका-यांनी अनेक आर्थिक गैरव्यवहार केले त्यापैकी एक म्हणजे या भागात आठ - आठ व नऊ - नऊ तास लोड शेडिंग असतांना देखील पंचायत समितीच्या कार्यालयातील झेरॉक्सचे

E -३.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

दर महिन्याचे बिल २०,००० रुपये आले होते. या ठिकाणी मंत्री महोदयांनी उत्तर दिलेली आहे की ऑक्टोबर,२००६ मध्ये केलेल्या अंतर्गत लेखा परीक्षणात वित्तीय व लेखा विषयक अनियमितता इ ाल्याचे निदर्शनास आल्याने सहायक लेखा अधिकारी,वरिष्ठ सहायक लेखा अधिकारी, रोखपाल यांना निलंबित करण्यात आले असून, तत्कालीन चार गट विकास अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, गैरव्यवहार करणा-या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कठोर प्रकारची कारवाई करण्यात येणार आहे का ?

श्री.विजयसिंह मोहिते पाटील : महोदय, सन २००४ ते २००६ पर्यंत ठाणे जिल्हयातील मोखाडा येथील पंचायत समिती कार्यालयामध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्यामुळे तेथील चार वित्तीय अधिका-यांना सस्पेंड केलेले आहे. तसेच, तत्कालीन चार गटविकास अधिका-यांना सदर गैरव्यवहाराबाबत कारणे दाखवा नोटीसही बजावण्यात आलेली आहे, या नोटीसांचे उत्तर आल्यानंतर सखोल चौकशी करुन त्या अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल, पोलीस केस करणे आवश्यक असेल तर पोलीस केस करु अथवा त्यांना निलंबितही करण्यात येईल.

श्री.संजय केळकर : डिसेंबर,२००६ मध्ये सदर गट विकास अधिका-यांना नोटीस देण्यात आलेली होती, अद्यापपर्यंत त्या नोटीसांचे उत्तर आले नाही का ? आपण या ठिकाणी फक्त कनिष्ठ अधिका-यांवर कारवाई केलेली आहे. या प्रकरणातील मुख्य सुत्रधार कोण आहेत ? याचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई कधी करण्यात येईल ?

श्री.रणजित कांबळे : महोदय, सदर गैरव्यवहार दिनांक ०४ डिसेंबर,२००६ रोजी निदर्शनास आले होते. या गैरव्यवहारामध्ये असलेल्या सर्व वित्तीय अधिका-यांना सस्पेंड करण्यात आलेले आहे तसेच, गट विकास अधिका-यांना शो कॉज नोटीस देण्यात आलेली आहे, त्याचे उत्तर आल्यानंतर पुढील कारवाई लवकरात लवकर करण्यात येईल. तीनपैकी एका गट विकास अधिका-याचे उत्तर यावयाचे राहिलेले आहे. सदर कारवाईकरिता प्रोसिजरप्रमाणे ठरलेला वेळ द्यावाच लागणार आहे. चाही गट विकास अधिका-यांचे उत्तर आल्यानंतर त्यांच्यावर योग्य ती कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी अतिशय

E -४.....

श्री.मधुकर सरपोतदार.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मासलेवाईक उत्तर दिलेले आहे. सन २००६ साली सदर भ्रष्टाचार झाला, आता सन २००७ चे तीन महिने संपावयास आलेले आहेत. सदर चारही गट विकास अधिका-यांना दिलेल्या शो कॉज नोटीसांचे उत्तर अद्याप आलेले नाही. शो कॉज नोटीस याचा अर्थच असा होतो की, Sir, they are suppose to submit their explanation within a specific period.

यानंतर श्री.बोरले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24402 .....

श्री.मधुकर सरपोतदार .....

शोकॉज नोटीसचे उत्तर देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना किती दिवसाचा कालावधी देण्यात आला आहे, कोणत्या कारणासाठी त्या अधिका-यांना शोकॉज नोटीस देण्यात आली आहे ? माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, सखोल चौकशी करण्यात येईल. परंतु सखोल चौकशी करण्यासाठी आवश्यक ते मुद्दे शोकॉज नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहेत काय ?

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, नोव्हेंबर, 2005 ते मार्च 2006 पर्यंतच्या ऑडिटची तपासणी करण्यात आलेली आहे. जे अधिकारी दोषी आहेत त्यांची चौकशी करावी लागेल. राहिलेल्या ऑडिटची तपासणी पूर्ण केली जाईल. जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांना पाठीशी घातले जाणार नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी स्पेसिफिक उत्तर दिले पाहिजे. त्या अधिका-यांना कोणत्या कारणासाठी शोकॉज नोटीस दिलेली आहे, शोकॉज नोटीसचे उत्तर देण्यासाठी किती दिवसाची मुदत दिलेली आहे, शोकॉज नोटीसचे उत्तर मिळाले नसेल तर कोणती उपाययोजना केलेली आहे आणि सखोल चौकशी करण्यासाठी नेमके मुद्दे काय आहेत ?

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, स्टेशनरीची जादा भावाने खरेदी करणे, डिझेल-पेट्रोल खरेदीमध्ये गैर व्यवहार करणे, प्रवास भत्ता, घरभाडे भत्ता यामध्ये गैरव्यवहार करणे अशा प्रकारच्या गैरव्यवहारासंबंधीच्या 14 मुद्यांबाबत त्या अधिकाऱ्यांना शोकॉज नोटीस दिलेली आहे. ऑडिट करीत असतांना जे दोषी आढळून आले त्यांचा उल्लेख शोकॉज नोटीसमध्ये करण्यात आलेला आहे. कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. शोकॉज नोटीसचे उत्तर देण्यासाठी त्यांना एक महिन्याची मुदत दिलेली आहे. जो खर्च दाखविण्यात आलेला आहे तो जास्त आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, शोकॉज नोटीसमध्ये स्पेसिफिक मुद्दे द्यावे लागतात. शोकॉज नोटीसचे उत्तर देण्यासाठी त्यांना किती दिवसांचा कालावधी दिलेला आहे ? शोकॉज नोटीसचे उत्तर आले काय ?

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24402 .....

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, शोकॉज नोटीसचे उत्तर देण्यासाठी त्यांना एक महिन्याची मुदत दिलेली आहे. जो खर्च दाखविण्यात आलेला आहे तो जास्त आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, शोकॉज नोटीस किती तारखेला दिलेली आहे ?

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, दिनांक 5.12.2006 रोजी शोकॉज नोटीस दिलेली आहे. दोन अधिका-यांकडून शोकॉज नोटीसचे उत्तर मिळालेले आहे. उर्वरित दोन अधिका-यांकडून अद्याप उत्तर आलेले नाही. कोणत्याही अधिका-याला पाठीशी घातले जाणार नाही. श्री.आर.वाय.पराते, रोखपाल यांना निलंबित करण्यात आले आहे. चार गट विकास अधिका-यांना नोटीस दिलेली आहे.

उपसभापती : या प्रकरणी 15 दिवसाच्या आत आहे ती कार्यवाही पूर्ण करुन शोकॉज नोटीसचे उत्तर आल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, झालेल्या कार्यवाहीची माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे.

उपसभापती : या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, होय.

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंब्रा (जि.ठाणे) येथील विजेचा मनोरा कोसळल्याप्रकरणी करण्यात येणाऱ्या चौकशीबाबत

(४) * २६६२२ श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा (जि.ठाणे) येथील २२० के.व्ही. वाहिनीचा मनोरा कोसळल्याप्रकरणी मुंब्रा पोलिसांकडून करण्यात येत असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप चौकशी पूर्ण झालेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : (१) सदर प्रकरणी पोलीसांनी अद्याप चौकशी पूर्ण केलेली नाही.

(२) व (३) सदर प्रकरणी गुन्ह्याच्या तपासाच्या दरम्यान दिनांक २०.१२.२००५ रोजी एका संशयित व्यक्तीस अटक करण्यात आली होती. परंतु त्याच्याविरुध्द पुरावा न मिळाल्यामुळे त्याला दिनांक १७.१.२००६ रोजी आरसीपीसी १६९ प्रमाणे सोडून देण्यात आले. गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक या दर्जाच्या अधिकाऱ्याकडून केला जात आहे. सर्वतोपरी प्रयत्न करुन गुन्हा अद्याप उघडकीस आला नाही. गुन्हा तपासावर आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रकरणाबाबत मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, दिनांक 20 डिसेंबर 2005 रोजी घडलेल्या घटनेची पोलीस चौकशी अद्याप का पूर्ण झालेली नाही ? लोडशेडींगचा प्रश्न सध्या गाजत आहे, तशीच वर्क शेडींगची अडचण आहे काय ? तीन-तीन महिने चौकशी पूर्ण होत नाही, ही गंभीर बाब आहे. सन्माननीय मंत्री महोदयांना याबाबत माहिती नसावी असे माझे मत आहे, त्यामुळे या प्रकरणाच्या चौकशीत दिरंगाई होत असावी, दिरंगाई का होत आहे याची माहिती सभागृहास देण्यात येईल का ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी याबाबत केलेले विधान सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावे अशी मी विनंती करतो. संबंधित खात्याचे मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मंत्री महोदय उत्तर देत असताना विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून वारंवार अडथळे आणले जात आहेत. विरोधी पक्षातील 4-4 सदस्य एकाच वेळी बोलत आहेत अशा प्रकारची नवीन पध्दत सभागृहात येऊ पाहात आहे.

(गोंधळ)

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MAP/

ता.प्र.क्र.26622

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी एक वर्षापासून चालू आहे. माननीय उपसभापती महोदय आपल्या आपल्या विभागातील हा प्रश्न आहे, आपण सभापतीस्थानी असताना या प्रश्नाला न्याय मिळाला पाहिजे, असे मला वाटते.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सदर घटना दिनांक 23.11.2005 रोजी घडलेली आहे. कळवा-कलरकेम-पडघा ही डबल सर्कीट लाईन आहे. मुंब्रा जि.ठाणे येथे या लाईनच्या पोलचे नटबोल्ट कापून नेण्याचा प्रयत्न झाला आहे. ही घटना घडल्यानंतर ताबडतोब पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे. घडलेल्या गुन्हयात पंचनामा करण्यात आला आहे. ज्या विभागामध्ये ही घटना घडली त्या परिसरातील वीज पुरवठा सुरळीत करण्याच्या दृष्टीकोनातून अन्य ठिकाणाहून वीज पुरवठा देण्यात आला आहे. 60 लाख रुपये खर्चून एक महिन्याच्या आत हे काम करण्यात आले आहे. अशा प्रकारच्या घटना केवळ ठाणे येथेच नव्हे तर राज्यातील अनेक भागात घडत असतात. आरोपींचा उद्देश कोणता आहे याची कल्पना येत नाही. चोरीचा किंवा घातपाताचा उद्देश असू शकतो. याबाबत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केल्यानंतर, पुढील चौकशी करण्याची जबाबदार पोलिसांची आहे. दिनांक 24.11.2005 रोजी एफ.आय.आर. दाखल करुन श्री.महोम्मद जैश हुसेन या संशयीत इसमाला पोलिसांनी ताब्यात घेतले होते. चौकशी केली असता, हा इसम त्या प्रकरणमध्ये सामील नसल्याचे पोलिसांच्या लक्षात आल्यानंतर दिनांक 17.1.2006 रोजी त्याला सोडून देण्यात आले. घडलेली घटना गंभीर स्वरुपाची आहे, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी विचारले आहे की, चौकशीला विलंब का झालेला आहे ?

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीकरित प्रत / शुद्धीकरणासाठी नाही

या चौकशीला विलंब झालेला आहे हे खरे आहे. परंतु ही बाब तितकीच महत्त्वाची आहे की, पोलीस विभागाच्या माध्यमातून अशा घडणाऱ्या घटनांच्या बाबतीत कसोशीने चौकशी करणे गरजेचे होते. त्यामुळे याबाबत वारंवार पाठपुरावा आपण केलेला आहे. परंतु या घटनेतील संशयित आरोपी आढळून आलेले नाहीत. तरीही याबाबतीत आणखी पाठपुरावा करून संशयित आरोपींना ताब्यात घेण्याबाबतची कारवाई करण्याच्या दृष्टीने पोलिसांकडे पाठपुरावा केला जाईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या बोलण्याला माझा आक्षेप यासाठी होता की, माननीय मंत्री महोदय बोलताना म्हणाले की, तुम्ही सदस्य 4-4 जण एकदम उभे राहून प्रश्न विचारता. पण असे केव्हा घडते याचा अभ्यास माननीय मंत्री महोदयांना केलेला आहे असे वाटत नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण अशा प्रकारे विरोधी पक्ष सदस्यांवर आक्षेप घेत आहात पण जेव्हा ते स्वत: विरोधी पक्षामध्ये होते त्यावेळेस ते आणि त्यांचे सहकारी काय करीत होते हे त्यांनी एकदा आठवून पहावे. मंत्र्यांकडून, शासनाकडून योग्य असे उत्तर मिळविणे हा आमचा अधिकार आहे आणि ते मिळत नसेल तर सदस्यांकडून एकदम उठून प्रश्न विचारले जातात. तेव्हा विरोधी पक्ष सदस्यांचा जो अधिकार आहे त्यावर मंत्री महोदयांनी अतिक्रमण करू नये इतकाच माझा त्यांच्या बोलण्याला आक्षेप आहे.

उपसभापती : याबाबत चौकशी करून अहवाल सभागृहासमोर सादर करण्यात येईल.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.सरपोतदार यांना मी सांगू इच्छितो की, या पूर्वीच्या प्रश्नाच्या वेळी देखील सन्माननीय मंत्री श्री.मोहिते-पाटील हे उत्तर देत होते त्यावेळेसही प्रश्न विचारणाऱ्या सदस्यांकडून किमान खाली बसण्याचे सौजन्य तरी दाखवावयास पाहिजे होते. परंतु त्यावेळीही चारही सदस्य उभे होते. सभापती महोदय, माझ्या वक्तव्यामध्ये काही चूक असेल तर जरूर मी ते मागे घेण्यास तयार आहे. परंतु या सभागृहाच्या ज्या काही प्रथा-परंपरा आहेत त्यांचे पालन होणे हे दोन्ही बाजूकडून गरजेचे आहे. मी हे मान्य करतो की, एखाद्या प्रश्नाच्या वेळी ॲग्रेसीव होऊन सगळे सदस्य उभे राहतात. पण असे प्रसंग विरळा घडतात. परंतु मंत्री एखाद्या प्रश्नाला उत्तर देत असतात तेव्हा अन्य सदस्यांनी, प्रश्न विचारणाऱ्या सदस्यांनी खाली बसणे आवश्यक आहे. ती आपली प्रथा आहे. तेव्हा सभापती महोदय, याही गोष्टीची चौकशी करून वाटल्यास आपण सभागृहाला अहवाल द्यावा.

***** ..... एच 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सामूहिक प्रोत्साहन योजना 1993 अंतर्गत वाढीव गुंतवणूकीबाबत

(5) * 24453 श्री. नितीन गडकरी, श्री. पांडुरंग फुंडकर, श्री.सागर मेघे, श्री.केशवराव मानकर, श्री. रमेश निकोसे, श्री.संजय दत्त, मेजर सुधीर सावंत, श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य शासनाचे सामूहिक प्रोत्साहन योजना 1993 अंतर्गत उद्योग घटकांना प्रोत्साहन देण्याचे धोरण आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, ज्या उद्योग घटकांनी दिनांक 31 मार्च, 2000 पूर्वी अंतीम परिणामकारक टप्पे पूर्ण करावयाचे होते ते त्यांनी पूर्ण केले आहे काय,
(3) असल्यास, ज्या घटकांनी आद्यप्रवर्तक उद्योग असल्यास स्थिर भांडवल गुंतवणूक करण्याची शेवटची तारीख तीन वर्ष म्हणजेच दिनांक 31 मार्च, 2005 व इतर उद्योगांसाठी दोन वर्षासाठी म्हणजेच दिनांक 31 मार्च, 2004 पर्यंतच होती, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, ज्या उद्योग घटकांनी स्थिर भांडवल गुंतवणूकीस वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थेद्वारा अथवा स्वखर्चाद्वारा गुंतवणूक केली असल्यास, या गुंतवणूकीचे मुल्यांकन वा पुर्नमुल्यांकन केले असल्यास, अशा वाढीव गुंतवणूकीवर सुध्दा प्रोत्साहने अनुज्ञेय आहे, असल्यास, याबाबत शासनाकडे मंजूरीसाठी किती अर्ज आजतागायत प्रलंबित आहे ?

श्री. अशोक चव्हाण : (1) होय.
(2) सामूहिक प्रोत्साहन योजना 1993 अंतर्गत ज्या घटकांनी दि. 31/12/1999 पूर्वी अर्ज केला आहे अशा घटकांनी दि. 31/3/2002 पूर्वी अंतिम परिणामकारक टप्पे पूर्ण करावयाचे आहेत. तसेच, ज्या घटकांनी दि. 1/1/2000 ते 31/3/2000 या कालावधीत सामूहिक प्रोत्साहन योजना 1993 अंतर्गत अर्ज केले आहेत अशा घटकांनी दि. 31/12/2000 पूर्वी अंतिम परिणामकारक टप्पे पूर्ण करावयाचे आहेत. मात्र, ज्यांनी दि. 31/12/2000 पूर्वी अंतिम परिणामकारक टप्पे पूर्ण केलेले नसतील अशा घटकांनी गुंतवणूक कालावधीमध्ये अंतिम परिणामकारक टप्पे पूर्ण करावयाचे आहेत.
(3) होय.
(4) होय. ज्या पात्र उद्योग घटकांनी गुंतवणूकीचे मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन केले आहे घटकांना वाढीव गुंतवणीवर प्रोत्साहने अनुज्ञेय आहेत. मात्र, वाढीव गुंतवणूकीबाबतची सुमारे 16 प्रकरणे उद्योग संचालनालयाच्या स्तरावर प्रलंबित आहेत तथापि, वाढीव गुंतवणूकीवर प्रोत्साहने देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यावर कार्यवाही चालू आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी प्रश्न 2 ला उत्तर देताना आपण म्हटले आहे की, "सामूहिक प्रोत्साहन योजना 1993 अंतर्गत ज्या घटकांनी 31.12.1999 पूर्वी अर्ज केला आहे अशा घटकांनी 31.3.2002 पूर्वी अंतिम परिणामकारक टप्पे पूर्ण करावयाचे आहेत." परंतु सदर योजनेंतर्गत 31.3.2000 पर्यंत म्हणजे शेवटच्या तारखेपर्यंत अर्ज केला असेल तर सदर योजना या घटकांनाही लागू होणार आहे का ? तसेच प्रश्न 4 ला उत्तर देताना आपण

..... एच 3 ...

अशुद्ध प्रत / अप्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर (पुढे चालू....) ता.प्र.क्र. 24453 ....

म्हटले आहे की, वाढीव गुंतवणुकीवर प्रोत्साहने देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यावर कार्यवाही चालू आहे. तर हा प्रस्ताव शासनास केव्हा प्राप्त झाला आहे आणि त्यावर प्रत्यक्षात केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, 1993 ची शासनाची जी पॅकेज योजना, म्हणजे सामूहिक प्रोत्साहन योजना आहे त्याबाबतचा हा प्रश्न आहे. या योजनेप्रमाणे, जी योजना 1993 ला जाहीर केली होती त्यातील नियमित प्रकरणे, ज्यांची अर्ज करण्याची मुदत ही 31.12.99 होती त्यांना अंतिम टप्पे 31.3.2002 पर्यंत पूर्ण करावयाचे होते. परंतु ही प्रक्रिया पूर्ण झाली नाही, परंतु ही पाईप लाईन प्रकरणे असली तरी 31 मार्च 2000 पर्यंत जी प्रकरणे पूर्ण झाली त्यांच्याबाबतीत हा प्रश्न निर्माण झालेला आहे. ही प्रकरणे आहेत त्यांच्याबाबतीत निर्णय कसा करावयाचा किंवा भूमिका काय स्वीकारावयाची ? हा प्रश्न आहे. तेव्हा ज्या युनिटस्मध्ये वाढीव खर्च झालेला आहे, मूळ मागणीप्रमाणे जी खर्च मर्यादा आहे त्याच्या 25 टक्के वाढ झाली असेल तर ती खर्चामध्ये वाढ झाली आहे असे गृहीत धरून त्यांना ही 1993 ची योजना लागू करावी काय असा तो प्रश्न आहे. शासनाने या संबंधात जो जी.आर. निर्गमित केलेला आहे त्यात त्यांनाही न्याय द्यावा अशी भूमिका आहे. पण त्यासाठी वित्त विभागाची मान्यता नसल्यामुळे ते आपण करू शकत नाही. पण वित्त विभागाची यास मान्यता मिळाल्यानंतर त्यांनाही हे लागू करता येईल.

(यानंतर श्री. सरफरे ..... आय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, या योजनेंतर्गत ज्या घटकांनी वाढीव गुंतवणूक केली आहे अशा वाढीव गुंतवणुकीवरील 100 टक्के खर्च देण्यासंबंधी शासनाचे धोरण आहे. परंतु आता तो वाढीव खर्च 25 टक्के देण्यात येईल असा शासनाचा प्रस्ताव आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, हा प्रस्ताव उद्योगांवर अन्याय करणारा असल्यामुळे हा प्रस्ताव मागे घेऊन नवीन सुधारीत प्रस्ताव सादर करणार काय?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदसय, 100 टक्के खर्च अनुज्ञेय करता येणार नाही. त्या खर्चाला किती मर्यादा घालावयाची याचा निर्णय शासनाने घेतला आहे. झालेला खर्च 25 टक्क्याच्या हद्दीपर्यंत सीमित करुन तो वाढीव प्रकल्प खर्च समजून अनुज्ञेय करण्यात यावा असा निर्णय उद्योग विभागाने घेतला आहे. त्या संबंधीच्या जी.आर. ला वित्त विभागाची मान्यता नाही. वित्त विभागाने तो प्रस्ताव मान्य केलातर निश्चितपणे त्यामधून मार्ग निघू शकेल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये विदर्भ आणि मराठवाडयातील मागासलेल्या भागामध्ये आपण नवीन उद्योग आणीत नाही. आता आपण मुंबईच्या आसपास एस.ई.झ ोड निर्माण करीत आहात. यामुळे आपण विभागवार औद्योगिक असमतोल उभा करीत आहात. याठिकाणी आपण 100 टक्के आरक्षण करुन विदर्भ आणि मराठवाडयावर अन्याय करीत आहात. या प्रकरणी विदर्भ आणि मराठवाडयाकरिता मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानंतर वित्त विभाग तुमचे ऐकत नाही. तरमग तुम्ही या मंत्रिमंडळामध्ये कशासाठी रहाता? विदर्भ-मराठवाडयामध्ये तुम्ही निष्प्रभ आहात काय? तुम्ही तुमचा आवाज कां उठवीत नाही? तुम्ही या गुलाबी मानसिकतेमध्ये आपला स्वाभिमान कशासाठी दाबून ठेवता ? आपल्या वडिलांचा आदर्श समोर ठेऊन तुम्ही सांगणार आहात की नाही? वित्त विभागाचे सचिव हे शासनाचे गाईड अँड फिलॉसॉफर आहेत काय? ते माननीय मुख्यमंत्र्यांपेक्षा मोठे आहेत काय? ते म्हणतील त्याप्रमाणे सर्व चालले आहे. वित्त विभागाचे सचिव हे शासनामध्ये एक नवीन सत्ताबाह्य केंद्र तयार झाले आहे. माननीय श्री. भुजबळ साहेब काल या संदर्भात बोलले असले तरी त्यांची व्यथा वेगळी आहे. परंतु आपण विदर्भ आणि मराठवाडयाकरिता कॅबिनेटचा निर्णय लागू करण्याकरिता मार्ग काढणार काय?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी उल्लेख केल्याप्रमाणे विदर्भ आणि मराठवाडयामध्ये अधिक उद्योग आले पाहिजेत व विभागीय असमतोल दूर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24453...

श्री. अशोक चव्हाण....

झाला पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. त्यामुळे विदर्भातील नागपूर जिल्हयामध्ये बोईंगसारखे मोठे उद्योग एस्टॅब्लिश करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे औरंगाबाद येथे व्हिडिओकॉन, वॉक्हार्ट, हिंडाल्को सारखे मोठे उद्योग येत आहेत. त्यामुळे उद्योग विभागामध्ये प्रादेशिक असमतोल रहाणार नाही हे या ठिकाणी प्रामाणिकपणे नमूद केले पाहिजे. माननीय सदस्यांनी 1993 च्या योजनेबाबत उल्लेख केला. प्रकल्पाची जी वाढीव किंमत झाली असेल तिच्या 25 टक्केच्या मर्यादे अंतर्गत जे प्रस्ताव आले आहेत त्या प्रस्तावाच्या बाबतीत नेमकी कोणती भूमिका घ्यावी यासंबंधी कॅबिनेटने निर्णय घेतल्यानंतर त्या बाबत वित्त विभागाचे काय म्हणणे आहे हे जाणून घेऊन यासंबंधी अंतिम निर्णय घेतला जाईल. त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भातील घटकांसाठी शेवटच्या दिनांकानंतर एक वर्षाच्या आत आणि उर्वरित महाराष्ट्रातील घटकांसाठी शेवटच्या दिनांकानंतर तीन महिन्याच्या आत वाढीव किंमतीसाठी केलेले अर्ज ग्राहय धरण्यात यावेत असा प्रस्ताव आहे. त्या अनुषंगाने वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असून त्यावर निश्चितपणे कारवाई करण्याची शासनाची भूमिका आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24453 (पुढे सुरु...

श्री.नितीन गडकरी : विदर्भाच्याबाबतीत 31 मार्च 2005 पर्यन्त ज्यांनी अर्ज केले असतील त्यांना एक वर्षाच्या कालावधीचे रिलॅक्सेशन देणार आहात,असे समजायचे काय ?

श्री.अशोक चव्हाण : जी.आर.मध्ये आपण स्पेसिफिक कालावधी घातलेला नव्हता. त्यामध्ये स्पेसिफिक कालावधी टाकावा लागेल. किती कालावधीपर्यन्त अशाप्रकारचे अर्ज ग्राह्य धरावेत याला कालमर्यादा घातली पाहिजे. प्रकल्पाची कॉस्ट सीमित केली पाहिजे. या दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. वाढीव प्रकल्पाची हद्द 25 टक्केपर्यन्त सीमित केलेली होती. मराठवाडा,विदर्भातील घटकांच्याबाबत एक वर्षापर्यन्त अर्ज अपेक्षित आहेत आणि उर्वरित भागामध्ये तीन महिन्याच्या आत अर्ज प्राप्त झाले पाहिजेत असे अपेक्षित आहे.

श्री.नितीन गडकरी : एक वर्षाच्या आत अर्ज देण्याबाबतचा मार्ग काढणार असाल तर त्याबाबतची घोषणा आज करणार आहात काय ? 25 टक्क्याची हद्द आहे त्यामध्ये वाढ करून 50 टक्के करण्याबाबतची घोषणाही करणार आहात काय ?

श्री.अशोक चव्हाण : घोषणा करून उपयोग नाही, ती कृतीमध्ये आणली पाहिजे. आपण 25 टक्क्याच्या वर गेलो तर त्यास एक्स्पांन्शन म्हणतो, त्यास वाढीव खर्च म्हणता येत नाही. एस्कलेशन 100 टक्के वाढीव दाखविला तर किती ग्राह्य धरायचा ? 50 टक्के वाढविले तर शासनाला दुप्पट खर्च करावा लागेल. यासंबंधाने निश्चित धोरण आखावे लागेल. 25 टक्क्याच्या हद्दीपर्यन्त वाढीव कॉस्ट सीमित केलेली आहे. त्या दृष्टीकोनातून कालावधी दिलेला आहे. पूर्वीच्या जी.आर.मध्ये कालावधी स्पष्ट केलेला नव्हता. आता आपण त्याबाबतचा निर्णय घेत आहोत. विदर्भासाठी कालावधी एक वर्षाचा केलेला आहे आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी 3 महिन्याचा कालावधी केलेला आहे. त्याप्रमाणे अर्ज केले असतील तर ते वित्त विभागाकडून मंजूर करुन घेण्याची आमची भूमिका आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : एकदा मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मंजूर झालेला आहे. त्याबाबतची मर्यादाही ठरलेली आहे. अर्थमंत्री महोदय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये उपस्थित असतात,असे असताना पुन्हा तो प्रस्ताव वित्त सचिवांकडे पाठविण्याचे कारण काय आहे ? मंत्रिमंडळापेक्षा वित्त खात्याचे सचिव मोठे आहेत काय ?

श्री.अशोक चव्हाण : सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यामध्ये तथ्य आहे. एकदा मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानंतर त्यामध्ये वित्त सचिवांचा हस्तक्षेप असण्याचे कारण नाही. मंत्रिमंडळाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24453 (पुढे सुरु...

श्री.अशोक चव्हाण (पुढे सुरु.....

यासंबंधातील निर्णय अगोदर घेतलेला आहे. एकदा मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाबाबत विभागाने त्रुटी काढल्या होत्या. मंत्रिमंडळाने एकदा निर्णय घेतल्यानंतर विभागाने नव्याने प्रश्न उपस्थित करण्याचा प्रश्न येत नाही. म्हणूनच वित्त विभागाकडून याबाबतचा निर्णय करुन घेऊ अशी भूमिका आहे.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील रस्त्यांसाठी विशेषत: सांगली जिल्ह्यातील (ता. तासगांव) पाडळी ते माळेवाडी येथील रस्त्यांच्या कामासंदर्भात

(६) * २६३०३ श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ : दिनांक १३ डिसेंबर, २००६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या १९ व्या यादीतील प्र.क्र.१९०४९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रस्त्यांच्या कामासाठी केंद्र शासनाने रुपये १,१०८ कोटींचा निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीतून करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामाबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सांगली जिल्ह्यातील पाडळी ते माळेवाडी (ता. तासगांव) या अत्यंत दुरावस्थेत असलेल्या रस्त्याच्या कामासंदर्भात आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. रणजित कांबळे, श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता : (१) नाही.

निधी मंजूर केला नसून रु. ११०८ कोटी एवढ्या रकमेचा प्रकल्प टप्पा - ५ अंतर्गत मंजूर इ ाला आहे.

(२) मंजूर प्रकल्पांपैकी आतापर्यंत ९० टक्के कामाच्या निविदांना मान्यता देणेत आली असून बहुतांशी कामे प्रगतीपथावर आहेत. पैकी फेब्रुवारी, ०७ अखेर ३१ कामे पूर्ण सुध्दा झालेली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

सांगली जिल्ह्यातील पाडळी ते माळेवाडी (ता. तासगांव) या रस्त्याचे काम प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून मंजूर असून सदर कामाच्या निविदांना मान्यता देण्यात आली आहे व कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

श्री. वसंतराव चव्हाण : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, सांगली जिल्ह्यातील पाडळी ते माळेवाडी या रस्त्याचे काम प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून मंजूर असून सदर कामाच्या निविदांना मान्यता देण्यात आली आहे व कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही प्रगतिपथावर आहे. मान्यता किती तारखेला दिली ? कार्यारंभ आदेश देण्यास विलंब का लागला ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, टेंडर ऑगस्ट, 2006 मध्ये मागविले होते. विलंबाचे कारण असे आहे की, एक तर त्यांना निगोशिएशनसाठी जावे लागले आणि दुसरे म्हणजे निगोशिएशननंतर प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेमध्ये 5 टक्के बँक गॅरंटी देणे आवश्यक असते. ज्या कंपनीला कॉन्ट्रॅक्ट मिळाले होते त्यांनी बँक गॅरंटी भरली नव्हती. त्यांनी काल म्हणजे 23.3.2007 ला बँक गॅरंटी दिलेली आहे आणि कालच त्यांना वर्क ऑर्डर दिलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26303 .....

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या रस्त्याचा सुरुवातीचा म्हणजे पाडळी गावापासूनचा जो भाग आहे त्यातील बराचसा भाग तेथे असलेल्या ओढ्याच्या पाण्यामुळे पाण्याखाली जातो म्हणून तो रस्ता उंच करण्याचा प्रस्ताव या एस्टिमेटमध्ये आहे काय ? त्या ओढ्यावर छोटा पूल बांधण्याचा प्रस्ताव आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, होय.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

विज निर्मिती प्रकल्पासाठी एकाच भूखंडावर दोन कंपन्याशी करण्यात आलेला करार

(७) * २४४५६ प्रा. फौजीया खान , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हाण , श्रीमती उषाताई दराडे , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. अरविंद सावंत , श्री. दिवाकर रावते , डॉ. निलम गोऱ्हे , डॉ. दिपक सावंत , श्री. धनाजी साठे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे , श्री.सय्यद जामा , श्री.परशुराम उपरकर , श्री. अनिल परब : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज निर्मितीसाठी रिलायन्स एनर्जीने चार हजार मेगावॅट क्षमतेचा सादर केलेला प्रकल्प तसेच टाटा पॉवरनेही १६०० मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पास शासनाने अद्याप मंजूरी दिली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सध्या लोडशेडींग वाढल्याने नागरीक व शेतकरी त्रस्त झाल्यामुळे सदरहू प्रकल्पास त्वरीत मंजूरी देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : (१) विद्युत अधिनियम, २००३ च्या भाग-३ कलम ७ नुसार विद्युत निर्मिती करिता शासनाची परवानगी घेणे आवश्यक नाही त्यामुळे रिलायन्स एनर्जी आणि टाटा पॉवर कंपनीच्या वीज निर्मितीच्या प्रकल्पास मान्यता देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही तथापि टाटा पॉवर कंपनीने १५०० मे. वॅट क्षमतेचा तसेच रिलायन्स एनर्जी कंपनीने ४००० मेगावॅट क्षमतेचा विद्युत निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी राज्य शासनाशी सामंजस्य करार केला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. या प्रश्नाच्या शीर्षकामध्ये "वीज निर्मिती प्रकल्पासाठी एकाच भूखंडावर दोन कंपन्याशी करण्यात आलेला करार" असा उल्लेख करण्यात आलेला आहे परंतु खाली जो प्रश्न विचारलेला आहे त्यामध्ये एका भूखंडावर दोन कंपन्यांशी करण्यात आलेल्या कराराबाबतचा उल्लेख नाही. आम्ही दिलेला प्रश्न आणि इतर सन्माननीय सदस्यांनी दिलेले प्रश्न मर्ज केल्यानतर त्या प्रश्नातील मूळ गाभाच निघून जातो.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावेत. मी उत्तर देण्यास तयार आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. दोन प्रश्न मर्ज केल्यामुळे या प्रश्नाच्या शीर्षकामध्ये एकाच भूखंडावर दोन कंपन्यांशी करण्यात आलेला करार असा जो उल्लेख आहे त्याचा उल्लेख प्रश्नामध्ये आलेला नाही. त्याबाबत जो प्रश्न विचारला होता तो मर्ज झाला परंतु त्याबाबत आम्हाला लेखी काही येत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 24456 .....

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी शांतता ठेवावी. प्रश्नकर्त्या सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्यांना याबाबत जो काही संभ्रम असेल त्याबद्दल त्यांनी प्रश्न विचारावेत. मी आपल्याला प्रश्न विचारण्याची संधी देईन.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी देण्यात आलेले उत्तर चुकीचे आहे. त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा केला पाहिजे. माझ्या माहितीप्रमाणे उद्योग विभाग, महसूल विभाग आणि ऊर्जा विभाग यांच्यामध्ये समन्वय नसल्यामुळे एकच जागा दोन कंपन्यांना दिली. माझी अशी माहिती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबतीत निर्णय घेऊन टाकला आणि रिलायन्स कंपनीची जागा कमी करुन टाटा कंपनीला दिली. रिलायन्स कंपनीने जागेचे 45 कोटी रुपये भरलेले आहेत. ही माहिती माननीय मंत्रिमहोदय का लपवित आहेत ? याचा निर्णय झालेला आहे असे उत्तर दिले पाहिजे. या ठिकाणी अर्धवट उत्तर देणे म्हणजे सभागृहाची दिशाभूल करण्यासारखे आहे. त्यांनी असे का केले ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, प्रश्नांचे जे क्लबिंग केले जाते ते विधानमंडळ सचिवालयाच्या पातळीवर केले जाते. ते क्लबिंग मंत्रालयाच्या पातळीवर केले जात नाही. या ठिकाणी असा प्रश्न विचारला आहे की, राज्यात वीज निर्मितीसाठी रिलायन्स एनर्जीने 4 हजार मेगावॅट क्षमतेचा सादर केलेला प्रकल्प तसेच टाटा पॉवरनेही सादर केलेल्या 1600 मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पास शासनाने अद्याप मंजुरी दिली नाही, हे खरे आहे काय ? या प्रश्नाच्या अनुषंगाने या ठिकाणी उत्तर दिलेले आहे. त्यामुळे भूखंडाच्या संदर्भात, ओव्हरलॅपिंगच्या संदर्भात, या दोन्ही कंपन्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य जे प्रश्न विचारतील त्या प्रश्नाचे उत्तर देण्यास मी तयार आहे.

प्रा. फौजीया खान : सभापति महोदय, क्या बिजली निर्माण प्रकल्प के लिए शहापुर तालुके में भूसंपादन की कार्यवाही शुरु की गई है, क्या इस प्रकल्प को मान्यता दी गई है, क्या रिलायन्स कंपनी को 3490 एकड़ जमीन और टाटा कंपनी को 1000 एकड़ जमीन एकही भूखंड पर अलाट की गई है, क्या रिलायन्स कंपनी के माध्यम से इस संबंध में ऑब्जेक्शन लिया गया है ?

....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 24456 .....

प्रा. फौजीया खान.....

22 फरवरी को हुई मंथली रिव्यू मीटिंग में टाटा कंपनी की तरफ से भी इस बारे में जानकारी रखी गई है. इसलिए मैं यह जानना चाहती हूं कि क्या शहापुर में बिजली निर्माण प्रकल्प के लिए भूसंपादन की कार्यवाही चल रही है और क्या एक ही भूखंड पर बिजली निर्माण प्रकल्प के लिए दो कंपनियों के साथ एग्रीमेंट किया गया है ?

यानंतर श्री शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 24456...)

श्री. दिलीप वळसे-पाटील : दिनांक 28.3.2005 रोजी या राज्यामध्ये 500 मेगावॅट पेक्षा जास्त क्षमतेचे प्रकल्प निर्माण करण्याच्या संदर्भात सभागृहामध्ये धोरण मांडले होते. या धोरणाला प्रतिसाद देऊन टाटा आणि रिलायन्स या दोन्ही कंपन्यांनी दिनांक 4.4.2005ला सामंजस्य करार केला. विद्युत अधिनियम 2003 अन्वये विद्युत निर्मितीसाठी शासनाची परवानगी घेणे आवश्यक नाही. याबाबतीत राज्य शासनाने फॅसिलिटेटरची भूमिका घेऊन त्यांना मदत करावयाची होती. रायगड जिल्ह्यामध्ये टाटा कंपनीने 1500 मेगावॅट आणि रिलायन्स कंपनीने 4000 मेगावॅटचा प्रकल्प सुरु करण्याचा निर्णय घेतला. रिलायन्स कंपनीने महसूल अधिनियमांतर्गत आणि टाटा कंपनीने एमआयडी ॲक्ट अंतर्गत जमीन संपादनासाठी सुरुवात केली. त्यानंतर दोन्ही कंपन्या एकाच परिसरामध्ये प्रोजेक्ट उभे करु इच्छित असल्याचे लक्षात आले. एकूण उपलब्ध जमिनी पैकी 421 हेक्टर जमीन हे दोन्ही कंपन्याचे ओव्हरलॅपिंग क्षेत्र आहे. यासंदर्भात 12.2.2007ला माननीय मुख्य मंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये बैठक झाली. त्यावेळी टाटा आणि रिलायन्स या दोन्ही कंपन्याचे प्रतिनिधी उपस्थित होते. रिलायन्स कंपनीने 2800 मेगावॅट गॅसबेस आणि 1200 मेगावॅट कोलबेस प्रोजेक्ट आणि टाटा कंपनी 1500 मेगावॅट गॅसबेस प्रोजेक्ट उभारणार आहे. या दोन्ही कंपन्यामध्ये लिटिगेशन होऊ नये असे शासनाला वाटते. दोन्ही कंपन्या वीज निर्मिती करणार असून हे दोन्ही प्रकल्प राज्यामध्ये असले पाहिजेत यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन्ही कंपन्यांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली आणि त्यांच्यामध्ये समझोता करुन आवश्यक असणारी जमीन दोन्ही कंपन्याना उपलब्ध करुन देण्याची भूमिका घेतली. ट्रॉम्बे येथे 250 मेगावॅट प्रकल्पाचे काम सुरु केलेले आहे. तो प्रकल्प 2008 पर्यन्त पूर्ण होईल अशी स्थिती आहे.

डॉ. दीपक सावंत : या सर्व प्रक्रियेला स्थानिक गावक-यांचा विरोध आहे हे खरे आहे काय? गावक-यांनी त्यांचा विरोध शासनाकडे नोंदविलेला आहे काय ? ओव्हरलॅपिंग होणा-या जागेची मालकी कोणाकडे आहे ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : आपल्याकडे रेव्हेन्यू ॲक्ट आणि एमआयडी ॲक्ट अंतर्गत कोणत्याही प्रोजेक्टसाठी जमिनी नोटीफाय केल्या जातात. या दोन्ही ॲक्ट अंतर्गत दोन्ही कंपन्यांनी परस्पर महसूल आणि उद्योग विभागाकडे प्रस्ताव सादर केले. त्यामुळे 421 हेक्टर इतके ओव्हरलॅपिंग क्षेत्र आहे. दोन्ही कंपन्या परस्पर काम करीत आहेत. हे प्रस्ताव महसूल आणि उद्योग विभागाकडे येतात. ऊर्जा विभागाचा याबाबतीत काही संबंध नाही. हे प्रकरण जेव्हा ऊर्जा विभागाकडे आले त्यावेळी उपलब्ध असलेल्या जमिनीपैकी काही जमीन रिलायन्स कंपनी आणि काही जमीन टाटा कंपनीला देण्याची भूमिका ऊर्जा विभागाने घेतली. कारण राज्याच्या हिताच्या दृष्टीने दोन्ही वीज प्रकल्प होणे आवश्यक आहे. यासंदर्भातील अंतिम निर्णय येत्या एक आठवड्यामध्ये घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : हे दोन्ही प्रकल्प व्हायला पाहिजेत. त्यांच्यामध्ये लिटिगेशन होता कामा नये. कारण त्यामध्ये महाराष्ट्राचेच नुकसान होणार आहे. काल माननीय मुख्यमंत्री एसईझेडसंबंधी बोलत असताना म्हणाले की, याबाबतीत पुनर्वसन ॲक्ट लावून त्याचा बेनिफिट शेतक-यांना दिला जाईल. रेव्हेन्यू ॲक्टच्या सेक्शन 6(4)ची कारवाई निगोशिएशन बेसिसवर करुन शेतक-यांच्या जमिनीला बाजारभावाची किंमत दिली जाईल ....

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

जेणेकरुन 4000 मे.वॅटसारख्या 16 हजार ते 20 हजार कोटीच्या प्रकल्प खर्चामध्ये 200 ते 300 कोटी रुपये शेतकऱ्यांसाठी अधिक खर्च झाला तरी हरकत नाही. परंतु निगोशिएशन करुन बाजारभावाने जमिनीची किंमत द्यावी. माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात एसईझेडसंबंधी निर्णय घोषित केलेला आहे. महसूल विभाग मात्र फार उत्साही आहे. मोठमोठ्या कंपन्यांना जमिनी संपादित करुन देण्यामध्ये त्यांचा विशेष उत्साह आहे आणि तो वाखाणण्यासारखा आहे. या प्रकरणामध्ये पुनर्वसन ॲक्ट लागू करण्याऐवजी निगोशिएशन करुन बाजारभावाने किंमत देण्याचे निदेश द्यावेत. तर तसे शासन करील काय?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, ही जमीन सरकार ॲक्वायर करणार नाही. ही जमीन या कंपन्यांनी संपादित करुन मागितल्यामुळे महसूल विभागाकडून एम.आय.डी.ॲक्टच्या माध्यमातून जमीन संपादित करण्याची कार्यवाही सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या जरुर लेखी स्वरुपामध्ये महसूल व उद्योग विभागाला कळविण्यात येतील.

उपसभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या सभागृहात उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री, माजी गृहमंत्री व माजी उपमुख्यमंत्री यांना जिवे मारण्याची धमकी दिल्याची बातमी सर्व वृत्तपत्रांमध्ये छापून आली आहे. जिल्हा परिषद निवडणुकांच्या संदर्भात त्यांनी घेतलेले निर्णय हा त्यांचा पक्षांतर्गत प्रश्न आहे. परंतु महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीपदावर असलेल्या एका व्यक्तीला त्यांच्या बंगल्यावरील फोनवर जिवे मारण्याची धमकी दिली जाते याबाबत खरी वस्तुस्थिती काय आहे हे सभागृहाला कळले पाहिजे. शासनाने त्यांना संरक्षण दिले पाहिजे. पाटणा येथे जाऊन त्यांनी शक्तीप्रदर्शन केल्यामुळे पक्षांतर्गत शत्रू निर्माण झाले, त्यांच्यापासून त्यांना धोका आहे का? कोणापासून धोका आहे? याबाबत त्यांनी स्पष्टीकरण करावे अशी विनंती आहे.

उपसभापती : सन्माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांच्यासारख्या व्यक्तीला धमकी येणे निश्चितपणे योग्य नाही. त्यांच्या संरक्षणात त्वरित वाढ करावी असे मी शासनाला निदेश देत आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : अशा संरक्षणाबद्दलचा प्रश्न सामान्य व्यक्तीच्या संदर्भात असला तरी तो महत्वाचा आहे. श्रीमती विमल त्र्यंबक सातोटे या नाशिकमध्ये राहणाऱ्या महिलेवर आणि तिच्या मुलीवर अत्याचार करण्यात आले, तिच्या घरावर दरोडा घालण्यात आला, तिच्या दुसऱ्या मुलीचा मृत्यू झाला. तिच्यावर बलात्कार देखील झाला होता. दोन दिवसांपूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने या घटनेमध्ये आरोपींना फाशीची शिक्षा सुनावली आहे. श्रीमती सातोटे यांनी पोलिसांना भेटून सांगितले की, माझ्या जिवाला धोका आहे. सध्या त्या जळगाव जिल्हयात राहतात. जळगाव जिल्हयाच्या एस.पी.कडे त्यांनी संरक्षणाची मागणी करुन देखील श्रीमती सातोटे यांना संरक्षण मिळाले नाही. सातोटे परिवाराला संरक्षण मिळावे अशी मी विनंती करते.

उपसभापती : सन्माननीय गृहराज्यमंत्र्यांनी या सातोटे परिवाराला संरक्षण देण्याची व्यवस्था करावी, याबाबत जळगावच्या एस.पी.ना कळवावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : होय.

उपसभापती : सन्माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ साहेब, पुन्हा धमकी आली तर मला जरुर कळवावे. I will take care.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, महाराष्ट्रातील अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी खाजगी बसेसची त्या संस्था चालकांकडून व्यवस्था करण्यात येते. या बसेसचे चालक असतात, ते शाळेचे नियमित कर्मचारी नसतात. या बस चालकांकडून मुलांचा मोठ्या प्रमाणात छळ केला जातो. शाळेत जाणाऱ्या मुलींवर चालकांकडून बलात्कार झाल्याच्या घटना अनेकदा घडल्या आहेत. बसमध्ये वाहकाची व्यवस्था नसल्यामुळे लहान मुले बसमध्ये चढताना व उतरताना अपघात होतात. दार बंद नसल्यामुळे चालत्या बसमधून विद्यार्थी पडण्याच्या घटना घडल्या आहेत. सदरचा विषय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाचा असल्यामुळे शालेय शिक्षण विभागाने खाजगी बसमधून विद्यार्थ्यांची ने-आण केले जाते, या संदर्भात संस्था चालकांना मार्गदर्शक तत्वे लागू करावीत अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील विषयावर औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो. "मी गत नागपूर अधिवेशनात तारापूर येथील मे. मिनलश्री केमिकल्स प्रा. लि. व एस.बी. व्होरा अँड कंपनी या दोन कंपन्यानी विक्रीकर भरणा न केल्याबाबतच्या तारांकित प्रश्नांची सूचना दिली होती तो प्रश्नच मी आपणास वाचून दाखवितो.

1) विक्रीककर विभागाच्या नोंदीनुसार तारापूर मुंबई येथील मे. मिनलश्री केमिकल्स प्रा. लि.व एस.बी. व्होरा ॲन्ड कंपनी, या दोन कंपन्या गेल्या सात आठ वर्षापासून बंद आहेत व त्यामुळे कंपन्याकडून विकीकर भरणा झालेला नाही हे खरे आहे काय? 2) असल्यास गेल इंडिया या कंपनीने सन 2001 ते 2005 या कालावधीत उपरोक्त दोन कंपन्याकडून लक्षावधी रुपयांचा माल खरेदी केलेला आहे हे ही खरे आहे काय ? 3) असल्यास याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय? चौकशीत काय आढळून आले आहे? 4) चौकशी अपूर्ण असल्यास ती केव्हा पूर्ण होणार आहे? असे प्रश्न उपस्थित केले होते.

सभापती महोदय, दिनांक 15 डिसेंबर, 2006 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्र. 23741 ला वित्त मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले आहे त्यामध्ये त्यांनी या दोनही कंपन्या गेल्या 7-8 वर्षापासून बंद आहेत व या कंपन्यानी उत्पादन न केल्यामुळे तसेच त्यांची विक्री न केल्यामुळे या कंपन्यांनी विक्रीकर भरणा केलेला नाही असे उत्तर दिलेले आहे. तसेच पुढे असेही म्हटले आहे की, गेल इडिया या कंपनीने सन 2001 ते 2005 या कालावधीत उपरोक्त दोन कंपन्याकडून कोणत्याही मालाची खरेदी केलेली नाही.

गेल इंडिया लि., भारत सरकारचा उपक्रम, या कंपनीच्या झोनल मॅनेजरचे दिनांक 24 एप्रिल, 2006 रोजीचे पत्र माझ्या हातात आहे. त्यामध्ये गेल इंडिया कंपनीने मे. मिनलश्री केमिकल्स प्रा. लि. व एस.बी.व्होरा अँड कंपनी या दोन कंपन्याकडून सन 2001 ते सन 2005 या कालावधीत किती मेट्रीक टन माल खरेदी केला आहे त्याची माहितीच सादर केली आहे ती आपणास मी वाचून दाखवितो.

मिनलश्री केमिकल प्रा. लि. या कंपनीने सन 2001-2002 मध्ये 119.328 मे.टन, 2002-2003 मध्ये 222.494 मे.टन, 2003-2004 मध्ये 215.400 मे.टन., 2004-2005 मध्ये 332.01 मे.टन., 2005-2006 मध्ये 235.81 मे.टन., तसेच एस.बी. व्होरा ॲन्ड कंपनीने सन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

2001-2002 मध्ये 95.372 मे.टन., 2002-2003 मध्ये 211.361 मे.टन., 2003-2004 मध्ये 252.52 मे.टन, तसेच 2004-2005 मध्ये 265.22 मे.टन मालाची पर्चेस केलेली आहे.

गेल (इंडिया) लि. ही केंद्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम कंपनी आहे व त्याचे झोनल मॅनेजर श्री. पी.के.गुप्ता यांनी ही माहिती दिनांक 24 एप्रिल, 2007 च्या पत्रान्वये मला दिली आहे. आमचे वित्तमंत्री मे. मिनलश्री केमिकल्स प्रा. लि. व व्होरा अँड कंपनी या दोन कंपन्या बंद असल्याचे आपल्या तारांकित प्रश्नाच्या उत्तरात सांगतात तर गेल इंडिया कंपनीचे झोनल मॅनेजर या दोन कंपन्याकडून घेतलेल्या मालाची आकडेवारी देतात. त्यामुळे मला असा प्रश्न पडला आहे की, यात खरे कोणाचे मानायचे? त्यामुळे कृपया यासंबंधिची पूर्ण माहिती या सभागृहाला व्हावी म्हणून मी औचित्याच्या मुद्या द्वारे हा प्रश्न उपस्थित करीत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी जो औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो तो मुद्दा माननीय अर्थमंत्र्यांशी संबंधीत आहे. आम्ही माननीय अर्थमंत्र्यांना दरवर्षी आग्रह करीत असतो की, माननीय राज्यपाल महोदयांनी जे काही निर्देश दिलेले आहेत ते तुम्ही बजेटच्या वेळी टेबल करावे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

त्याप्रमाणे आम्हाला अनुपालन अहवाल देखील द्यावा. आम्ही सभागृहाचे कामकाज बंद पाडल्याशिवाय, सभात्याग केल्याशिवाय आम्हाला ही कागदपत्रे मिळत नाहीत. मी माननीय वित्तमंत्र्यांना आठवण करुन देतो की, मागील वर्षी त्यांनी सभागृहात आश्वासन दिले होते की, पुढील वर्षी कागदपत्रे मागण्याची वेळ येणार नाही. माननीय राज्यपालांचे निर्देश आणि अनुपालन अहवालाच्या प्रती मागण्याचा अधिकार आम्हाला आहे. परंतु मागील तीन वर्षापासून ही कागदपत्रे देण्यास टाळाटाळ होत आहे. ही गोष्ट निश्चितपणे भूषणावह नाही. मराठवाडा, विदर्भ, कोकण आणि उत्तर महाराष्ट्रावर सातत्याने अन्याय होत आहे. घटनेच्या अनुच्छेद 371(8) मध्ये माननीय राज्यपालांचे निर्देश दिलेले आहेत. आजच्या वर्तमानपत्रात मी बातमी वाचली की, माननीय राज्यपालांच्या निर्देशाची अंमलबजावणी होत नाही म्हणून त्यांनी कंटाळून माननीय पंतप्रधानांना एक पत्र लिहिले आहे. ही गोष्ट खरी असेल तर महाराष्ट्राच्या इतिहासातील ही दुर्दैवी घटना आहे. सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे निर्देश, अनुपालन अहवाल आणि माननीय राज्यपालांनी माननीय पंतप्रधानांना पाठविलेले पत्र याबाबत वित्तमंत्र्यांकडून खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, काल मी आपणाकडे माननीय उपमुख्यमंत्र्यांना देण्यासाठी सी.आय.डी.चौकशी करण्यासंदर्भातील एक पत्र दिले होते. ते पत्र त्यांच्यापर्यंत पोहोचलेले दिसत नाही. माझी कागदपत्रे त्यांच्याजवळ का पोहोचत नाहीत हे मला कळत नाही.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे दिलेले पत्र माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात देण्यात आलेले आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझ्याकडे अजून ते पत्र पोहोचलेले नाही. मी माझ्या कार्यालयात चौकशी करतो आणि पत्र तपासून घेतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, त्या पत्राची झेरॉक्सप्रत मी आपल्यामार्फत आता माननीय उपमुख्यमंत्र्यांना देतो.

(पत्राची प्रत माननीय उपमुख्यमंत्र्यांना देण्यात आली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, अर्थसंकल्पामध्ये प्रोजेक्टवाईज प्रोव्हीजन करावी असे माननीय राज्यपालांचे निर्देश होते. त्याप्रमाणे या वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये पहिल्यांदाच कोणते प्रकल्प घेत आहोत त्याची विभागवार माहिती जलसिंचन पुस्तकात दिलेली आहे. त्याचबरोबर विभागवार एकत्रित रकमा आहेत त्याचा अनुपालन अहवाल ताबडतोब सभागृहासमोर ठेवण्यात येईल. माननीय राज्यपालांनी माननीय पंतप्रधानांना पत्र लिहिले आहे अशा आशयाची बातमी मी देखील वर्तमानपत्रात वाचली. त्या संबंधीचा तपशील आता माझ्याकडे उपलब्ध नसल्यामुळे त्यावर आता भाष्य करणे योग्य होणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अकोला माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 1991-92, 1992-93, 1993-94, 1994-95, 1995-96, 1996-97 आणि 1997-98 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले.

श्री.गणेश नाईक: सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने जळगाव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 1992-93, 1993-94, 1994-95, 1995-96, 1996-97, 1997-98 व 1998-99 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले. .

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माल वाहतूक कामगार मंडळाच्या (मुंबई) सन 2000-2001, 2001-2002 चा तिसावा व एकतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय असुरक्षित कामगांराबद्दल सतत बोलतात. मग, हा अहवाल उशिराने येण्याची कारणे काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, हा अहवाल सन 1995 चा असून त्यावेळी आपण एकत्रित काम करीत होतो. ही गोष्ट खरी आहे की, काही गोष्टीमुळे अहवाल मांडण्यास दिरंगाई होते. परंतु यास सगळेच जबाबदार आहेत.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी "डिसेंबर, 2006 मध्ये मुंबईच्या ऑर्थररोड जेलमध्ये कैद्यांच्या दोन टोळयांमध्ये झालेल्या मारामारीत एका कैद्याचा मृत्यू होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, सागर मेघे यांनी "सहसंचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी अधिकार नसताना लाखो रुपयांच्या साहित्याची केलेली खरेदी तसेच नियमबाहय केलेल्या कर्मचाऱ्यांच्या भरतीबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रतापराव सोनवणे, पाशा पटेल, श्रीकांत जोशी यांनी "गोंद्रे दुमाला, ता.इगतपुरी, जि.नाशिक या कार्यक्षेत्रातील जमिनी मुकणे धरण, राष्ट्रीय महामार्ग, औद्योगिक वसाहत, लष्करी सराव इत्यादीसाठी संपादन केल्यामुळे शेतकरी भूमिहीन झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, वसंतराव खोटरे यांनी "राज्याच्या विदर्भ व मराठवाडा या भागात आगामी शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी कडक उन्हाळयात शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व उन्हापासून विद्यार्थ्यांचे संरक्षण करण्यासाठी योग्य ती व्यवस्था केली नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "वांद्रे-कुर्ला संकुलातील जी ब्लॉकमधील भूखंड वाणिज्य संकुल उभारण्यासाठी रिलायन्स इंडस्ट्री व अन्य खाजगी कॉर्पोरेटना वाटप केला असून त्यात एमएमआरडीएकडून नगररचना विकास नियंत्रण नियमावलीत बदल करुन वाढीव चटईक्षेत्र देत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती...

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी "भारतीय संविधानाच्या खंड 371 (2) नुसार माननीय राष्ट्रपतींनी दिनांक 9 मार्च, 1994 रोजी महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र) यासाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी आदेश प्रख्यापित करुन विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळ आदेश 1994 निर्गमित करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. परंतु याबाबत शासनाने निवेदन करावे.

उर्वरित सर्व 93 च्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकरीत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, "खोलखेड, ता.खामगाव, जि.बुलडाणा येथे ऑगस्ट,2006 मध्ये अतिवृष्टी व पुरामुळे नागरिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याने त्यांना अद्यापि मदत न मिळणे" या विषयावर मी नियम 93 अन्वये सूचना दिली असून त्यासंबंधी शासानाने निवेदन करावे, अशी माझी आपल्यामार्फत शासनास विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे. सदर सूचनेस दालनात अनुमती नाकारलेली आहे, तरी याबाबत शासनाने निवेदन करावे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मला एक निवेदन करावयाचे आहे.

उपसभापती : मंत्री महोदय, निवेदने सोमवारी घेण्यात येतील. आता आपण लक्षवेधी सूचनांवरील चर्चेस सुरुवात करुया.

..4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नाशिक कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये पाच शेतकऱ्यांना अमानुष मारहाण होणे

मु. शी. : नाशिक कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये पाच शेतकऱ्यांना अमानुष मारहाण होणे यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे सय्यद पाशा पटेल, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक 14 फेब्रुवारी, 2007 रोजी नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पाच शेतकऱ्यांना अमानुष मारहाण होणे, दोन महिन्यात चार शेतकऱ्यांना मारहाणीचे प्रकार होणे, तथापि मारहाण करणाऱ्यांवर एकही वेळा दखलपात्र गुन्हा नोंदविण्यात न येणे, राज्याच्या पणन संचालकांनी मारहाण प्रकरणी तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्यानंतर संबंधितांवर कोणत्याही प्रकारची कारवाई न होणे, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांच्या हस्तकांकरवी शेतकऱ्यांना रिंगण करुन लाथा-बुक्क्यांनी मारहाण करण्याच्या प्रकारामुळे शेतकरी वर्गात पसरलेले संतापाचे व भितीचे वातावरण, पणन व पोलीस विभागाने याप्रकरणी एकत्रित कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेमध्ये असे म्हटले होते की, "दिनांक 14 फेब्रुवारी, 2007 रोजी नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पाच शेतक-यांना अमानुष मारहाण झाली." लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात मात्र अशा प्रकारची मारहाण झाली नसल्याचे नमूद केले आहे. नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे काही पदाधिकारी कालपर्यन्त माझ्याशी दूरध्वनीवरुन संपर्कात होते. माझा प्रश्न असा आहे की, दिंडोरी तालुक्यातील जामखेड येथील शंकर मोरे, विजय मोरे, सुनील मोरे, रामभाऊ मोरे व नारायण मोरे या शेतक-यांना आपल्या मालाचा ट्रक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात उभा करण्यासाठी जागा हवी होती. परंतु, त्या ठिकाणी सात-आठ गुंडांना बोलाविण्यात आले व जे शेतकरी आपला माल घेऊन उभे होते त्यांना तेथून पळविण्याचा प्रयत्न केला, त्यांना मारहाण केली, रिंगण केले आणि लाथाबुक्क्यांनी मारले, या मारहाणीबाबतचा अहवाल शासनाचे सहकार व पणन सचिव, श्री.जे.पी.डांगे यांनी मागविला असून पणन संचालक, श्री.वाय.डी.खवाडे हे तपास करीत आहेत, मारहाण झाली यासंबंधी अहवाल त्यांनी मागविला आहे, संबंधितांवर कारवाई करण्याबाबतच्या सूचना पणन संचालकांनी दिल्या आहेत, नाशिक शहराचे पोलीस आयुक्त, श्री.हिमांशु रॉय यांच्याकडे विधानसभेचे सन्माननीय सदस्य, श्री.राजू शेट्टी यांनी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पोलीस स्टेशनमध्ये कुठलीही तक्रार दाखल झालेली नाही. संबंधितांनी पोलिसांकडे तक्रार केलेली नाही. 14 तारखेला झालेल्या प्रकाराबाबतची नोंद पोलीस स्टेशनमध्ये नाही. मात्र, दिनांक 8/12/2006 रोजी एक पत्र पोलीस आयुक्तांना प्राप्त झाले असून त्यामध्ये बाजार समितीमध्ये जागा मिळत नाही, लिलाव होत नाही, शेतक-यांना त्रास होतो, हमाल लोक योग्य प्रकारे काम करीत नाहीत, यासंबंधी तक्रार करण्यात आली आहे. लगेच 9/12/2006 रोजी आयुक्तांनी स्थानिक पोलीस निरिक्षक, बाजार समितीचे पदाधिकारी, सचिव, व्यापारी यांच्यासमवेत बैठक घेतली व शेतक-यांच्या अडचणींबाबत सूचना दिल्या.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, प्रस्तुत प्रकरण ज्या रतीने सरकार हाताळीत आहे, ते योग्य नाही. त्या ठिकाणी शेतक-यांना मारहाण झाली आहे आणि पणन संचालकांव्दारा या घटनेची चौकशी करण्याचे आदेशही झाले आहेत. पोलीस स्टेशनमध्ये शेतक-यांची तक्रार घेतली गेली नाही म्हणून शेतकरी संघटनेचे आमदार, श्री.राजू शेट्टी यांनी पोलीस आयुक्तांना पत्र

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

पाठविले, त्यामध्येही मारहाणीचा उल्लेख आहे. बाजार समितीमध्ये एवढया मोठया प्रमाणात मारहाण झाल्यानंतर व त्यांसबंधीची तक्रार केल्यानंतरही कोणाच्या दबावामुळे सरकार या घटनेची दखल घेत नाही ? म्हणून या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता आहे. तसेच जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशीही अपेक्षा आहे. अशी कारवाई शासन करणार काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, शेतक-यांना व्यापा-यांकडून मारहाण होणे हे या राज्यामध्ये कधीही सहन केले जाणार नाही. एक गोष्ट खरी आहे की, पणन संचालकांना जे पत्र देण्यात आले होते त्यामध्ये शेतक-यांना मारहाण होते, एवढाच उल्लेख आहे, पोलीस स्टेशनमध्ये कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, व्यापा-यांच्या दबावामुळे शेतक-यांची तक्रार पोलीस स्टेशनने दाखल करुन घेतलेली नाही. सन्माननीय सदस्य, श्री.राजू शेट्टी यांनी एका मेळाव्यामध्ये या घटनेचा निषेध केला आणि पोलीस आयुक्तांकडे तक्रार केली.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आहे ती मी सांगितली. तरी देखील विरोधी पक्षनेत्यांनी दिलेली माहिती ग्राहय मानून दुस-या जिल्हयातील आय.पी.एस.अधिका-यामार्फत तातडीने या प्रकरणाची चौकशी केली जाईल.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, लातूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विष्णू पंडित पवार हा व्यापारी तूर खरेदीमध्ये 10 ते 14 किलो वजन प्रत्येक पोत्यामागे कमी करुन घ्यायचा. हा प्रकार वर्षानुवर्षे चालत होता. हा प्रकार परवा उघडकीस आला आहे.

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल.....

दोन व्यापा-यांपैकी एकाचे लायसन्स 15 दिवसांपुरते रद्द केले व दुसऱ्याला काही दिवसातच काही कारवाई न करता मोकळे सोडून देण्यात आले. हे असेच चालणार आहे का ? शेतक-यांना मारहाण करणा-यांवर कठोर कारवाई कधी केली जाणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, हे सर्व प्रकरण माझ्याकडे सोपविण्यात यावे, मी सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन लवकरात लवकर गुन्हेगारांना शासन होण्याबाबत कारवाई करीन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

R -2....

लक्षवेधी क्रमांक 2 पुढे ढकलण्याबाबत.

उपसभापती : लक्षवेधी क्रमांक 02 च्या चर्चेला माननीय राज्यमंत्री महोदय श्री.राजेश टोपे हे उत्तर देणार आहेत, ते आता विधानसभेतील कामकाजात व्यस्त असल्यामुळे सदर लक्षवेधी पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री.संजय दत्त : लक्षवेधी सूचना देणारे सन्माननीय सदस्य जर सभागृहात अनुपस्थित असतील तर त्याबाबत आक्षेप घेतला जातो. आता माननीय राज्यमंत्री महोदय या सभागृहात उपस्थित नाहीत. आपण सभागृहाची बैठक 10 मिनिटे स्थगित करुन मंत्रिमहोदयांना बोलाविण्याबाबत निरोप पाठवा, आम्ही थांबावयास तयार आहोत.

श्री.मधु चव्हाण : शासन मुंबईतील गिरणी कामगारांकडे नेहमीच दुर्लक्ष करीत आलेले आहे. गिरणी कामगारांच्या प्रश्नावर आधारित असलेली सदर लक्षवेधी सूचना आताच घेण्यात यावी, आम्ही थांबावयाला तयार आहोत.

श्री.संजय दत्त : महोदय, सभापती महोदय, सदर विषय अत्यंत गंभीर आहे.

डॉ.दीपक सावंत : लक्षवेधी क्रमांक 2 आताच घेण्यात यावी.

उपसभापती : ठीक आहे. सदर लक्षवेधी सूचना थोडया वेळात घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 3 बाबत</u>.

उपसभापती : प्रा.फौजिया खान, विधानपरिषद सदस्या या आता सभागृहात उपस्थित नसल्याकारणाने लक्षवेधी सूचना क्रमांक 3 पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान या आता सभागृहात उपस्थित होत्या, त्या कुठे गेल्या ? सदर विषय सभागृहात चर्चेला येऊ नये असे त्यांना वाटत होते का ? सदर लक्षवेधी सूचनेचा विषय हा अतिशय महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी हे सभागृहात उपस्थित आहेत, त्यांनी उभे राहून बोलावे, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुरबाड तालुक्यातील माळ परिसरातील शाळांमध्ये फेब्रुवारी,2007 पासून विद्यार्थ्यांना पोषक आहार देणे बंद करणे.

मु.शी.: मुरबाड तालुक्यातील माळ परिसरातील शाळांमध्ये फेब्रुवारी,2007 पासून विद्यार्थ्यांना पोषक आहार देणे बंद करणे याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे व सर्वश्री.जितेंद्र आव्हाड,गुरुनाथ कुलकर्णी,भास्कर जाधव,श्रीमती फौजिया खान, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुरबाड तालुक्यातील माळ परिसरातील लाकुडपाडा,खुटलवाडी,मान्याची वाडी,जांभुळवाडी,वडाची वाडी,भोगवाडी,कोचेरे नं.1 व 2 या शाळांमध्ये माहे, फेब्रुवारी,2007 पासून विद्यार्थ्यांना खिचडी (पोषण आहार) देण्याचे बंद करणे,त्यामुळे येथील 61 विद्यार्थी आजपर्यंत खिचडीपासून उपाशीपोटी राहत असणे, रेशनिंग दुकानदार तांदूळाचा पुरवठा वेळेवर करीत नसल्याने शिक्षक वर्गाकडून विद्यार्थ्यांना केळी,बिस्किटे असा आहार आठवडयातून दोन वेळाच देण्यात येणे,परिणामी स्थानिक आदिवासी विद्यार्थी,पालक व शिक्षक वर्गात पसरलेले तीव्र चिंतेचे वातावरण,शासनाच्या पोषण आहार योजनेतून विद्यार्थ्यांना वेळीच पोषणमूल्य मिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

प्रा. वसंत पुरके (शाले शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महाराज,लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : माननीय सभापती महोदय, माझे लक्षवेधी सूचनेवरील उत्तराने समाधान झालेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>लक्षवेधी क्रमांक 4 पुढे ढकलण्याबाबत</u>.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी विनंती केल्याप्रमाणे लक्षवेधी क्रमांक 4 दिनांक 28 मार्च,2007 रोजी घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

पृ.शी.: चोंढे,ता.शहापूर,जि.ठाणे येथील प्रकल्प विद्यालयातील शिक्षकांना 24 महिन्यापासून वेतन न मिळणे

मु.शी.: चोंढे,ता.शहापूर,जि.ठाणे येथील प्रकल्प विद्यालयातील शिक्षकांना 24 महिन्यापासून वेतन न मिळणे याबाबत श्री.रामनाथ मोते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते,यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" प्रकल्प विद्यालय,चोंढे,ता.शहापूर,जि.ठाणे या शाळेतील शिक्षकांनी 24 महिन्यापासून वेतन न मिळाल्याने आत्महत्या करण्याचा दिलेला इशारा "

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सदर विषय विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सभागृहात मांडू इच्छितो. ठाणे जिल्हयामध्ये शहापूर तालुक्यात घाटघर येथे जलसंपदा विभागाचा प्रकल्प सुरु आहे. या प्रकल्पासाठी काम करणारे जे कर्मचारी, अधिकारी आहेत, त्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्या ठिकाणी प्रकल्प विद्यालय सुरु करण्यात आलेले आहे. सदर विद्यालय ही शासनमान्य शाळा आहे. " विशेष बाब " म्हणून या प्रकल्प विद्यालयांना पाचवी ते दहावी पर्यंतच्या वर्गांना मान्यता मिळालेली आहे. सदर विद्यालय हे विनाअनुदान असल्यामुळे कसलेही वेतनेतर अनुदान या शाळांना मिळत नाही. आदिवासी भागातील शाळा म्हणून या प्रकल्प विद्यालयांना 100 टक्के अनुदान मिळावयास सुरुवात झालेली आहे.

यानंतर श्री.बोरले.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

24-03-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) S-1

GRB/ KGS/ KTG/ प्रथम कु.खर्चे 12:30

श्री.रामनाथ मोते .....

शासनाच्या आदेशामध्ये नजरचुकीने किंवा दुर्लक्ष झाल्यामुळे इयत्ता 5 वी ते 10 वी असा उल्लेख करण्याऐवजी इयत्ता 8 वी ते 10 वी असा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे फक्त इयत्ता 8 वी ते 10 वी पर्यंतच अनुदान मिळत आहे. इयत्ता 5 वी ते 7 वी पर्यंत अनुदान मिळत नाही. जोपर्यंत अनुदान मिळत नव्हते तोपर्यंत शिक्षकांचे वेतन जलसंपदा विभागामार्फत होत होते. इयत्ता 8 वी ते 10 पर्यंत अनुदान मिळत असल्यामुळे त्या शिक्षकांना शासनाकडून वेतन मिळते. परंतु आता ही शाळा अनुदानित झाल्यामुळे जलसंपदा विभागाकडून शाळेला मिळणारे अनुदान बंद झालेले आहे. त्यामुळे मागच्या दोन वर्षापासून इयत्ता 5 वी ते 7 वी पर्यंतच्या शिक्षकांना वेतन मिळालेले नाही. ते शिक्षक विनावेतन काम करीत आहेत. त्या शिक्षकांना शासनाकडूनही वेतन मिळत नाही आणि जलसंपदा विभागाकडूनही वेतन मिळत नाही. वेतन न मिळाल्यामुळे शिक्षकांच्या कुटुंबाची होणारी उपासमार आणि त्यांनी आत्महत्या करण्याचा दिलेला इशारा, ही बाब मी या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. शासनाने याबाबत कार्यवाही करावी आणि शिक्षकांचा प्रश्न सोडवावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करतो.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : उमरेड शहरात दिनांक 6 फेब्रुवारी, 2007 रोजी वीज भारनियमनाविरोधात शहरातील सामान्य नागरिकांनी वीज मंडळाच्या कार्यालयावर काढलेल्या मार्चाबाबत.

मु. शी. : उमरेड शहरात दिनांक 6 फेब्रुवारी, 2007 रोजी वीज भारनियमनाविरोधात शहरातील सामान्य नागरिकांनी वीज मंडळाच्या कार्यालयावर काढलेल्या मार्चाबाबत श्री.नितीन गडकरी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.नितीन गडकरी यां□□ ए□ विशेष उल्ले□□ची सूच□□ दिली आहे, त्यां□□ ती मांडावी.

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□ची सूच□□ मांडतो.

"उमरेड शहरात दिनांक 6 फेब्रुवारी, 2007 रोजी वीज भारनियमनाविरोधात शहरातील सामान्य नागरिकांनी उत्स्फूर्तपणे वीज मंडळाच्या कार्यालयावर मोर्चा काढला असता त्या मोर्चामध्ये शहरातील सर्वसामान्य नागरिक, बहुतांश महिला व शाळेतील विद्यार्थी सुद्धा सामील होते. सदरहू मोर्चा हा उपविभागीय कार्यालय उमरेड येथे गेला असता तेथील उपविभागीय अधिकाऱ्यांनी मोर्चातील नागरिकांच्या शिष्टमंडळाचे निवेदन स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला. अगोदरच वीज भारनियमनामुळे त्रस्त झालेले नागरिक व त्यामध्ये उपविभागीय अधिकाऱ्यांनी निवेदन घेण्यास दिलेला नकार आणि मोर्चाला सांभाळण्याकरिता पोलिसांनी वेळीच कोणतीही उपाययोजना न केल्यामुळे घटना स्थळी जमलेल्या सर्व नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आणि त्यामुळे नागरिक व महिला मोठया संख्येने संबंधित अधिकाऱ्यांच्या विरोधात नारेबाजी करीत होते. परंतु पोलिसांनी मोर्चेक-यांवर लाठीचार्ज करुन पोलीस अधीक्षकांच्या आदेशाने सामान्य नागरिकांवर व महिलांवर गोळीबार केला व त्यामध्ये तीन लोक मरण पावले. तसेच पोलीस अधीक्षक श्री.यादव यांनी एका 64 वर्षाच्या वृद्ध महिला श्रीमती सविता बल्लाळ यांना प्रत्यक्ष मारहाण करुन त्यांची सून सौ.मनुश्री बल्लाळ यांना घरातून खेचत लगतच्या चौकात नेले व त्यांच्यावर अत्याचार केला. तसेच श्री.यादव यांनी वृत्तपत्राच्या छायाचित्रकारांना सुद्धा मारहाण करुन घटनास्थळाचे फोटो काढण्यास मनाई करुन त्यांचे रोल व कॅमेरा हिसकले.

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

30 ते 40 लोक पोलिसांच्या गोळीबारात जखमी झाले. जे लोक मोर्चामध्ये सुद्धा सामील झाले नाहीत अथवा घराच्या बाहेरही निघाले नाहीत अशा लोकांना सुद्धा श्री.यादव, पोलीस अधीक्षक यांनी रस्त्यावरुन जातांना व त्यांच्या घरातून ओढत आणून त्यांना पोलीस कोठडीत बंद केले ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. पोलीस अधीक्षक यांच्या बेजबाबदार पणामुळे एवढी मोठी घटना घडलेली आहे. त्यामुळे सर्वप्रथम त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच पोलीस स्टेशनच्या ज्या लोकांनी सामान्य नागरिकांवर लाठीचार्ज केलेला आहे व महिलांना घरातून ओढत बाहेर आणलेले आहे त्या पोलिसांवर सुद्धा कारवाई करण्यात यावी. तसेच मृत पावलेल्या व्यक्तिंच्या कुटुंबियांना पाच लक्ष रुपयांची आर्थिक मदत देण्यात येऊन त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरी त्याचप्रमाणे गोळीबारामध्ये जखमी झालेल्या रुग्णांना सुद्धा आर्थिक मदत देण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

ही अत्यंत सार्वजनिक व गंभीर बाब असून या बाबीवर सभागृहामध्ये चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. तरी याबाबत मला विशेष उल्लेख करण्यास परवानगी देण्यात यावी."

सभापती महोदय, दिनांक 6 फेब्रुवारी, 2007 रोजी विद्युत भारनियमानाच्या विरोधात उमरेड शहरातील सामान्य नागरिकांनी उत्स्फूर्तपणे शासनाच्या विरोधात मोर्चा काढला. सर्व पक्षाचे कार्यकर्ते, नेते या मोर्चामध्ये सहभागी झाले होते. हा मोर्चा गंगापूर चौकातून सुरु होऊन आझाद चौक, डेकाटे चौक, जीवनविकास चौक, जुने मोटारस्टँड मार्गे उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयावर नेण्यात आला. एस.डी.ओ. यांच्या कार्यालयावर हा मोर्चा आला असता मोर्चाचे नेतृत्व करणा-या सामान्य नागरिकांच्या शिष्टमंडळाने उपविभागीय अधिका-यांना प्रत्यक्ष भेटून मोर्चासमोर येऊन निवेदन स्विकारण्याची विनंती केली. परंतु एस.डी.ओ. यांनी निवेदन घेण्यास नकार देऊन मोर्चा परत नेण्यास सांगितले व जर आपण मोर्चा परत नेला नाही तर पोलिसांकरवी तुमच्यावर कारवाई करण्यात येईल अशी धमकी दिली. तुमचे निवेदन माझ्याकडे द्या, ते निवेदन मी शासनाकडे देईन, असे जर एस.डी.ओ. यांनी सांगितले असते तर लोकांचा रोष कमी झाला असता. या मोर्चामध्ये चार गाडया जाळल्या गेल्या. पोलिसांच्या गोळाबारामध्ये चार लोकांचा मृत्यू झाला. माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील सभागृहामध्ये उपस्थित नाही. तरीही मी असे

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

नमूद करु इच्छितो की, अशा परिस्थितीमध्ये पोलीस बेजबाबदारपणे कसे वागतात, याचे हे उदाहरण आहे. पोलिसांकडून ज्या पद्धतीने परिस्थिती हाताळली गेली ती दुर्दैवी आहे. चौथ्या मजल्यावर एम.टी.एन.एल.मध्ये काम करणा-या माणसाला गोळी मारली गेली. गोळी लागल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. मी त्याच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी त्याच्या कुटुंबियांनी त्याला गोळी मारण्याचे कारण काय ? अशी माझ्याकडे विचारणा केली. त्याचे उत्तर मी देऊ शकलो नाही. उमरेड शहरातील नागरिकांना घराच्या बाहेर काढून 65 वर्षाची महिला श्रीमती सविता बल्हाळ यांना धक्का मारला व त्यांच्या सुनेला ढकलून दिले आणि त्यांचा मोबाईल घेऊन गेले. मी पोलिस स्टेशनमध्ये गेलो आणि त्यांना सांगितले की, तुमचे वागणे बरोबर नाही. त्यावेळी त्यांनी मला असे सांगितले की, मी त्यांचा मोबाईल परत करतो. एका 65 वर्षाच्या महिलेला आणि तिच्या सुनेला ढकलले गेले. वर्तमानपत्राच्या छायाचित्रकाराला मारहाण करण्यात आली. सभापती महोदय, हे काय सुरु आहे ? लोडशेडींग रद्द करण्याची मागणी करणा-या मोर्चातील नागरिकांना मारहाण करुन त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला, ही गोष्ट दुर्दैवी आहे, मनाला क्लेश देणारी आहे.

यानंतर श्री.गागरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

या प्रकरणामध्ये सांगण्यास वाईट वाटते की, तेथील लोकांवर गुन्हे दाखल केलेले असून त्यांना त्रास देणे सुरु आहे. सर्व पक्षाचे कार्यकर्ते त्यामध्ये आहेत. मी त्यांना समजावले, त्यावेळी वातावरण शांत झाले आहे. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांनी हा उद्रेक केलेला नसून भारनियमनाच्या विरोधात तेथील जनतेचा हा उद्रेक होता. या प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये अजूनही निरनिराळया केसेस दाखल करण्याचे व अटक करण्याचे काम सुरु आहे. शासनाने गोळीबारात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीस मदत केलेली नाही परंतु गोळीबाराची चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. माझी विनंती आहे की, लोड शेडींगच्या परिस्थितीमुळे लोकांमध्ये अशांतता व नाराजी आहे, मुलांचे भविष्य उद्ध्वस्त होत आहे, शेतकऱ्यामध्येही नाराजी पसरत आहे. सर्वांच्या भावना तीव्र स्वरुपाच्या आहेत. गोळीबार करणे हा त्यावरील उपाय नाही. अशी प्रकरणे कशा प्रकारे हाताळावीत यासाठी प्रशासनाला समज व प्रशिक्षण देण्याची गरज आहे. क्रिमीनल केसेस हया वेगळया स्वरुपाच्या असतात, या प्रकरणातील सर्वांना क्रिमीनल म्हणून वागणूक देणे योग्य नाही.

सभापती महोदय, उमरेड येथे घडलेल्या घटनेबाबत माझी शासनाला विनंती आहे की, या प्रकरणाशी ज्यांचा काहीही संबंध नाही परंतु त्यांच्यावर केसेस दाखल झालेल्या आहेत, त्या केसेस आपण परत घ्याव्यात. शासनाने लोकांच्या जखमेवर मीठ चोळण्याऐवजी मलम लावले पाहिजे, जखम भरुन आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. अशी प्रकरणे कशा प्रकारे हाताळावीत त्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात याव्यात. विशेष उल्लेखाच्या माध्यमातून अशा प्रकारची विनंती मी सरकारला व प्रशासनाला करीत आहे.

उपसभापती : लक्षवेधी सूचना क्र.2 वर उत्तर देण्यासाठी माननीय राज्यमंत्री आता सभागृहात उपस्थित झाले असल्यामुळे लक्षवेधी सूचना क्र.2 सन्माननीय सदस्यांनी मांडावी.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबईतील गिरणी कामगारांवर झालेला अन्याय.

मु.शी. : मुंबईतील गिरणी कामगारांवर झालेल्या अन्यायासंबंधी सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक, धनाजी साठे, सुधीर सावंत वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"मुंबई येथील स्टॅण्डर्ड, मोरारजी, पिरामल, मफतलाल, कमला, स्वान, रुबी, बॉम्बे डाईंग, कोहिनूर, एल्फिन्स्टन, न्यूहिंद व अपोलो इत्यादी २९ गिरण्या बंद पडल्या त्यावेळी गिरणी मालकांकडून गिरणी कामगारांची मोठ्याप्रमाणात फसवणूक करण्यात आली होती, त्याचप्रमाणे आताही गिरण्यांचा जमीन विकास करतेवेळी गिरणी कामगारांना किमान ५० हजार घरांची आवश्यकता असताना या २९ गिरण्यांच्या विकासात या कामगारांना फक्त ८ हजार ६८० घरे देण्यात येणार असल्याचे माहे मार्च, २००७ च्या पहिल्या आठवड्यात आढळून येणे, यामुळे या गिरणी कामगारांची सतत फसवणूकच होत असणे, गिरणी कामगारांच्या घरासाठी जेमतेम १८ ते २० एकर जागा देण्याचे निश्चित करण्यात येणे, यामुळे गिरणी कामगारांवर फार मोठा अन्याय होत असल्यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेला असंतोष व संतापाची भावना, सबब गिरणी कामगारांना त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे ५० हजार घरांची पूर्तता करण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मुंबईतील कापड गिरण्या बंद पडलेल्या असून हजारो कामगार बेरोजगार झालेले आहेत. त्यांना न्याय देण्याची वेळ उलटून गेली आहे. त्यांना घरे देण्याच्या नावाखाली आजही त्यांच्या वाटयाला फसवणूक येत आहे. हा फार गंभीर प्रश्न आहे. या अनुषंगाने माझे तीन प्रश्न आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, गिरण्यांच्या जमिनीचा 1/3 हिस्सा महानगर पालिका, म्हाडा व मालक यांच्यामध्ये विभागणीची तरतूद होती. या तरतुदीनुसार आतापर्यंत किती गिरण्यांच्या जमिनीची विभागणी करण्यात आली आहे, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, गिरण्यांच्या जमिनीवर राहणाऱ्या रहिवाश्यांना 225 चौरस फूट चटई क्षेत्राची सदनिका देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या तरतूदीनुसार किती कामगारांना सदनिका देण्यात आल्या आहेत ? व माझा तिसरा प्रश्न असा आहे की, याबाबत कामगारांना 64 कोटी रुपयांची देणी अद्याप देण्याचे बाकी आहेत, त्याबद्दल कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली 1991 मधील नियम 58 मध्ये 2001 मध्ये बदल करण्यात आलेला होता. त्याप्रमाणे मुंबईतील कापड गिरण्यांच्या मोकळी जागा व शिल्लक चटई क्षेत्र यांची विभागणी साधारणत: 1/3 हिस्सा बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडास व मालक याप्रमाणे करण्याची कायद्यात तरतूद आहे. साधारणपणे 1 लाख 36 हजार 223 स्क्वेअर मीटर जमीन महानगरपालिकेला मिळणार आहे. म्हाडाला 1 लाख 35 हजार 434 स्क्वेअर मीटर मिळणार आहे. अशा पध्दतीने नवीन नियमाप्रमाणे जमिनीची विगतवारी होणार आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात म्हाडास प्राप्त झालेल्या क्षेत्राची जी आकडेवारी देण्यात आलेली आहे, त्यामध्ये तफावत आहे. म्हाडाला नेमके किती क्षेत्र मिळाले आहे ?

.... नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत/शोधनीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ते 24,287 असे आहे आणि तो गिरण्यांच्या विकासाचा प्रस्ताव आहे. मी येथे सांगितलेले आकडे योग्य आहेत. मी येथे एकूण मिळणार असलेली जमीन सांगितली आहे. सभापती महोदय, मुंबइत एकूण 58 गिरण्या आहेत आणि त्यापैकी 47 बंद पडलेल्या आहेत आणि पुनर्विकासाचा प्रस्ताव त्या 47 पैकी 33 गिरण्यांनी दाखल केलेला आहे. सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात अधिकची माहिती मी एवढीच देऊ इच्छितो की, या गिरण्यांतील कामगारांची देणी ही जवळ जवळ 887 कोटी 36 लाख इतकी दिलेली आहेत आणि एकूण देय रक्कम 951 कोटी आहे. त्यामुळे जी 64 कोटीची देणी आहेत ती देण्याच्या दृष्टीने शासनाच्या वतीने कारवाई सुरू आहे व लवकरात लवकर नगरविकास विभागाच्या मार्फत हा प्रश्न सोडविला जाईल. सभापती महोदय, यामध्ये कामगारांच्या दष्टिकोनातून जी देयके आहेत ती देण्याची व्यवस्था त्यासाठी असलेली समिती आणि एस्क्रो अकाऊंटच्या माध्यमातून होत आहे. तसेच तेथे गिरण्यांच्या जमिनीवर ज्या कामगारांच्या चाळी आहेत त्यात राहणाऱ्या कामगारांना 225 चौ.फूटाच्या सदनिका मोफत दिल्या जाणार आहेत आणि जे गिरणी कामगार गिरण्यांच्या बाहेर इतरत्र रहात असतील त्यांना म्हाडाला गिरणीच्या जमिनीपैकी मिळणारी जी जमीन आहे त्यातील 50 टक्के जमीन कामगारांना घरे देण्यासाठीच वापरता येणार आहे, त्यासाठी 1.33 इतका एफएसआय दिलेला आहे. उर्वरित जमीन आहे त्यावरील 2.63 एफएसआय ट्रांझिट कॅम्पसाठी वापरावा अशी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे या नियमाच्या अंतर्गत गिरण्यांच्या जमिनीवरील चाळीमध्ये राहणाऱ्या कामगाराला त्याच्या बदल्यात मोफत घर आणि जे कामगार बाहेर राहून गिरण्यांमध्ये काम करीत होते त्यांनाही घर मिळवून देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, यामध्ये मूळ मुद्दा असा आहे की, आता येथे मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले त्यातून एकूण किती जमीन मिळणार आहे ते त्यांनी सांगितले. त्यावर माझा प्रश्न असा आहे की, प्रत्यक्षात किती गिरणी कामगारांना घरे द्यावयाची आहेत आणि त्यासाठी किती जमीन एफएसआय प्रमाणे उपलब्ध व्हायला पाहिजे व तेवढी जमीन आपल्याकडे आहे का ? असल्यास किती चौ.फूट आहे आणि किती कामगारांना अजून घरे द्यायची आहेत ? सभापती महोदय, या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांचे वर्तमानपत्रात आम्ही असे स्टेटमेंट वाचले की, गिरणी कामगारांच्या बाबतीत दोन प्रश्न आहेत. त्यापैकी एक म्हणजे त्यांचे पुनर्वसन गिरण्यांच्या जमिनीवर

..... यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .....

करणे. सभापती महोदय, मी शिवडीला राहतो. माझ्याजवळच चायना मिल आहे. या चायना मिलचे पूर्ण पुनर्वसन झाले परंतु त्यामध्ये कामगारांना एक चौ.फूट जागा ठेवलेली नाही. त्यामुळे ज्या गिरण्यांच्या जमिनीवर मॉल सारखे प्रकल्प येतात तेथे गिरणी कामगारांच्या मुलांना नोकऱ्या द्या अशी मागणी पुढे आलेली होती. त्यावर दुर्दैवाने असे स्टेटमेंट आले की, गिरणी कामगारांची मुले फारशी शिकलेली नाहीत. त्यावर प्रचंड प्रक्षोभ देखील झालेला आहे. त्यामुळे त्या कामगारांची घरेच केवळ उद्ध्वस्त झाली आहेत असे नाही तर त्या कामगारांचे पूर्ण संसारही उद्ध्वस्त झाले आहेत. त्यामुळेच मी असे म्हणेन की, दत्ता सामंतांचा संप अजूनही संपलेला नाही, तो सुरूच आहे. त्यातील अनेक कामगार स्वर्गवासी झाले आहेत पण त्यांची मुले अजूनही घर आणि नोकरीसाठी फिरत आहेत. तेव्हा गिरण्यांच्या जमिनीवर गिरणी कामगारांना मोफत घरच नव्हे तर गिरणी कामगारांच्या मुलांना गिरण्यांच्या जमिनीवर होणाऱ्या उद्योगांमध्ये नोकरी देखील देणे आवश्यक आहे. तेव्हा यासाठी किती जमीन आपल्याकडे आहे आणि किती कामगारांना घरे दिली आहेत व अजून द्यायची आहेत ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, यामध्ये मी मुद्दामहून सभागृहाला अधिकची माहिती देण्याचा प्रयत्न केला की, यामध्ये गिरणी कामगारांना कायद्यानेच घर देण्यास बंधनकारक केले आहे. बंद पडलेल्या गिरण्यांतील 4946 कामगार गिरण्यांच्या जमिनीवर राहत आहेत. सभापती महोदय, या नियमांमध्ये जे बदल केले आहेत त्यामुळे या 4946 कामगारांना मोफत घरे द्यावी लागतील. ....

(यानंतर श्री. सरफरे ..... यू 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

श्री. राजेश टोपे...

सभापती महोदय, बंद पडलेल्या गिरण्यांमधील एकूण 46 हजार गिरणी कामगार आहेत त्या सर्वांना घरे देण्यात यावी अशी नियमात कोठेही तरतूद नाही. तरीसुध्दा महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य आहे. या दृष्टीकोनातून कोणत्याही बंद पडलेल्या उद्योगामधील कामगारांसाठी दिले नसेल इतके चांगले पॅकेज या कामगारांसाठी दिले आहे. कामगारांची एकूण देय रक्कम जी होती त्याकरिता सन 2001 च्या नियम 58 मध्ये बदल करुन रुपये 887 कोटी इतकी रक्कम देण्यात आली आहे. अजून 64 कोटी रुपये द्यावयाचे शिल्लक राहिले असून ती रक्कम लवकर देण्यात येईल. सभापती महोदय, गिरणीच्या प्रिमायसेसमध्ये जे लोक रहातात त्यांना 100 टकके मोफत घरे मिळणार आहेत. त्याचप्रमाणे एकूण जमिनीच्या 33 टक्के जमीन नियमाप्रमाणे म्हाडाला उपलब्ध होणार आहे. त्या जमिनीमधील 50 टक्के जमीन फक्त कामगारांसाठी वापरावयाची व त्याकरिता 4 टक्के एफ.एस.आय. करण्यात आला आहे. वास्तविक पहातां हायलँड सिटीमध्ये 1.33 टक्के एफ.एस.आय. आहे. तरी पण कामगारांना 225 चौरस फूटांची जास्तीत जास्त घरे उपलब्ध व्हावीत म्हणून 4 टक्के एफ.एस.आय. दिला आहे. त्याचप्रमाणे म्हाडाला जी 50 टक्के जमीन उपलब्ध होणार आहे त्याठिक्राणी कामगारांसाठी घरबांधणी करण्याकरिता 1.33 टक्के एफ.एस.आय. दिला आहे. आणि 1.33 टक्के एफ.एस.आय. ट्रँझिट कँपच्या बांधणीसाठी मिळणार आहे. जी डिलॅपडेटेड घरे आहेत, जुनी मोडकळीस आलेली घरे आहेत त्यांच्या पुर्नविकासासाठी हायलँड सिटीमध्ये ट्रँझिट कँप बांधणे आवश्यक आहे. याकरिता गिरण्यांची जमीन ट्रँझिट कँपसाठी उपयोगात आणण्याकरिता हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यादृष्टीने 15 ते 20 हजार कामगारांकरिता ही घरे उपलब्ध होतील अशाप्रकारचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे जे 46 हजार गिरणी कामगार असतील त्या सर्वांना घरे मिळणार नाहीत. त्या संदर्भात त्यांना घरे कशापध्दतीने देता येतील, त्या घरांचा बांधकाम खर्च इत्यादीसंबंधी अभ्यास करण्याकरिता मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली असून त्यासंबंधी लवकरच निर्णय घेण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तरामुळे गिरणी कामगारांची पूर्णपणे दिशाभूल करण्यात आली आहे. मुंबईमधील 46 हजार गिरणी कामगारांना घरे न देता फक्त 4946 गिरणी कामगारांना घरे मिळणार आहेत. गिरणी संपामध्ये गिरणी कामगार उद्ध्वस्त झाला आहे. आपण हे पॅकेज जाहीर केल्यामुळे म्हाडाला जमीन मिळणार आहे व अतिरिक्त एफ.एस.आय. मिळणार आहे. त्यामुळे या गिरणी कामगारांचे पुनर्वसन होणार नाही. त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

कामगारांना घरे मिळण्याकरिता हे शासन हमी घेणार आहे काय? उद्ध्वस्त झालेल्या 46 हजार गिरणी कामगारांनी ही मुंबई सजविली आहे, उभी केली आहे. त्यांच्या मुलांना आज नोकऱ्या नाहीत. हा कष्टकरी गिरणी कामगार आज मुंबईबाहेर फेकला गेला आहे. ज्याठिकाणी गिरण्या होत्या त्याठिकाणी आज मॉल उभे रहाणार आहेत, आय.टी. पार्क उभे रहाणार आहे. त्याठिकाणी गिरणी कामगारांच्या मुलांना नोकऱ्यांमध्ये आरक्षण ठेवण्याची आवश्यकता आहे. त्या नोकरीसाठी आवश्यक असलेली पात्रता पूर्ण करण्याकरिता त्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रशिक्षणाचा कालबध्द कार्यक्रम आखून शासन त्यांना नोकऱ्या मिळवून देणार आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी सुरुवातीला माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना सांगितले आहे की, एकूण 46 हजार गिरणी कामगार आहेत त्या सर्वांना कायदेशीररित्या घरे देण्याची कोणत्याही नियमात तरतूद नाही. परंतु जास्तीत जास्त लोकांना लॉटरी पध्दतीने घरे उपलब्ध करुन देण्यासंबंधी नियमात तरतूद करण्यात आली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मुंबई उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका क्रमांक 134/2006 दाखल करण्यात आली होती. त्यासंबंधी राज्य शासनातर्फे दिनांक 13.3.2007 रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले. त्यामध्ये राज्य सरकारने म्हटले आहे की, "योग्य तंत्रज्ञानाअभावी गिरणी कामगारांना गिरण्यांच्या जमिनी व उभ्या । राहणाऱ्या उद्योगात काम करता येणार नाही तसेच आर्थिक परिस्थिती व सामाजिक मागासलेपणा यामुळे गिरणी कामगारांच्या मुलांनाही सुविख्यात तंत्रशिक्षणाच्या संस्थेत प्रवेश मिळणार नाही".

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

सरकारचे प्रतिज्ञापत्र म्हणजे निव्वळ धुळफेक या खाली मुंबई उच्च न्यायालयाने विकासाच्या नावावर गिरणी कामगारांच्या नोकऱ्या हिसकावून त्यांचे जीवन आणि भविष्यही उद्ध्वस्त केल्याचा आरोप राज्य सरकारवर न्यायालयाने केलेला आहे. तसेच विकास नियंत्रण कायद्यांतर्गत गिरणी कामगारांना पर्यायी नोकऱ्या व निवास देता येत नसतील तर गिरण्यांच्या जमिनीवरील विकास कामे आहेत त्या परिस्थितीत बंद करण्याबाबत राज्य सरकारला आदेश दिलेला आहे. तुम्ही मेहरबानी करत नाही. आपल्याला या सर्व कामगारांना घरे द्यावी लागतील. हा सगळा फ्रॉड म्हणावा लागेल. आपण पुरोगामी, पुरोगामी म्हणून जयघोष करता आणि गिरणी कामगारांच्या पोटावर लाथ मारून गिरणी मालकांकडून लक्ष्मी दर्शन घेता. आपण नियमावली बदललेली आहे. आपण नियम कसा बदलला यासंबंधीचे माझ्याकडे रेकॉर्ड आहे. 50 हजार कामगारांना 225 स्क्वे.फू.चे घर बांधण्याकरिता आपल्याकडे पैसे नाहीत ? नाच-गाणी सुरु आहेत, डान्सबार आहेत, मॉल आहेत, बॉलिंग ॲली हा खेळ आहे. परंतु कामगारांसाठी घरे बांधण्यासाठी पैसे नाहीत. माझा प्रश्न असा आहे की, न्यायालयाने आदेश दिलेले आहेत, ते आपल्याला बंधनकारक आहेत. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे 50 हजार कामगारांना 225 स्क्वे.फुटाचे घर बांधून देणार आहात की नाही ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी दोन प्रश्न उपस्थित केले. एक म्हणजे त्या कामगारांना नोकऱ्या देण्याबाबत आणि कोर्टाच्या आदेशाप्रमाणे काम होणार आहे की नाही ? मला सांगावयाचे आहे की, पूर्वीचा निर्णय 33:33:33 असा जमीन वाटप करण्याचा होता. त्याप्रमाणे शासनाने नियम 58 मध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला होता. याबाबत हायकोर्टाचा जो निर्णय होता, त्याबाबत सुप्रीम कोर्टामध्ये केस दाखल झाली. सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाचा निर्णय रद्द करून राज्य शासनाने जो नियमामध्ये बदल केलेला होता त्याला मान्यता दिली. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे विकासाच्या कामांना मंजुरी दिली जाते.

श्री.नितीन गडकरी : जनहित याचिका क्रमांक 134/2006 दाखल केलेली होती त्या मुंबई हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे तो मी वाचून दाखविला. "विकासाच्या नावावर गिरणी कामगारांच्या नोकऱ्या हिसकावून त्यांचे जीवन आणि भविष्यही उद्ध्वस्त केले, तसेच विकास नियंत्रण कायद्यांतर्गत गिरणी कामगारांना पर्यायी नोकऱ्या व निवास देता येत नसतील तर गिरण्यांच्या जमिनीवरील विकास कामे आहेत त्या परिस्थितीत बंद करावीत, अशा स्पष्ट सूचना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु....

उच्च न्यायालयाने दिलेल्या आहेत. 50 हजार कामगारांना 225 स्क्वे.फूटाचे घर देण्याबाबत आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे कामगारांना घरे देणार की नाही ? एवढेच मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री.राजेश टोपे : 50 हजार घरे देण्याबाबत कोर्टाने बंधन घातले असेल, परंतु त्याबाबतची माहिती माझ्याकडे नाही. माझ्याकडे प्राप्त माहितीच्या आधारे कोर्टाच्या निर्णयाच्या अनुषंगाने जो काही जी.आर. आहे त्यामध्ये आणि डी.सी.आर.मध्ये बदल करण्यात आलेला आहे. त्याची अंमलबजावणी चालू आहे. त्यामध्ये 100 टक्के कामगारांना घरे द्यावीत, असा कोठेही उल्लेख नाही.

श्री.नितीन गडकरी : माझ्याकडे याचिका क्रमांक आहे. सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना रोखून धरावी. जनहित याचिका दाखल झालेली होती त्या संदर्भात न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. इन्व्हायरमेंटल ग्रूपच्या संदर्भात नियम बदलले. 30 टक्क्याच्या ऐवजी 65 टक्के केले. हे सगळे लक्ष्मी दर्शन झाल्यामुळे घडले. त्यामध्ये माननीय मंत्री महोदय आपण नव्हता.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

यामध्ये माननीय मंत्रिमहोदयांना काही मिळाले नाही. त्यांचा याच्याशी संबंध नाही. जो माल ते कमावतात तो माल या ठिकाणी येत नाही आणि भलत्याच माणसाला या गोष्टीला तोंड द्यावे लागते. मुंबई उच्च न्यायालयामध्ये 134/2006 क्रमांकाची जनहित याचिका दाखल करण्यात आली. ही याचिका कामगार युनियनने दाखल केलेली आहे. त्यासंदर्भात 13 मार्च, 2007 रोजी शासनाने ॲफिडेव्हिट दाखल केले. त्यामध्ये राज्य सरकारने जे म्हटले आहे ते योग्य नाही. गिरणी कामगारांच्या मुलांना नोकऱ्या देता येत नाही असे ॲफिडेव्हिट हे शासन करते. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना विचारु इच्छितो की, हे समाजवादी धोरण आहे काय ? आपले मित्र मुख्यमंत्री आहेत. कामगारांच्या मुलांना नोकऱ्या देता येत नाहीत असे ॲर्फिडेव्हिट शासन कोर्टामध्ये सादर करते. त्यामध्ये त्यांनी दुसरे असे सांगितले की, तांत्रिक शिक्षण संस्थेत सर्व कामगारांच्या मुलांना प्रवेश मिळणार नाही. काय बाणेदार सचिव आहेत ? या ठिकाणी फुले, आंबेडकर, शाहू महाराज यांचे नाव घेता. हे पुरोगामी राज्य आहे, प्रगतिशील राज्य आहे असे पोपटासारखे बोलता. परंतु या कामगारांच्या मुलांना शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश मिळणार नाही. याबाबत राज्य शासनाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रावर मुंबई उच्च न्यायालयाने कडक ताशेरे ओढले. विकासाच्या नावावर गिरणी कामगारांच्या नोकऱ्या हिसकावून त्यांचे जीवन आणि भविष्यही उद्ध्वस्त केल्यास विकास नियंत्रण कायद्याअंतर्गत गिरणी कामगारांना पर्यायी नोकऱ्या व निवास देता येत नसेल तर गिरण्यांच्या जमिनीवरील विकास कामे आहेत त्या परिस्थितीत बंद करण्यात येतील. हे मी म्हणत नाही तर मुंबई उच्च न्यायालयाने असे म्हटले आहे. तुम्ही त्या ठिकाणी मॉल उभे करता, बोलिंग ॲली सुरु करता. त्या ठिकाणी लाल-पिवळे दिवे लावता. सुसंस्कृत सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांना ते पटणार नाही. त्या गरीब कामगारांना त्या जागेवर तुम्ही काहीच देणार नाही काय ? हायकोर्टाने जे म्हटलेले आहे ते सत्य असेल, असे ताशेरे हायकोर्टाने ओढले असतील तर या सर्व कामगारांना निवारा आणि रोजगार देण्यात येईल असे स्पष्ट आश्वासन मंत्री महोदय या सदनाला देणार काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. ज्या निकालाची प्रत हातामध्ये घेऊन सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी प्रश्न विचारला त्या निर्णयानंतर त्याच हायकोर्टाचा किंवा सुप्रीम कोर्टाचा वेगळा निर्णय आला आहे काय ? असल्यास ते सांगावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी कोर्टाचा जो निर्णय वाचून दाखविला त्याचा मी पूर्ण आदर करतो. त्याबद्दल माझे दुमत नाही. ही माहिती आता माझ्याकडे प्राप्त नाही. या ठिकाणी दोन प्रश्न आहेत. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती वाचून दाखवली त्या अनुषंगाने मी एवढेच सांगेन की, असे घर आणि नोकरी या दोन्ही दृष्टीकोनातून, ज्या कामगारांच्या मुलांना योग्य पध्दतीचे शिक्षण नसेल, ज्या मिल डायव्हर्सिफाय होतील .....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्याला वाचून दाखवतो. आपण कामगारांना न्याय द्यावा. आपण गरिबी अनुभवलेली आहे. महाराष्ट्र टाईम्समध्ये 16 मार्च, 2007 ला छापून आलेले आहे....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी माननीय मंत्रिमहोदयांना जो प्रश्न विचारला त्या प्रश्नाचे उत्तर आधी देण्यात यावे. सन्माननीय सदस्यांनी हायकोर्टाचा निर्णय वाचून दाखविला किंवा हायकोर्टाने जे मत प्रदर्शित केले ते वाचून दाखविले त्याच्याविरुध्द शासन सुप्रीम कोर्टामध्ये गेले होते काय आणि त्या अनुषंगाने दुसरा निर्णय झालेला आहे काय ?

यानंतर श्री. शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : हे 16 मार्चचे जजमेंट आहे. सन्माननीय सदस्य उल्हास पवार यांनी डी.सी.रुल्सच्या बाबतीत सांगितले .....

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, गिरणी मालक सुप्रीम कोर्टात गेले होते. तो निर्णय उपलब्ध झाला असेल तर त्याची माहिती द्यावी असे मी माननीय मंत्री महोदयांना सांगितले. गिरणी कामगारांना घरे मिळावीत या मताचा मी देखील आहे. गिरणी कामगारांना घरे मिळण्याच्या बाबतीत दुमत असण्याचे कारण नाही. ती घरे त्यांना मिळालीच पाहिजेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या ठिकाणी जजमेंट वाचून दाखविले. गिरणी मालक कोर्टात गेले होते. त्यासंबंधीचे जजमेंट उपलब्ध झाले असेल तर त्याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी असा मुद्दा मी उपस्थित केला ...

श्री. नितीन गडकरी : माझ्याकडे 16 मार्चच्या जजमेंटचे पूर्ण रेकॉर्ड उपलब्ध आहे. "महाराष्ट्र टाईम्स", "नवशक्ति", "सकाळ", "हिंदमाता" या वर्तमानपत्रातून यासंबंधीचे वृत्त छापून आलेले आहे. "राज्य सरकार को अदालत की चेतावनी", "आधी कामगार, मगच मॉल", "गिरणी कामगारांचे पुनर्वसन : सरकारचे प्रतिज्ञापत्र म्हणजे निव्वळ धूळफेक", "गिरण्यांच्या जमिनीवरील विकासकामे थांबविण्याची उच्च न्यायालयाची तंबी", "गिरणी कामगारांना नोक-या न दिल्यास जमिनींच्या विकासाला स्थगिती", गिरणी कामगारांना नोकरी आणि घरे द्या", "कामगारांना नोक-या न दिल्यास गिरण्यांचा पुनर्विकास रोखू" अशा मथळयाखाली वृत्तपत्रातून या बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यातील कामगारांना घरे देण्यासंदर्भात हायकोर्टाने राज्य सरकारला सज्जड इशारा दिला आहे. सन्माननीय सदस्य उल्हास पवार यांनी सांगितले की, गिरणी मालक सुप्रीम कोर्टात गेले आहेत. पण ते प्रकरण वेगळे आहे.. गिरणी कामगार कर्मचारी निवारा कल्याणकारी संघटना हायकोर्टात गेली होती, आणि त्यासंदर्भात हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश जे.एन.पटेल यांच्या खंडपीठाने 15 मार्च रोजी आदेश दिलेला आहे. यासबंधीचे वृत्त 16 मार्चला छापून आलेले आहे. प्रशिक्षण आणि निवारा या गोष्टीत हाययकोर्टाने राज्य सरकारला सज्जड दम दिलेला आहे. सभापती महोदय, माझी हात जोडून विनंती आहे की, 50 हजार गिरणी कामगारांना घरे मिळाली पाहिजेत. त्यांच्या मुलांना रोजगार मिळाला पाहिजे. मला बाकी काही म्हणायचे नाही. तुम्हाला जे काही करायचे आहे ते करा.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

सभापती महोदय, मी विनंती करतो की, दिनांक 15 मार्च रोजी न्यायाधीश जे.एन.पटेल साहेबांनी जो निर्णय दिला त्याचे प्रोसिडिंग्ज आपण बोलावून घ्यावे. त्यामध्ये राज्य सरकारला दम दिलेला आहे. त्याचा परिणाम या राज्य सरकारवर झालेला आहे काय ? माननीय मंत्री महोदयांनी 15 तारखेचे जेजमेंटचे प्रोसिडिंग्ज तपासून याठिकाणी उत्तर द्यावे.

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांची कामगारांविषयीची आपुलकी पाहून समाधान वाटले. तीच आपुलकी शासनाचीही आहे.

श्री. नितीन गडकरी : मी श्री. हरिभाऊ नाईक यांना हरवून इंटकचा अध्यक्ष म्हणून निवडून आलो होतो....

श्री. राजेश टोपे : गिरणी कामगारांविषयी शासनाला देखील तेवढीच आपुलकी आणि सहानुभूती आहे. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या वृत्ताची माहिती दिली. त्यांनी जे सांगितले ते ऑब्झर्व्हेशन आहे, ते जजमेंट किंवा रुलिंग नाही. 4 आठवड्यात ॲफिडेव्हिट करा असे शासनाला डायरेक्शन्स देण्यात आल्याचे वृत्त देखील वर्तमानपत्रातून प्रसिध्द झालेले आहे. ..(अडथळा)... सभापती महोदय, मी रेकॉर्डवर बोलत आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / अशुधारित नाही

लक्षवेधी सूचना क्र.2.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्याकडे कागदपत्रे सुपूर्द करतो. हे काय ऑब्झर्व्हेशन आहे?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण करु द्यावे एवढीच विनंती आहे.

श्री.नितीन गडकरी : हायकोर्टाने शासनाला दम भरला आहे.

श्री.राजेश टोपे : हे जज्जमेंट नाही.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिलेली आहे. त्यामुळे मंत्रीमहोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, रोजगाराच्या संदर्भात आज जे नियम आहेत ते असे आहेत की, जर मिल शिफ्ट झाली तर त्या ठिकाणी सुरु होणाऱ्या उपक्रमामध्ये नोकरी दिली पाहिजे. उद्योग डायव्हर्सिफाय झाला तरी सुध्दा नोकरी देणे बंधनकारक आहे. ज्यांच्याजवळ स्किल नाही, त्यांचे अपग्रेडेशन करण्यासाठी 2001 मध्ये नियम 58 तयार केला आहे. कामगारांच्या मुलांच्या स्किल अपग्रेडेशनसाठी स्पेशल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट करण्याच्या संदर्भात शासनाने नियमामध्ये तरतूद केली. ट्रेनिंग इन्स्टिटयूट स्थापन केली जाणार असून कामगारांच्या मुलांना तेथे ट्रेनिंग दिले जाणार आहे. स्किल डेव्हलप झाल्यानंतर त्या अनुषंगाने नोकरी देण्याचा शासनाचा निश्चित दृष्टीकोन आहे. निवासाच्या दृष्टीकोनातून मी सांगितले त्या पध्दतीने 20 हजार कामगारांना आपण घरे उपलब्ध करुन देण्याची तरतूद बदललेल्या नियमामध्ये करीत आहोत. 46 हजारपैकी सर्वच कामगारांना घरे देण्याची आज कायद्यामध्ये किंवा नियमामध्ये तरतूद बंधनकारक नाही. जरी कोर्टाने चार आठवड्यामध्ये ॲफिडेव्हीट करावयास सांगितले असले तरी ते ॲफिडेव्हीट सादर केल्यानंतर तशा पध्दतीचे आदेश शासनाला दिले गेले तर निश्चितपणे शासन कोर्टाच्या आदेशाला बंधनकारक राहून पुढे त्या पध्दतीची कारवाई करेल. त्यामुळे कोर्टाचे जे ऑब्झर्व्हेशन आहे त्या ऑब्झर्व्हेशनच्या अनुषंगाने कामगारांच्या दृष्टीकोनातून 100 टक्के सहानुभूती शासनाला आहे. सर्व देय रक्कम रु.887 कोटी दिली असून घरे बांधण्याच्या दृष्टीकोनातून सुध्दा निर्णय घेणार आहोत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, शासनाच्या ॲफिडेव्हीटवर सन्माननीय न्यायमूर्ती श्री.जे.एन.पटेल यांनी रोजगार आणि निवासाच्या संदर्भात शासनाला दम दिला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.2.....

उपसभापती : मी कागदपत्रे चाळली आहेत. मंत्रीमहोदयांचे उत्तर ऐकलेले आहे.....

श्री.राजेश टोपे : जज्जमेंट असेल तर ते जज्जमेंट शासनावर बंधनकारक राहील.

श्री.नितीन गडकरी : मी शासनाच्या विरोधात पीआयएल दाखल करीन. कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट दाखल करीन.

उपसभापती : मी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवीत आहे.

उपसभापती : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 1.45 वाजता पुन्हा भरेल.

(दुपारी 1.09 ते 1.45 मध्यंतर)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

सभापतीस्थानी -माननीय उपसभापती

सन 2006 -07च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

उपसभापती : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा शेवटचा व दुसरा दिवस आहे. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर चर्चा आज दिनांक 24 मार्च, 2007 रोजी घेण्यात येत आहे. पूरक मागण्या आणि त्या खालील बाबी यासंबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच. कार्यक्रम पत्रिकेवरील दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या

उपसभापती : आता खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येतील.....

1) उपमुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक बी-1.
2) महसूल मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक सी-1, सी-2, सी-4
3) सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एच-1, एच-3 , एच- 5,एच-6,एच-7,एच-8,एच-11
4) शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक ई-2, ई-3
5) पशुसंवर्धन , दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय व औकाफ मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक डी-2, डी-4, डी-5
6) जलसंधारण व खार जमीन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक डी-14

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभपती.....

7) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक आर-1, आर-5

8) सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एन-4 , एन-5

9) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एम-3 .

10) वन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक सी-7, सी-10.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी 2006-2007च्या पुरवणी मागण्यावर चर्चा करण्यासाठी उभा आहे. बाब क्रमांक 9, पृष्ठ क्रमांक 11 च्या संदर्भात मी बोलणार आहे. पोलीस आस्थापनेवरील वेतन व भत्ते या वर 2006-07 च्या सुधरित अंदाजानुसार रुपये 28,41,54,01,000 इतक्या मंजूर अनुदानापेक्षा रुपये 8,06,47,000 इतका अधिक खर्च अपेक्षित आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. भास्करराव जाधव)

श्री. मधुकर सरपोतदार...

राज्याचे बजेट तयार केले जाते तेव्हा सर्व विभागाकडून किती खर्च होणार आहे याची माहिती मागवली जात असते. सर्व विभागाकडून माहिती आल्यानंतर खर्चाचा अंदाज बांधला जात असतो. या विभागांनी अंदाजे खर्च दिल्यानंतर पुरवणी मागण्यामध्ये वाढीव खर्च दाखवला जातात. विभागाकडून अंदाजे खर्च येत असतो त्यामुळे या विभागाकडून एक्झ्याक्ट खर्च येईल असे आम्ही सुध्दा गृहीत धरीत नाही परंतु जर पुरवणी मागण्यामध्ये कोटयावधी रुपयांचा फरक पडत असेल तर ते काही योग्य नाही. त्यामुळे यापुढील काळात असे प्रकार होणार नाहीत याची माननीय मंत्रीमहोदयांनी दक्षता घ्यावी.

सभापती महोदय, पोलीस दलांना भत्ते देण्याच्या संदर्भात शासनाने एक वर्षापूर्वी घोषणा केली होती परंतु एक वर्ष उलटून गेले तरी सुध्दा पोलिसांना अद्यापि भत्ते मिळालेले नाहीत. पोलिसांना भत्ते एप्रिल महिन्यापासून दिले जातील असे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितलेले आहे. मला पोलीस दलाबद्दल आदर आहे. पोलीस दल हे महाराष्ट्र राज्याचा पाठीचा कणा आहे. विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षावर अनेक प्रकारची टीका करीत असतो. सत्ताधारी पक्षाने योग्य काम केले नाही तर विरोधी पक्षाला टीका करावी लागते. शासनाची चूक लक्षात आणून देणे हे जसे विरोधी पक्षाचे काम आहे तसेच ही चूक सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी सुध्दा शासनाच्या लक्षात आणून द्यावयास पाहिजे. शासनाचा कारभार चांगल्या प्रकारे चालावा, यामध्ये कोणत्याही प्रकारच्या त्रुटी राहू नयेत ही सत्ताधारी आणि विरोधी पक्षाची संयुक्त जबाबदारी आहे. त्यामुळे पुरवणी मागणी करतांना कोटयावधी रुपयांचा फरक पडत असेल तर ते योग्य नाही. पुरवणी मागणी करतांना एक कोटी रुपयांचा फरक पडत असेल तर चालेल परंतु 8.64 कोटी रुपयांचा फरक पडत असेल तर ते ठीक नाही त्यामुळे यासंदर्भात शासनाने काळजी घ्यावी. एवढया मोठया प्रमाणात फरक पडण्याचे कारण काय याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या भाषणात दिली तर मी आभारी राहीन.

सभापती महोदय, बाब क्रमांक 24, पृष्ठ क्रमांक 19 वर मंजूर अनुदानाहून अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त नियमवाटपासाठी 85.75 लक्ष रुपये इतका अधिक खर्च

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

अपेक्षित आहे व त्यासंदर्भात पूरक मागणी सादर केलेली आहे त्यामुळे यासंदर्भातील माहिती माननीय वन मंत्र्यांनी द्यावी अशी विनंती आहे. आज वनाची, जंगलाची तोड मोठया प्रमाणात होत आहे. ठाणे, मुंबई, पुणे अशा अनेक शहरात अवैध रीतीने तोडलेली लाकडे ट्रकमधून विना परवाना येत असतात. तसेच अन्य मार्गाने सुध्दा शहरांमध्ये जंगलातील लाकडे येत असतात. आज जंगलाची मोठया प्रमाणात तोड होत असल्यामुळे जंगले उजाड होत चालली आहे, ओस पडत चालली आहेत. जंगलतोडीचा परिणाम महाराष्ट्र राज्यातील पर्जन्यमानावर, हवामानावर तसेच पर्यावरणावर पडलेला आहे. त्यामुळे माननीय वन मंत्र्यांनी जंगलतोडीकडे अधिक जागरुकतेने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 25, बाब क्रमांक 30 वरील कृषी व पदूमवर माझे विचार व्यक्त करणार आहे. यामध्ये वैयक्तिक संगणक खरेदी करण्यासाठी 29.60 लक्ष रुपयांची पुरवणी मागणी सादर केलेली आहे. मला वैयक्तिक संगणक खरेदी या शब्दाचा अर्थबोध होत नसल्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 31, बाब क्रमांक 32 वरील प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना सहाय्य या शीर्षकाखाली विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण योजनेअंतर्गत स्वयंपाकघर-नि-कोठी बांधणे यासाठी 1,10,50,20,000 इतक्या रकमेची पुरवणी मागणी सादर केलेली आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

ही रक्कम 31 मार्च 2007 पूर्वी खर्च करावयाची आहे. 31 मार्च संपण्यास आता किती दिवस शिल्लक राहिले आहेत ? इतक्या कमी कालावधीत ही रक्कम कशी खर्च करणार याची मला कल्पना येत नाही. मला याठिकाणी एक गोष्ट निर्विवादपणे सांगावयाची आहे की, दुपारच्या जेवणाचा कार्यक्रम हा शाळेतील मुलांना एक प्रकारची सजा झालेली आहे. कारण शाळेत पिण्याचे पाणी नसते. दीड-दोन कि.मी. अंतरावरुन मुले शाळेत येतात. मुलांनी शाळेत येताना घरुनच हंडा-कळशी आणावी असे शिक्षक सांगतात. शाळेत शेण सारवावयाचे काम मुलांनीच करायचे, जेवणासाठी नदीवरुन पाणी मुलांनीच आणायचे, शाळेतील इतर कामे सुध्दा मुलांनीच करायची. ही सर्व कामे मुलांना सांगितल्यावर मुलांनी शाळेत अभ्यास केव्हा करायचा ? एकीकडे शासन आरडाओरड करीत आहे की, शाळेत मुलांची गळती मोठ्या प्रमाणावर होत आहे. तर दुसरीकडे त्यांना शाळेतील सर्व कामे करायला लावायची हे बरोबर नाही. मी कोकणात ही परिस्थिती पाहिलेली आहे. अशाप्रकारे शाळेतील मुलांची चेष्टा कशासाठी चालवली आहे ? तेव्हा या संदर्भात मंत्रिमहोदयांनी लक्ष घालावे.

बाब क्रमांक 34,पृष्ठ क्रमांक 31- शालेय शिक्षण क्रीडा विभाग- स्वामी विवेकानंद यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे येथे दिनांक 12 ते 16 जानेवारी 2008 या काळात 12 वा राष्ट्रीय युवा महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. यासाठी 2 कोटी रुपयांची मागणी सादर करण्यात आलेली आहे. पुणे जिल्हयातील बालेवाडी येथे जे स्टेडियम उभे करण्यात आलेले आहे त्याची सद्य:स्थिती काय आहे ? 100 कोटी रुपये खर्च करुन हे स्टेडियम उभारण्यात आलेले आहे. परंतु त्या स्टेडियमचा पाहिजे तसा वापर झालेला नाही. संपूर्ण देशातून येथे खेळाडू यावेत आणि त्यांना सर्व प्रकारचे ट्रेनिंग मिळावे या उद्देशाने हे स्टेडियम उभारण्यात आलेले आहे. ऑलिम्पिकमध्ये, एशियन गेम्समध्ये, राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धेत आपल्या खेळाडुंनी चांगले नाव कमवावे या उद्देशाने हे स्टेडियम उभारण्यात आलेले आहे. पण तसे घडत नाही. बालेवाडी येथे ट्रेनिंगसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना विषबाधा झाली अशा आशयाची बातमी वर्तमानपत्रात आली होती. परंतु त्याचा शोध अद्याप लागलेला नाही. ज्याठिकाणी मुलांचे भवितव्य घडवावयाचे, त्यांची चांगली शारीरिक तंदुरुस्ती घडवावयाची अशा ठिकाणी त्यांना विषबाधा होत असेल तर ती भयानक गोष्ट आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

या प्रकरणांमध्ये निष्काळजीपणा झाल्यामुळेच मी या विषयावर टीका केली. अर्थसंकल्पावर ज्यावेळी सर्वसाधारण चर्चा होईल त्यावेळी मी सर्वच विषयावर बोलणार आहे. आता मी येथेच थांबतो.

धन्यवाद !

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2006-2007 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 77, बाब क्रमांक 78 -- अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागावर मी बोलणार आहे. या विभागाच्या खर्चास मी सहमती देतो. परंतु याठिकाणी मला एक सूचना करावयाची आहे. या विभागामध्ये श्रीमती अनुजा मोरे या मागासवर्गीय महिला लघुलेखिकेने 28 वर्षे सेवा केली. तिची सलग 28 वर्षे सेवा होऊनही तिला अचानक सेवेतून काढून टाकण्यात आले. तसेच, त्याठिकाणी असलेल्या श्री.पराग नावाच्या अधिकाऱ्याने तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. ती या प्रकरणी महिला आयोगामध्ये व मॅटमध्ये गेली. ती महिला मॅटमध्ये जिंकलीही. या महिलेने शॉर्टहॅण्डची परीक्षा 3 वेळा दिली. ती परीक्षेमध्ये पासही झाली. तिने एका दिवसामध्ये जवळपास 2-3 परीक्षा दिल्या. परंतु श्री.पराग नावाच्या अधिकाऱ्याने पुण्याच्या जी.सी.सी. परीक्षा बोर्डाशी संगनमत करुन तिला परीक्षेमध्ये 100 पैकी शून्य मार्क्स कसे मिळतील, या दृष्टीने योजना आखली. शॉर्टहॅण्डच्या 80 श.प्र.मि. परीक्षेमध्ये ती पासही झाली होती. परंतु तिचा रिझल्ट राखून ठेवण्यात आला. नंतर पुन्हा ती परीक्षेला बसली. परंतु ती मागासवर्गीय महिला पूर्वी ज्या पदावर काम करीत होती, तिला ते पद मिळाले नाही वा तिला नोकरीवर परत घेतले नाही. अशा प्रकारे आपल्या राज्यामध्ये एका मागासवर्गीय महिलेवर संतापजनक अत्याचार व्हावा, ही अतिशय दु:खाची बाब आहे. त्या महिलेला "विशेष बाब" म्हणून परत नोकरीवर घेण्यासंबंधी मी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र दिले होते. त्यासोबत मी जी.आर.च्या प्रतीही जोडल्या होत्या. त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी "पुटअप" असा शेरा मारुन ती फाईल विभागाकडे पाठविली होती. परंतु त्या विभागाचे श्री.भोबाडे व श्री.धोडे, कक्ष अधिकारी यांनी ती फाईल परत तशीच पाठवून दिली. परत मी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र दिले व परत त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी "पुटअप" असा शेरा लिहिला. परंतु त्या विभागाच्या कक्ष अधिकाऱ्यांनी त्यावर काहीच कार्यवाही केली नाही. अशाप्रकारे आज हे अधिकारी माननीय मुख्यमंत्र्यांनी लिहिलेल्या शेऱ्याचा खेळ करत आहेत, हे योग्य नाही. या मागासवर्गीय महिलेवर झालेल्या अन्यायाची दखल शासनाने घ्यावी, अशी माझी याप्रसंगी विनंती आहे.

...3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे.....

सभापती महोदय, पान क्रमांक 19, बाब क्रमांक 21 वर मी बोलणार आहे. एम्प्रेस मिल नावाची नागपूरमधील कामगारांची हौसिंग सोसायटी आहे. माझे वडीलही एम्प्रेस मिलमध्ये काम करीत होते. परंतु आज ती मिल बंद पडली असून मिलची जमीन 30 वर्षांच्या लिजवर सोसायटीला देण्यात आली होती. त्या लिजवर मिळालेल्या जमिनीचे नूतनीकरण करावयाचे आहे. परंतु त्या बाबतीत संबंधित विभागाकडून कुठल्याच प्रकारची कार्यवाही होत नाही. यामध्ये अनेक अडथळे निर्माण होत आहेत. या कामासाठी एका आमदाराने 20-25 लाख रुपयांची मागणी केली होती. याबाबत त्या आमदाराने महसूल मंत्र्यांवर दबावही आणला होता. त्या जागेवरील सोसायटी रजिस्टर्ड असून ती व्यवस्थित आहे. परंतु यामध्ये अनेक अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे याबाबतची दक्षता शासनाने घ्यावी व त्या सोसायटीचे नूतनीकरण करावे, अशी माझी विनंती आहे.

नंतर श्री.रोझेकर....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे पुढे सुरु.....

सभापती महोदय, वन विभागाच्या बाब क्रमांक 24, पृष्ठ क्रमांक 19 बाबत माझे विचार मी व्यक्त करणार आहे. चंद्रपूर जिल्हयामध्ये करोडो रुपयांच्या बांबूची लूट झाली आहे. याबाबत स्थानिक हिंदी वर्तमानपत्र "नवभारत"मध्ये अशी बातमी आली आहे की, "क्राफ्ट कंपनी चंद्रपुर के नाम पर मची है करोड़ों की लूट". करोड़ों के बांबु की कौडियों के दाम पर लूट हो रही है. अशा प्रकारे वन विभागातर्फे पांढरा हत्ती पोसला जात आहे, बांबुंची विक्री होत आहे, असा या वर्तमानपत्रातील बातमीचा अर्थ आहे. नवेगाव, नागझिरा या भागातील अरण्यात जवळपास 150 कोटी रुपये किमती एवढया बांबुंची चोरी होते आहे. विदर्भामधील लोकांनी लघुउद्योग सुरु केले आहेत परंतु त्यांना ओले बांबू उपलब्ध होत नाहीत. या निमित्ताने माननीय वनमंत्र्यांना माझी विनंती आहे की, याकडे त्यांनी लक्ष पुरवावे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 91 व 92, पृष्ठ क्रमांक 97 अन्वये सादर केलेल्या पुरवणी मागणीला माझा पाठिंबा आहे. परंतु, या निमित्ताने एक बाब मला निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, डॉ.विजया मोडक यांना निलंबित करण्यात आले आहे. माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री असतांना व माननीय श्री.विलासराव देशमुख हे पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी या राज्यातील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याबाबतचा आदेश दिला होता. या डॉक्टर महिलेने 11 उमेदवारांची नियुक्ती केली. त्याचप्रमाणे लातूर, अमरावती, औरंगाबाद, पुणे या जिल्हयांमध्ये देखील पदे भरण्यात आली होती. परंतु, आरोग्य विभागाचे सहसंचालक आणि इतर अधिका-यांनी स्वत:च्या मर्जीतील लोकांना नोकरीत ठेवले व डॉक्टर महिलेने भरती केलेल्या उमेदवारांना नोकरीतून काढून टाकले. एवढेच नव्हे तर, या डॉक्टर महिलेलाही सेवेतून निलंबित केले आहे. आरोग्य विभागात संपूर्ण राज्यात सध्या दोनच मागासवर्गीय अधिकारी कार्यरत आहेत. यासंदर्भात माननीय आरोग्य मंत्र्यांना डिसेंबर महिन्यामध्ये मी पत्र दिले होते. त्यांनी ताबडतोब अहवाल सादर करण्याचे आदेश संबंधितांना दिले. त्यानंतर मी आरोग्य संचालक, श्री.ढोके यांच्याशी संपर्क साधला व माननीय मंत्र्याच्या आदेशानुसार अहवाल ताबडतोब सादर करावा, अशी विनंती केली. एवढेच नव्हे तर, त्यांना वारंवार स्मरणही दिले. तसेच, मंत्रालयातील उपसचिवांनी दोन-तीन वेळा अहवाल सादर करण्याबाबत आरोग्य संचालकांना फॅक्सव्दारा कळविले. परंतु, अद्याप हा अहवाल मंत्रालयातील आरोग्य विभागाला प्राप्त झालेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे.....

नाही, अशी माझी माहिती आहे. संबंधित डॉक्टर महिलेला निलंबित करुन आता आठ महिन्यांचा कालावधी लोटला आहे. शासनाचे असे आदेश आहेत की, सहा महिन्यांमध्ये चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली पाहिजे. सदर डॉक्टर महिलेवर झालेल्या अन्यायामुळे त्यांचे मानसिक संतुलन बिघडले आहे. आरोग्य संचालकांचा अहवाल जर मंत्रालयातील आरोग्य विभागाला प्राप्त झाला असेल तर माझी माननीय आरोग्य मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी या प्रकरणी स्वत: लक्ष घालून सदर मागासवर्गीय डॉक्टर महिलाला न्याय मिळवून द्यावा. एवढी सूचना करतो आणि आज सादर झालेल्या विविध विभागांच्या पुरवणी मागण्यांना पाठिंबा दर्शवून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडत असतांना फक्त दोन-चार मुद्दे मी या ठिकाणी मांडणार आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 8, पृष्ठ क्रमांक 11 च्या अनुषंगाने एक महत्वाचा मुद्दा मला माननीय उपमुख्यमत्र्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाचा आहे. नुकतेच नागपूर येथे महिला पोलिसांचे प्रशिक्षण पार पडले. त्या अनुषंगाने अशा भावना व्यक्त झाल्या की, अनुकंपा तत्वावर ज्या महिलांना पोलीस सेवेत घेण्यात येते त्यांना अवघड शारीरिक व्यायामाची सवय नसते त्यामुळे त्यांना प्रशिक्षणादरम्यान अडचणी येतात व मानसिक त्रास होतो. ही बाब नागपूर येथे पार पडलेल्या प्रशिक्षणात प्रकर्षाने लक्षात आली आहे. त्यामुळे अनुकंपा तत्वावर सेवेत दाखल झालेल्या महिला पोलिसांच्या वयाचा, शारीरिक क्षमतेचा विचार प्रशिक्षण देत असतांना व्हावा, अशी विनंती मी या निमित्ताने करतो.

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, राज्य पोलीस आयुक्तालयाचा दुसरा मुद्दा यानिमित्ताने मला उपस्थित करावयाचा आहे. ब-याच वर्षापासून उपनगरातील पोलीस आयुक्तालयाचा प्रश्न प्रलंबित आहे परंतु यासाठी करण्यात आलेली तरतूद दुस-या कामांवर वर्ग करण्यात येत आहे. गृहमंत्रालयाकडूनही याबाबत ब-याच घोषणा होत होत्या, परंतु श्री.कृपाशंकर सिंह नसल्यामुळे त्या घोषणा आता कमी झालेल्या आहेत, परंतु सदर काम लवकरात लवकर पूर्ण कधी होईल ? याची उत्सुकता आम्हा उपनगरवासियांना लागून राहिलेली आहे.

सिने अभिनेता संजय दत्त याचे मध्यंतरी जे स्टिंग ऑपरेशन झाले होते, त्यामध्ये बंदूक नेलेला दोषी, बंदूक देणारा दोषी परंतु बंदूक बाळगलेला संजय दत्त टाडाच्या कचाटयात सापडलाच नाही. याविषयी महाराष्ट्रातील जनतेमध्ये संभ्रमावस्था आहे आणि त्यामुळे अनेक प्रश्नचिन्ह निर्माण होतात. शासनाने याबाबत स्पष्टीकरण देऊन काय कारवाई करता येईल याचा विचार केला पाहिजे. बंदूक बाळगणारा टाडामध्ये का सापडला नाही ? याची क्लियरिटी जनतेला अद्यापही मिळालेली नाही.

बाब क्रमांक 2039 मध्ये राज्य उत्पादन शुल्काबाबत मागण्या दिलेल्या आहेत. राज्य उत्पादन शुल्काच्या विषयामध्ये हायवेला असणा-या हॉटेल्समध्ये वाईन,बिअर विकावयाला लागणा-या परमिटची किंमत 55 - 60 हजारावरुन एकदम 12 हजारावर करण्यात आली, असे आपल्याला मध्यंतरी वर्तमानपत्रामध्ये वाचावयाला मिळत होते. परमिटची किंमत कमी केल्यामुळे छोटया हॉटेलवाल्यांनाही सदर परमिट सहज परवडू लागले. या ड्रॅस्टिकली आलेल्या सरकारच्या निर्णयामध्ये बदल करण्यासाठी " विजय मल्ल्या " या व्यक्तीचा "एवढी एवढी ठोस विक्री झालीच पाहिजे" अशा प्रकारचा केवढा दबाव या ठिकाणी दिसून येत आहे. या ठिकाणी विजय मल्ल्या याने आपली राजकारणातील मैत्री कामाला आणली. हायवे वर झालेल्या ॲक्सीडंट्सचा आपण सर्व्हे करतो, परंतु आता परमिटची किंमत कमी झाल्यामुळे दारुची विक्री प्रचंड प्रमाणात वाढली. हायवे वर छोटया मोठया हॉटेल्समध्ये सहजपणे मिळू शकणारी दारु आता गाडीतील मागे बसणा-या व्यक्तीने प्यायली काय आणि पुढे बसणा-या व्यक्तीने प्यायली काय याला काहीही धरबंध उरलेला नाही. याचाही विचार राज्य उत्पादन शुल्क खात्याने केला पाहिजे.

बाब क्रमांक 2059 मध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याविषयी मागण्या दिलेल्या आहेत.

FF -2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

बांधकाम खात्याने आपल्याला अर्थ खाते पैसे देत नाही, आणि पैसा येत नाही म्हणून रस्ते दुरुस्त करता येत नाहीत असे म्हणून त्यांच्याकडे असणा-या कामाच्या, आस्थापनाच्या जागा मोक्याच्या ठिकाणी असल्यामुळे बी.ओ.टी.तत्वावर विकसित करण्याची प्रक्रिया काही ठिकाणी सुरु केलेली आहे. राज्यशासनाचे अशा प्रकारचे काही धोरण ठरलेले आहे का ? असल्यास राज्यशासनाला यातून किती उत्पन्न मिळणार आहे ? त्यात बी.ओ.टी.चे काही निकष ठरलेले आहेत का ? मुंबईमध्ये एम.एम.आर.डी.ए.ने वेस्टर्न आणि ईस्टर्न एक्प्रेस हाय वे विकसित करावयाला घेतला परंतु त्याची मूळ मालकी बांधकाम खात्याची आहे, ते विकसित करावयाला घेतल्यानंतर " फुट ऑपरेट ब्रीज " चे वर्तमानपत्रातील टेंडर बांधकाम खात्याने फ्लोट केले.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे .....

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पूरवणी मागणी क्र.एच 8 मधील सामाजिक सुरक्षा व कल्याण यावरील भांडवली खर्च यामध्ये बाल कल्याणासंबंधीच्या योजनेचा समावेश केलेला आहे. माननीय मुख्यमंत्री चिल्ड्रेनस एड सोसायटीचे अध्यक्ष आहेत. आपण मध्यंतरी बाल मजुरांसाठी आणि भिकारी मुलांसाठी अभियान राबविले, ते स्तुत्य आहे. बाल मजुरांना आणि भिकारी मुलांना पकडल्यानंतर त्यांना देवनार आणि मानखुर्द येथील बाल सुधार गृहात ठेवले जाते. तेथे एकच हॉल आहे. हरवलेल्या मुलांना आणि भीक मागणा-या मुलांना एकाच हॉलमध्ये ठेवले जाते. समाजशास्त्राचे शास्त्रज्ञ असे म्हणतात की, या मुलांची रहाण्याची वेगळी व्यवस्था केली पाहिजे. त्या मुलांची राहण्याची वेगळी व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. पोलीस विभागातर्फे असे सांगितले जाते की, भीक मागणा-या मुलांचे पालक सापडत नाहीत. मुलांना घेण्यासाठी तेथे 700 ते 800 पालक येत असतात. परंतु रेकॉर्डमध्ये मात्र पालक फरारी असल्याची नोंद केली जाते. कारण त्या मुलांचे पालक मिळाले तर केस दाखल करावी लागते. म्हणून पालक सापडत नाहीत, असे सांगितले जाते. कृपा करुन असे अभियान राबवू नका. यातून आपल्याला प्रसिद्धी मिळते. परंतु त्या मुलांचे मात्र हाल होतात. पोलीस गाडीतून 250 ते 300 मुलांना पकडून आणतात. परंतु इतक्या मुलांना दोन महिने तेथे ठेवण्यासाठी आवश्यक ती जागा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना एका महिन्यामध्ये परत पाठविले जाते. त्या मुलांचे पालक कोण आहेत याचा पोलिसांनी अहवाल दिला नव्हता. तेथील लोक म्हणाले की, या मुलांचे पालक येथे आहेत त्यांना अटक करा. परंतु त्यांना अटक न करता फरारी दाखविण्यात आले व मुलांना गाडीतून परत पाठविले. बाहेर मुलांचे पालक रडत होते. याचा मानसिक परिणाम मुलांवर काय होतो, याचा विचार केला जात नाही. उपक्रम अतिशय चांगला आहे. परंतु उपक्रम परिपूर्ण नसल्यामुळे त्याचा मुलांच्या मानसिकतेवर वाईट परिणाम होत आहे. हरवलेली मुले आणि भीक मागणारी मुले त्या हॉलमध्ये गुन्हेगारांबरोबर बसतात. परंतु गुन्हेगारांबरोबर एक महिना राहिल्यानंतर तेथून बाहेर पडल्यावर ती मुले काय करतील, याचा विचार झाला पाहिजे. म्हणून यासाठी तरतूद करुन वेगळा हॉल आणि कार्यालय बांधण्याची आवश्यकता आहे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ KTG/ प्रथम कु.खर्चे 14:15

श्री.विनोद तावडे .....

सभापती महोदय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पुरवणी मागणी क्रमांक एम 3 मधील सेक्रेटरिएट आर्थिक सेवा आणि इतर सर्वसाधारण आर्थिक सेवा यामध्ये वजने व मापे याचे विनियमन केलेले आहे. मुंबई मिरर या वृत्तपत्रामध्ये "केरोसीन-स्टींग" अशी बातमी आली होती. टँकरमध्ये करोसीन भरल्यानंतर त्यामध्ये भेसळ कशी केली जाते, याबाबतची माहिती त्या बातमीमध्ये दिलेली आहे. शासनाने अशा किती प्रकरणांची चौकशी केली, अशी किती प्रकरणे घडतात, केरोसिनची मागणी किती आहे, आणि किती केरोसीनचे वाटप होते ? रेशन कार्डवर शिक्के कसे मारले जातात ? रेल्वेलगतची घरे देऊन जे लोक पुनर्वसित जागेवर राहण्यासाठी गेलेले आहेत त्यांना अजून रेशन कार्ड देण्यात आलेले नाही. त्या विस्थापित झालेल्या लोकांना रेशनकार्ड दिलेले नसल्यामुळे त्यांना केरोसीन मिळत नाही.

यानंतर श्री.गागरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे .....

सभापती महोदय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, विशेष सहाय्य या विभागाच्या कला व संस्कृती या विषयावरील बाब क्र.2205 वर मी बोलू इच्छितो. कै.श्री.ना.पेंडसे यांचे काल निधन झाले, त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी सरकारकडून कोणीही गेले नाही. कै.पेंडसे क्षुल्लक साहित्यिक नव्हते. वास्तविक पाहता राज्य शासनातील सर्व मंत्री येथे उपस्थित होते. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांच्यासारखे सरकारच्या बाजूला साहित्यातील जाणकार असताना ते स्वत: किंवा सन्माननीय मंत्री, पालक मंत्री, कलेक्टर यापैकी कोणीही कै.पेंडसे यांच्या घरी गेले नाही, हे खेदाने नमूद करावे वाटते. मी विधानभवन परिसरात आल्यानंतर दोन्ही सभागृहाच्या कामकाजाची माहिती घेतली. माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सांस्कृतिक मंत्री येथे किती वेळ होते किंवा नव्हते याचा अभ्यास केला. माननीय मंत्री इतके व्यस्त नव्हते की, त्यांना कै.पेंडसे यांच्या घरी सांत्वनासाठी जाण्यास वेळ नव्हता. अशा प्रकारातून आपण काय संदेश देत आहात ? शासनाच्या वतीने तृतीयश्रेणी कर्मचाऱ्याच्या हस्ते कै.पेंडसेंच्या घरी सांत्वनपर पत्र पाठविल्याचे समजले. परंतु कै.श्री.ना. पेंडसे यांच्या कुटुंबाचे सांत्वन स्वत: सरकार करत नसेल तर यावर आता बोलून आता काय होणार आहे. अशा घटनेमुळे अतिशय खेद वाटतो. सभागृहात अशा साहित्यिकांना श्रध्दांजली वाहता येते का, याबाबत माहिती घ्यावी लागेल. सरकारकडून चूक झाली आहे त्याचे परिमार्जन म्हणून सभागृहाने त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी अशी मी या निमित्ताने सूचना करतो. सभापती महोदय, ज्यांना एकही मजला चढू नका असे डॉक्टरांनी सांगितलेले आहे ते श्री.विंदा करंदीकर तीन मजले पायी चढून कै.पेंडसे यांच्या घरी जातात परंतु सरकारकडे अद्ययावत वाहने असतानाही त्यांच्याकडे जाता येत नाही. साहित्य, कला, सांस्कृतिक क्षेत्राची ही शोचनीय अवस्था आहे असेच यावरुन दिसून येते, त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो व आपली रजा घेतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी कै.श्री.ना.पेंडसे यांचे निधन झाल्यामुळे त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी सद्भावना व्यक्त केलेल्या आहेत, त्याबद्दल मी संवेदनशील आहे. अशा बाबी घडतात त्यावेळी वाईट वाटते. बा.सी.मर्ढेकर म्हणतात की, "आम्हीच आम्हाला स्वत:ला बघावे, चष्मा काढून डोळयावरचा". राजकारणाचा चष्मा आम्ही सातत्याने घालत असतो त्यामुळे या गोष्टीचे आपल्याला भान राहात नाही. या घटनेबद्दल सर्वांनीच अंतर्मुख व्हावे असा हा प्रश्न आहे. शासनाकडून याबाबत अजूनही काही सुधारणा किंवा दुरुस्ती व्हावी. सदनामध्ये श्री.श्री.ना.पेंडसे यांना श्रध्दांजली अर्पण करावी व त्याची एक प्रत त्या शोकाकूल परिवारापर्यत पोहचवावी. साहित्य प्रेमींचे या गोष्टीकडे लक्ष असल्यामुळे सन्माननीय सांस्कृतिक मंत्री याची दखल घेतील असे मला वाटते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 11 ही राज्यातील पोलीस मुख्यालयांच्या संदर्भात असून जिल्हा पोलीस दलासाठी पूरक मागणी दर्शविण्यात आलेली आहे. मागील 6 ते 8 महिन्यापासून तसेच नागपूरच्या हिवाळी अधिवेशनापासून मी पहात आहे, संपूर्ण देशभर गाजलेल्या निठारी-दिल्ली येथे झालेल्या बालहत्याकांडावरुन हरवलेल्या मुलांचा प्रश्न पुन्हा समोर आलेला आहे. 4-5 दिवसापूर्वी नाशिक जिल्हयातही संशयास्पदरित्या लहान मुलांची हाडे एका गुहेत सापडली आहेत असे वृत्त प्रकाशित झालेले आहे. सर्वोच्च न्यायालयाने व मुंबईच्या उच्च न्यायालयाने असे आदेश दिलेले आहेत की, शासनाने प्रत्येक जिल्हयामध्ये किती छोटी मुले किती हरवली आहेत व त्यापैकी किती सापडली आहेत, याचा आढावा घ्यावा. राज्यातील विविध पोलीस आयुक्तालयांना भेट देऊन मी स्वत: पाहणी केलेली आहे, त्यावेळी अनेक मुद्दे समोर येतात. Missing Children Branch ही प्रत्येक पोलीस अधिक्षक कार्यालय व पोलीस आयुक्त कार्यालयात आहे परंतु या शाखेकरिता जास्त मनुष्यबळाची आवश्यकता आहे.

नंतर श्री.सुंबरे.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

विशेषत: महाराष्ट्र राज्य चांगल्या प्रकारे हायवेने जोडले जात आहे, एका बाजूला शहरांमध्ये गरीबी वाढते आहे. या पार्श्वभूमीवर ही जी हरवलेली बालके आहेत, त्यांच्या बाबतीत पोलिसांची जी शाखा आहे तिचे सक्षमीकरण करण्याची अत्यंत गरज आहे याकडे मला माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधावेसे वाटते. सभापती महोदय, महिला दक्षता समित्यांचा विषय या सभागृहात वारंवार आपण घेत असतो. त्यानुसार सर्व जिल्ह्यात महिला दक्षता समित्या नेमल्या गेल्या असल्या तरी मुंबई शहर सोडले तरी बाकीच्या जिल्हयातील किती महिला दक्षता समित्या कार्यरत आहेत, स्थानिक पोलीस अधीक्षक तसेच अन्य पोलीस अधिकारी त्यांना काम करण्याची कितपत संधी देतात ? त्यांच्या कितपत नियमित बैठका होतात, त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था काय केली जाते आणि विशेषत: त्या महिला जेव्हा पोलीस ठाण्यांमध्ये जाऊन तक्रार करतात तेव्हा त्याबद्दल तेथील पोलीस अधिकारी काय ॲक्शन घेतात हेही आपण आवर्जून पाहिले पाहिजे तसेच यासाठी आपण जास्त आर्थिक तरतूद करणे अत्यावश्यक आहे असे मला मुद्दाम सांगावेसे वाटते. त्याचबरोबर सभापती महोदय, दोन वर्षापूर्वीच्या पुरवणी मागण्यांमध्ये आपण मुंबईच्या प्रत्येक पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांची सोय आपण केली आहे. त्यांच्यासाठी आर्थिक तरतुदीबरोबरच त्यांच्यासाठी स्वच्छता गृहांची सोय केली आहे. पण ग्रामीण भागातील पोलीस ठाण्यामध्ये त्यादृष्टीने काय व्यवस्था आपण केली आहे ? विशेषत: संपूर्ण ग्रामीण भागातील पोलीस ठाण्यांच्या ठिकाणी जाऊन पाहिल्यास तेथे अजूनही याबाबत शोचनीय अशीच अवस्था आहे. म्हणून त्याकडे देखील मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष या निमित्ताने वेधू इच्छिते.

सभापती महोदय, महसूल मंत्र्यांच्या बाब क्र.21 मध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी प्रलंबित पैसे दिलेले आहेत असे आपण म्हटले आहे. पण किती वर्षापासून हे पैसे प्रलंबित आहेत ? आपण येथे आकडे सांगता पण प्रत्यक्षात ते 2 वर्षे, 4 वर्षे पासूनचे पैसे असतात. तेव्हा हे पैसे केव्हा पासून प्रलंबित आहेत हे यातून समजत नाही. त्यामुळे वर्षानुवर्षे हे प्रकल्पग्रस्त न्यायाच्या प्रतिक्षेत असतात त्याबाबत पुरेसा प्रकाश यातून पडत नाही. तेव्हा याबाबत आपल्या उत्तरामध्ये काही खुलासा आपण केल्यास बरे होईल.

सभापती महोदय, वन मंत्र्यांच्या विभागाची बाब क्र. 23, पृष्ठ 19 यात एका घटकाला न्याय देण्यासाठी तरतूद केलेली आहे. परंतु या निमित्ताने संबंधित मंत्री महोदयांना विचारावेसे वाटते की,

..... आयआय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्रातील दीड हजार रोजंदारी वन कामगारांना कायम करण्याबाबत 1996 मध्ये निर्णय घेण्यात आलेला होता. त्यानंतर वारंवार या दीड हजार वन कामगारांबाबतचा प्रस्ताव पाठपुरावा करूनही अद्याप मंजूर झालेला नाही आणि यावेळच्या अर्थसंकल्पामध्ये वा या पुरवणी मागण्यांमध्ये देखील कोठेच त्यांच्यासाठी तरतूद केल्याचा उल्लेख मिळत नाही. त्यामुळे त्या लोकांना कोठेच न्याय मिळत नाही. म्हणून त्यातील अनेक लोक धरण्याला बसले आहेत. तेव्हा या वन कामगारांना न्याय देण्याचा विचार आपण करणार आहात की नाही ? त्यांना आपण केव्हा न्याय देणार आहात ? असा माझा आपणास प्रश्न आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या मंत्र्यांना मी सांगू इच्छिते की, आपण येथे अपंग वित्त व विकास महामंडळास निधी देण्यासाठी पूरक मागणी केलेली आहे. ही चांगली गोष्ट आहे. परंतु या महामंडळाच्या संदर्भातच प्रश्न उपस्थित करावयाचा आहे. उच्च न्यायालयाने शेवटी आपल्याला आदेश दिले की, 3 टक्के त्यांचा कोटा आहे त्यानुसार त्यांची भरती झाली पाहिजे आणि दुसरे असे की, अपंग महामंडळाच्या बाबतीत अनेक महिला अपंगांचेही पब्लिक हिअरींग होण्याच्यादृष्टीने राष्ट्रीय महिला आयोगाच्या वतीने मेळावा घेतला होता. त्यात कर्णबधीर तसेच शारीरिक व्यंग असलेले लोकांनी एक मोठी व्यथा मांडली की, शहरे ही अपंगांसाठी सोयी-सुविधा देणारी असली पाहिजेत. म्हणून मी आमच्या माहितीसाठी स्वत: माहिती घेण्यास गेले होते. अंबरनाथ शहराला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आहे की, त्यांनी अपंगांसाठी म्हणून शहरामध्ये काही सोयी-सुविधा केल्या आहेत. पण मला सामाजिक न्याय विभागाच्या मंत्र्यांना असे विचारावयाचे आहे की, तुम्ही नगरविकास विभागाकडे याबाबत एकदा तरी बैठक घेतली आहे का ? एखाद्या महानगराने या अपंगांसाठी म्हणून काय केले आहे ? यांच्यासाठी काय तरतूद केलेली आहे ? अशी विचारणा केली आहे काय ? अपंगांना सेवेत नोकरी देणे हा एक भाग झाला. परंतु अपंगांचे इतरही जे प्रश्न आहेत, उदा. एखाद्या प्लॅटफॉर्मवर जाण्यापासून ते एखाद्या बिल्डिंगमधील लिफ्टमध्ये व्हीलचेअर घेऊन जाण्यापर्यंतचे प्रश्न आहेत. अशा वेळेस त्या अपंगांची कशी अवघड परिस्थिती होते हे आपण नेहमी पाहतो. याबाबतीत मी अपंग वित्त व विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, मंत्रालयामध्ये देखील अपंग जाऊ शकत नाही, तेथे देखील त्यांच्यासाठी खास अशी काही सोय नाही. त्यांच्यासाठी रॅमची सोय असणे

..... आयआय 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आवश्यक आहे. त्यादृष्टीने आपल्याकडे पैशांच्या बरोबरीनेच संवेदनशील दृष्टीकोन आणि त्याबाबतची समज याची आत्यंतिक आवश्यकता आहे. तरी याबाबत सामाजिक न्याय विभागाच्या मंत्र्यांकडून विचार व्हावा असे मला या निमित्ताने सुचवावेसे वाटते.

सभापती महोदय, त्याचबरोबर सांस्कृतिक कार्य विभागाच्या संदर्भात मी सांगेन की, औरंगाबाद येथील यशवंतराव चव्हाण बंदिस्त नाट्यगृहासाठी सहाय्य म्हणून आपण अधिक बजेटची तरतूद केलेली आहे. त्याबद्दल आपले आभार मानते. या ठिकाणी आज आम्ही महानगरपालिकेमध्ये आहोत. तेथील सांस्कृतिक प्रेमी लोकांची सातत्याने मागणी असते की, त्यांच्या मोठ्या शहरामध्ये नाट्यगृह असले पाहिजे. मला या ठिकाणी सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक विभागाचे लक्ष वेधावेसे वाटते की, मराठी लोकांमध्ये असलेले नाट्यप्रेम तर आपल्याला माहितीच आहे. तेव्हा ज्याप्रमाणे छोट्या मल्टीफ्लेक्समध्ये मराठी सिनेमे चांगल्या प्रकारे चालायला लागले. आणि काही सिनेमांनी 100-100 दिवस, वर्ष-वर्षाचे रेकॉर्डब्रेक केले आहे. याचे कारण मोठी सिनेमागृहे आता परवडत नाहीत तरी छोट्या सभागृहामध्ये 100 ते 300 लोकांची थिएटर्स झाल्यानंतर तेथे मराठी सिनेमे व्हाएबल होऊ लागले.

(यानंतर श्री. सरफरे .... जेजे 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, मला असे सुचवावयाचे आहे की, मराठी नाटकांसाठी ज्याठिकाणी 200 ते 300 प्रेक्षक बसू शकतील अशी छोटी नाटयगृहे निर्माण केली पाहिजेत. ज्याप्रमाणे छबिलदास रंगभूमी ही प्रायोगिक चळवळ होती त्याप्रमाणे अशी छोटी नाटयगृहे मोठया महानगरांमध्ये सुरु केली, मुंबईच्या उपनगरांमध्ये, पुणे - नाशिक याठिकाणी सुरु केली तर या नाटय चळवळीला चांगल्या प्रकारे मदत मिळू शकेल. आपण एका बाजूला म्हणतो की, नको त्या गोष्टींच्या मागे लोक लागलेले असतात. अशा लोकांकरिता प्रेक्षागृहे निर्माण करण्यात आली तर नाटकांना अनुदान देण्यापेक्षा नाटयप्रेमींकरिता अशाप्रकारच्या सुविधा देण्याबाबत सांस्कृतिक विभागाने विचार करावा असे मला सुचवावयाचे आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 50 व बाब क्रमांक 53 मध्ये भिक्षेकरीगृहांमध्ये असलेल्या स्वच्छतागृहांचा उल्लेख करण्यात आला आहे. या संदर्भात मला असे सुचवावयाचे आहे की, महिला व बाल कल्याण, समाज कल्याण व आदिवासी कल्याण विभागांमार्फत करण्यात आलेल्या निवास व्यवस्थेमध्ये आज किती माणसे रहात आहेत? व त्याप्रमाणात त्याठिकाणी किती स्वच्छतागृहे आहेत? यांची आपण अचानक जाऊन पहाणी करावी. मला आलेल्या अनुभवावरुन कागदोपत्री 120 लोकांकरिता 8 स्वच्छतागृहे सांगितली जातात. प्रत्यक्षात त्याठिकाणी पहाणी करणारा माणूस जाऊन पहाणी करीत नाही. तुम्ही जर त्याठिकाणी पहाणी करावयास गेला तर पुढील बाजूला 2 स्वच्छतागृहे आणि मागील बाजूला गेला तर 6 स्वच्छतागृहे पहावयास मिळतात. ती सर्व स्वच्छतागृहे कुलूपे लावलेली, वाळवी लागलेली, बंद पडलेली, कचरा साचलेली अशाप्रकारे कागदोपत्री दाखविली जातात. अशाप्रकारची अतिशय तुटपुंजी व भीषण अवस्था त्याठिकाणी असते. 150 वर्षापूर्वीची अवस्था आज देखील त्याठिकाणी पहावयास मिळते. म्हणून त्या संदर्भात आपण विशेष लक्ष दिले पाहिजे असे मला सुचवावेसे वाटते.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्र. 91 मध्ये वाहनांच्या परताव्याकरिता पूरक मागणी केली आहे. सभापती महोदय, बर्डी आश्रमशाळेच्या संदर्भात महिला आमदारांची एक समिती नेमण्यात आली त्यावेळी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री अध्यक्षा होत्या. त्यावेळी केलेल्या पहाणीमध्ये आढळले आहे की, प्राथमिक आरोग्य केंद्राची वाहने दुर्गम गावापर्यंत जात नाहीत. त्याचे उत्तर डिझेल किंवा पेट्रोलसाठी पैसे नाहीत असे दिले जाते. आणि दुसरे असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

सांगितले जाते की, ते वाहन नादुरुस्त झाले असून त्यांच्या दुरुस्तीसाठी पैश्याची व्यवस्था झालेली नसते. अशा वाहनांची परतावा रक्कम उशिरा मिळाली तर दुर्गम भागामध्ये वाहने पोहोचणार नाहीत. त्यामुळे लोकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचत नाही. या दृष्टीकोनातून मंत्रीमहोदय काटेकोरपणे लक्ष देतील अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे दोन शब्द संपविते.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2006-2007 च्या पूरक मागण्यांवर चर्चा करीत असतांना विषयांची पुनरुक्ती न करता दोन-तीन महत्वाच्या मुद्दयांबाबत माझे मनोगत व्यक्त करणार आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 32 व पृष्ठ क्रमांक 31 मध्ये जवळ जवळ 110 कोटी 50 लाख 20 हजार रुपयांची मागणी करण्यात आली आहे. यामध्ये केंद्र शासन पुरस्कृत प्राथमिक शिक्षण पोषण आहार योजना प्रस्तावित आहे. या योजनेमध्ये स्वयंपाक घर व कोठीचे बांधकाम करण्यासाठी रकमेची तरतूद करण्यात आली आहे. प्रश्न असा आहे की, या योजनेला 7 फेब्रुवारी, 8 फेब्रुवारी व 22 फेब्रुवारी 2007 रोजी मंजुरी मिळाली असल्याचे याठिकाणी नमूद करण्यात आले आहे. आणि 31.3.2007 अखेर ही सर्व रक्कम खर्च केली पाहिजे. प्रश्न असा आहे की, एक महिन्याच्या कालावधीमध्ये जवळ जवळ 18 हजार 417 ठिकाणी स्वयंपाकगृह आणि कोठीचे बांधकाम करणार आहात? ते कसे पूर्ण होणार आहे यासंबंधीचा खुलासा झाला पाहिजे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (पुढे सुरु....

याच अनुषंगाने महत्वाच्या मुद्यावर सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. शालेय पोषण आहार योजना ही अनुदानित आणि अंशत: अनुदानित शाळांना लागू आहे. विना अनुदानित शाळांना ती योजना लागू नाही. ही डिस्पॅरिटी कमी करण्यासाठी विना अनुदानित शाळांनाही ही योजना पुढच्या वर्षापासून लागू करण्याबाबत मंत्री महोदयांनी मागच्या वर्षी आश्वासन दिलेले होते. परंतु या वर्षी ही योजना लागू झालेली नाही. कायम विना अनुदानित आणि विना अनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार योजना लागू करण्याच्या संबंधात शासनाची भूमिका काय आहे ? यासंबंधीचा खुलासा होणे आवश्यक आहे.

दुसरी बाब मला निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, शासनाच्या प्रत्येक विभागाने आपल्या कर्मचाऱ्यांना संगणक साक्षर करण्याच्या दृष्टीने संगणक घेण्यासाठी अग्रीम मंजूर केलेले आहे. त्याप्रमाणे शालेय शिक्षण विभागामधील शिक्षकांना प्राधान्याने संगणक साक्षर करण्यासाठी अग्रीमाची तरतूद करण्याची योजना आखणार आहात काय ? या संदर्भात मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

पृष्ठ क्रमांक 31, बाब क्रमांक 33, जिल्हापरिषद, पुणे यांना 2004-05 या वर्षाकरिता सादिल अनुदानाची थकबाकी देण्यासाठी 12 लाख 32 हजाराची मागणी केलेली आहे. सभापती महोदय, सन 2004-2005 या वर्षामधील सादिल अनुदानाची थकबाकी सन 2005-06 या वर्षी खर्च करण्यास परवानगी दिलेली होती, परंतु जिल्हापरिषद,पुणे यांनी सादिल अनुदानाची थकबाकी खर्च केली नाही. पैसे परत पाठविले. आता पुन्हा त्यांनी मागणी केलेली आहे. यामध्ये ज्यांनी कोणी हलगर्जीपणा केला असेल त्यांच्याबाबतीत आपण कोणती कारवाई करणार आहात ? सभागृहामध्ये दोन वेळा ही पूरक मागणी येत आहे, या संदर्भात खुलासा व्हावा. एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ KTG/

डॉ.दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 11, बाब क्रमांक 8 मध्ये पोलीस शिपायांच्या मानसशास्त्रीय चाचण्या घेण्याकरिता 45 लाख 46 हजाराची मागणी केलेली आहे. पोलिसांवर कामाचा ताण वाढत आहे. त्यांच्या कामाच्या ड्युटीज पाहिल्या तर खरोखरच त्यांच्यावर ताण आहे. ज्या पध्दतीने पोलीस आज काम करतात, त्यामध्ये त्यांना मानसिक आणि शारीरिक ताण सहन होईल की नाही ? या विषयावर खरोखरच चिंतन करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, एशियन हार्ट फाऊंडेशनमध्ये काही पोलिसांच्या हृदय शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. त्यासाठी काही लाख रुपयांची बीले द्यावयाची आहेत. ती देण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या एशियन हार्ट फाऊंडेशनने पोलिसांना हृदय शस्त्रक्रियेसाठी ॲडमिशन देणे बंद केलेले आहे. आपण पंचतारांकित हॉस्पिटलमध्ये पोलिसांना हृदय शस्त्रक्रिया करण्याची सुविधा दिल्याचे सांगत असतो. परंतु या एशियन हार्ट फाऊंडंशनला काही लाख रुपये शासनाकडून देणे बाकी आहे, ते आपण केव्हा देणार आहात ? याबाबत सांगावे.

दुसरी एक बाब मला निदर्शनास आणावयाची आहे की, पोलिसांनी भिकारी मुलांना पकडून त्यांचे पुनर्वसन करण्याची योजना हातामध्ये घेतलेली होती. दोन दिवस वर्तमानपत्रामध्ये फोटो येण्यासाठी ही योजना चालू होती, त्यानंतर ती बंद झाली. आज भिकारी मुले रस्त्यावर भीक मागताना दिसत आहेत. मुलांसाठी आपल्याकडे रिमांड होम आहे. परंतु त्या ठिकाणी जागा नाही. त्या मुलांना आपण शिक्षण देणार आहात काय ? या संबंधाने अर्थसंकल्पामध्ये आणि पूरक मागण्यांमध्ये काहीही उल्लेख नाही. ही फसवी घोषणा आहे की काय ? असा आम्हाला संभ्रम पडतो.

अन्न नागरी पुरवठा विभागाची बाब क्रमांक 78, पान क्रमांक 77 मध्ये मंजूर अनुदानाहून अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी 85 लाख 82 हजाराची मागणी केलेली आहे. आज वजनमाप अधिकाऱ्यांची कमतरता आहे. "शिवालया"च्या बाजूलाच त्यांचे कार्यालय आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

खरोखरच त्या ठिकाणी भरती करणे अत्यंत आवश्यक आहे. आपण मॉल संस्कृती पाहिली असेल. आपण एखाद्या मॉलमध्ये जाऊन भेट द्यावी. त्या ठिकाणी जे पॅक फूड असते किंवा अन्नधान्याचे पदार्थ असतात त्यांच्या क्वांटीटी आणि क्वालिटीबाबत ग्राहकांची फार मोठ्या प्रमाणावर फसवणूक होते. एकावर एक फ्री देऊ असा बिग बाजार सारखा शो लावतात. आपण अमुक एक वस्तू घेतली तर एक वस्तू मोफत मिळेल असे सांगून ग्राहकांची फसवणूक मोठ्या प्रमाणावर केली जाते. इन ऑरबिट सारख्या मोठमोठ्या मॉलमध्ये जाऊन आपण त्यांच्या पदार्थांचे सॅम्पल घेतले तर आपल्या लक्षात येईल. अर्धा किलो खारीवर अर्धा किलो खारी मोफत असे सांगतात. ग्राहकांना देण्यात येणाऱ्या खारीच्या पॅकेटमध्ये अर्धा किलोच खारी असते. त्यामध्ये पाव किलो खारी वरच्या भागात आणि पाव किलो खारी खालच्या भागात पॅक केलेली असते. म्हणजे एकूण अर्धा किलोच खारी दिली जाते. त्या ठिकाणी जी कडधान्ये मिळतात किंवा इतर वस्तू मिळतात त्यांच्या एक्स्पायरी डेटच्या बाबतीत तपासणी करण्यासाठी अधिकाऱ्यांना भेट देण्यास सांगावे. त्या ठिकाणी आपल्याला गैरव्यवहार दिसून येतील.

सभापती महोदय, आरोग्य विभागाच्या संदर्भात माझा कालचा मुद्दा मांडावयाचा राहिलेला आहे. काल मी हा विषय आदिवासी विकास विभागाच्या बाब क्रमांक 99 वर बोलत असताना उपस्थित केला होता. कुपोषित बालकांना सरबत पुरविण्यासाठी 12 कोटी रुपये देण्यात आले होते. काल माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी सांगितले की, हे पैसे आम्ही आरोग्य विभागाकडे दिले. याबाबतीत उत्तर मिळणे आवश्यक आहे. या ठिकाणी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्रिमहोदया उपस्थित आहेत. 12 कोटी रुपयांचे असे कोणते सरबत घेतले किंवा कोणते अर्क असलेले सरबत घेतले आणि ते किती मुलांना वाटप केले ? महाराष्ट्रातील कुपोषित बालकांची संख्या किती ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 82 वरील बाब क्रमांक 81 बाबत बोलावयाचे आहे. मघाशी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, अपंगांसाठी शासनाने महामंडळ स्थापन केले. मी माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. परवा मुंबई

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

मिररमध्ये आलेला लेख वाचला. अंधेरीला साई-सिध्दी सोसायटी आहे. त्या ठिकाणी शर्मा कुटुंबातील दोन अपंग मुली राहतात. त्यांच्या जाण्या-येण्यासाठी बिल्डरने रॅम्प बांधून दिला होता. त्या मुली जन्मापासून अपंग आहेत. त्या दोन्ही मुली अतिशय उत्तम शिक्षण घेत आहेत. परंतु त्या इमारतीच्या लोकांनी एकाएकी तो रॅम्प बंद करुन त्या ठिकाणी पायऱ्या केल्या. या मुली पहिल्या मजल्यावर राहतात. आता त्या मुली व्हील चेअरवरुन जाणे-येणे करतात. त्या सोसायटीच्या सचिवांशी आम्ही संपर्क साधून याबाबत विचारणा केली की, तुम्ही त्यांचा हा रॅम्प का काढून टाकला ? त्यांनी सांगितले की, आमच्या इमारतीचे सौंदर्य खराब होते म्हणून आम्ही तो रॅम्प काढून टाकला. या अपंग मुलींना या ठिकाणी राहावयाचे असेल तर त्यांनी आपली सोय करावी. एकाच कुटुंबातील या दोन मुलींपैकी एक मुलगी शाळेत आणि एक मुलगी कॉलेजला जाते. त्यांना व्हील चेअरवर उचलून तळ मजल्यावर आणावे लागते आणि परत गाडीपर्यंत सोडावे लागते. आपल्याला अपंगांसाठी काही करावयाचे असेल तर आपण त्या साई-सिध्दी सोसायटीच्या लोंकांना बोलवून घ्यावे आणि त्या मुलींची व्यवस्था करण्याबाबत विचारावे. मी या ठिकाणी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्या सर्व प्रश्नांची उत्तरे मंत्रिमहोदयांकडून अपेक्षित आहेत. सभापती महोदय, आपण मला संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि मी माझे भाषण संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2006-07 च्या पूरक मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. पृष्ठ क्रमांक 7 वरील गृह विभागासंबंधी मला एकच मुद्दा आपल्यासमोर स्पष्ट करावयाचा आहे. बाब क्रमांक 8 मध्ये पोलीस शिपायांच्या मानसशास्त्रीय चाचण्या घेण्याकरिता पूरक मागणी करण्यात आलेली आहे. यावेळी शासनाने पोलिसांची भरती केली हे चांगले केले. परंतु अंदाज समितीचा जो अहवाल आहे त्यानुसार आपण त्या भरतीसाठी 1960 चा निकष लावलेला आहे. 1960 च्या निकषावर आधारित पोलिसांची भरती केलेली आहे. 1960 साली मुंबई शहराची लोकसंख्या 30 ते 35 लाख होती. आता मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटी 35 लाख झालेली आहे. त्यामुळे या पोलीस भरतीचे निकष बदलावेत असे मला वाटते. याबाबत कोणत्या अर्थसंकल्पात किती व्यवस्था करता येईल तसेच काय नियोजन करता येईल ते शासनाने करावे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

भरतीसंबंधीचे जे निकष आहेत ते कागदोपत्री तरी बदलावेत अशा त-हेची माझी सूचना आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या संदर्भात एक मजेशीर परंतु गंभीर बाब मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. आपले काही अधिकारी कसे बिनडोक आहेत याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. पृ.क्र. 31 वरील शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या बाब क्रमांक 34 अंतर्गत स्वामी विवेकानंद यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक 12 ते 16 जानेवारी या कालावधीत युवा महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. यासाठी 1 कोटी रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, जी व्यक्ती जिवंत असते तिचा वाढदिवस साजरा केला जातो आणि जी व्यक्ती मृत असते तिची जयंती साजरी केली जाते. आता हे एक कोटी रुपये वाढदिवसानिमित्त मुलांना चॉकलेट वाटण्यासाठी दिले काय ? स्वामी विवेकानंदांचे हिंदुत्वाचे विचार कॉंग्रेसने देखील मान्य केलेले आहेत. सावरकर हे तर हिंदुत्ववादीच होते. सभापती महोदय, हे एक कोटी रुपये कशासाठी खर्च केले आहेत ? मी याठिकाणी नेहमी हे सांगत असतो की, हे राज्य गांभीर्याने चाललेले नाही, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. यासंदर्भात मी संबंधितावर ॲक्शन घ्यावी किंवा त्याला निलंबित करावे असे म्हणणार नाही. परंतु हे अपमानास्पद आहे. सभापती महोदय, काही दिवसांपूर्वी मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले होते की, देशातील महापुरुषांचे धडे हे शालेय शिक्षणामध्ये असायला पाहिजेत. ज्या महापुरुषांनी सामाजिक क्रांती केली, ज्यांनी राष्ट्राला मोठे करण्यासाठी सबंध आयुष्यभर दिशादिग्दर्शन केले अशा महापुरुषांचे धडे शालेय अभ्यासक्रमातून गायब झालेले आहेत. आता विद्यार्थ्यांना लॉर्ड हेस्टिंग, लॉर्ड क्लाईव्ह, लॉर्ड डलहौसी या ब्रिटीशांनी काय केले यासंबंधीचे धडे आहेत. त्यांनी ज्या काही सामाजिक सुधारणा केल्या त्यासंबंधीचा उल्लेख असणे ठीक आहे. परंतु लॉर्ड हेस्टिंग, लॉर्ड क्लाईव्ह, लॉर्ड डलहौसी यांचे धडे विद्यार्थ्यांना आहेत. माझे म्हणणे असे आहे की, या मातीत जन्माला आलेल्या महापुरुषांनी या देशासाठी खूप काही केलेले आहे. त्या महापुरुषांचे धडे शालेय अभ्यासक्रमामध्ये असायला पाहिजेत. या निमित्ताने माझा माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न आहे की, या एक कोटी रुपयाचे आपण काय केले ? आपण विद्यार्थ्यांच्या निबंध स्पर्धा घेतल्यात का ? आपण जे काही अनुदान देतो ते योग्य पध्दतीने खर्च झाले

. ...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

पाहिजे.

सभापती महोदय, आणखी एक बाब मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, अपंगाची 3टक्के भरती करण्यासंसबंधीचे नियम असून न्यायालयानेही तसे आदेश दिलेले आहेत. एखादी डी.एड.शिक्षकाची जागा अपंगासाठी राखीव असेल आणि त्या अर्हतेचा अपंग उमेदवार उपलब्ध नसेल तर ती जागा कमी अर्हताप्राप्त अपंग उमेदवारासाठी किंवा अन्य उमेदवारासाठी देण्यास मान्यता दिली जात नाही. तसेच एस.सी. आणि एन.टी.च्या जागा क्रिएट झाल्या नंतर शासनातील 8 खात्यांकडून अतिरिक्त शिक्षक आहे का यासंबंधीची माहिती घेतली जाते. त्यांच्याकडे अतिरिक्त शिक्षक नसला की, जाहिरात देऊन शिक्षकाची भरती होई पर्यन्त चार-पाच महिन्याचा कालावधी जातो. परिणामी अध्यापनासाठी शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून पद भरले जाई पर्यन्त शासनाने पर्यायी व्यवस्था केली पाहिजे.

सभापती महोदय, पृ.क्र. 82 वरील सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाच्या बाब क्रमांक 80 मध्ये अध्यापन व अध्यापनेतर कर्मचारीवर्गाच्या वेतनाकरिता अतिरिक्त सहायक अनुदान व निवासी विद्यार्थ्यांकरिता निर्वाह अनुदाने यासाठी आकस्मिकता निधीतून रुपये 15कोटी एवढी आगाऊ रक्कम काढण्यात आली आहे. अध्यापन व अध्यापनेतर कर्मचारीवर्गाचे वेतन आणि इतर भत्ते ह्या गोष्टी नियमित खर्चाच्या आहेत. त्यासाठी आकस्मिकता निधीतून कसा काय खर्च केला ? मागील तीन अर्थसंकल्पाच्या वेळी सर्व सन्माननीय सदस्यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे की, आकस्मिकता निधीतून 30 ते 32 टक्क्यापर्यन्त खर्च होणे इष्ट नाही.. हा खर्च 5 ते 10 टक्क्यापर्यंत असेल तर ते समजण्यासारखे आहे. बाब क्रमांक 80 मध्ये 15 कोटी रुपये वेतन आणि अन्य अनुषंगिक गोष्टीसाठी आकस्मिकता निधीतून खर्च करण्यात आलेले आहेत. याचा अर्थ आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय असे प्रकार सुरु आहेत.

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

ज्या नियमित तरतुदी करणे आवश्यक आहे त्या सुध्दा केल्या जात नाहीत. मग आयत्या वेळेला पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून तरतुदी करायच्या असे प्रकार सुरु आहेत. सभापती महोदय, काही कार्यालये, विशेषत: काळाचौकी येथील शिधावाटप कार्यालयाची दुरावस्था आपण पहा. ते कार्यालय कधीही कोसळून पडेल आणि तेथील अधिकारी व कर्मचारी वर्ग मृत्युमुखी पडेल अशी स्थिती आहे. जो गहू शिधावाटप दुकानातून दिला जातो त्या गव्हापासून गृहिणींनी तयार केलेल्या पोळ्या हातात धरुन दाखवित असतानाचे छायाचित्र वृत्तपत्रातून प्रसिध्द झाले आहे. हा गहू गरीबांसाठी उपयुक्त आहे का? कल्याणकारी राज्य चालविता त्या कल्याणकारी राज्यामध्ये दारिद्र्य रेषेखालील लोकांना आपण रेशन दुकानातून जो गहू देत आहात तो योग्य प्रकारचा नाही. निदान माणसांना खाण्यासाठी उपयुक्त असेल असे धान्य द्या. जनावरे सुध्दा तो गहू खाऊ शकणार नाहीत. या विषयाबाबत काळजी घ्यावी एवढे बोलून आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2006-07 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक-11, बाब क्रमांक-8 पोलीस शिपायांच्या मानसशास्त्रीय चाचणीबद्दलची ही बाब आहे. मानसशास्त्रामध्ये अनेक गोष्टींचा बेसिक विषय आहे. त्यातील पर्यावरण हा एक विषय आहे. मुंबईसारख्या ठिकाणी अनेक पोलीस स्टेशन्स बऱ्यापैकी सुधारली जात आहेत. परंतु पोलिसांची मानसिकता ही त्यांच्या घरापासून सुरु होते. त्यांची घरे, त्यांचे गणवेष या संदर्भात मी वारंवार सभागृहात बोललो आहे. आजही दुर्दैवाने सांगावे लागत आहे. आपणही पाहू शकाल. पोलिसांना दिले जाणारे गणवेष व बूट यांचा प्रकार भयानक आहे. 7 नंबरचे बूट हवे असतील तर 7 नंबरचे बूट मिळत नाहीत. यामध्ये अजूनही सुधारणा झालेली नाही. आणखी एक विनोद या पुरवणी मागण्यांमध्ये दिसून येत आहे. यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी स्वामी विवेकानंदांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी 1 कोटी रुपये पुरवणी मागण्यांद्वारे घेतल्याचा विषय मांडला आहे. बाब क्रमांक-7 अन्वये सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासाठी पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. मात्र बाब क्रमांक-12 अन्वये पुन्हा गोंदिया जिल्हयातील बिर्सी गावात दुसरी भारत राखीव बटालियन निर्माण करण्यासाठी पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. या मागणीमध्ये पोलीस शिपायांची वेतनश्रेणी रु.3050-4590 दाखविली असून बाब क्र.7 मध्ये 3200-4900 दाखविली आहे. नक्की कोणती वेतनश्रेणी देणार आहात? नाही तर पुन्हा कालांतराने पुरवणी मागणी सादर करुन सुधारित वेतनश्रेणी लागू करणार आहात का? त्यावेळी स्पष्टीकरण देताना, नजरचुकीने 3050-4590 ही वेतनश्रेणी दिली गेली, आता सुधारित 3200-4900 ही वेतनश्रेणी लागू करीत आहोत असे सांगितले जाईल. पुढील पृष्ठावर आपण कोणती वेतनश्रेणी लागू करीत आहोत हे सुध्दा अधिकाऱ्यांना कळत नाही. यामध्ये योग्य ती सुधारणा व्हावी. खास करुन पोलिसांच्या गणवेषामध्ये सुधारणा करावी. बूट दिले जात असताना ते बाटा कंपनीमधून पोलिसांनी स्वत: घ्यावेत, त्याचे पैसे शासनाकडून दिले जातील अशी व्यवस्था करावी. गणवेषाच्या कपड्याबद्दल तर विचारु नका. अनेक पोलीस शिपाई स्वत:च्या खर्चाने गणवेष शिवून घेतात. पोलिसांच्या गणवेषाकडे पाहिले तर हे सहज कळून येते. सारख्याच रंगाचे ते गणवेष आहेत का?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

सभापती महोदय, बाब क्र.24 ही वन विभागाशी संबंधित आहे. वनीकरणाच्या संदर्भात मी सभागृहात वारंवार वन खात्याकडे मागणी केली. अजूनही दुर्दैवाने जेवढे वणवे म्हणून दिसतात ते वणवे नसतात. मी सातत्याने ही मागणी करीत आहे आणि मंत्रीमहोदय देखील ही बाब मान्य करतात. ज्याप्रमाणे फायरब्रिगेड बोलविण्यासाठी टोल फ्री नंबर असतो तसा टोल फ्री नंबर या वन क्षेत्रातील वणव्यांच्या संदर्भात एसओएस म्हणून दिला जावा आणि या आगी विझवाव्यात. सभापती महोदय, आपणही महामार्गावरुन प्रवास करीत असताना पाहू शकाल. अक्षरश: जीव जळतो. परंतु आपण काही करु शकत नाही. कोणाला कळवावे हे समजत नाही. सभागृहात मागणी केल्यानंतर मंत्रीमहोदयांनी देखील तत्वत: मान्य केले. परंतु आजपर्यंत अंमलबजावणी झालेली नाही. वन क्षेत्रामध्ये ज्या खाणी आहेत त्याबाबत दोन दिवसापूर्वी सभागृहात चर्चा झाली. महापे-शीळफाटा या ठिकाणी प्रचंड डोंगर जे वृक्षराजीने नटलेले होते, त्या परिसरात खाणी सुरु असून कोणते प्रकार चालू आहेत याची एकदा शासनाने पाहणी करावी. यातून पर्यावरणाचा धोका निर्माण झालेला आहे. पावसाचे प्रमाण कमी होणार आहे. या संदर्भात शासनाने समिती गठीत केली. त्यामुळे उरण आणि त्या आसपासच्या पट्टयात जे दृश्य आज दिसते आहे त्याची शहानिशा समितीमार्फत केली जाईल. सगळया ठिकाणी जोरदारपणे डोंगर कापण्याचे प्रकार सुरु आहेत. दगडखाणी आणि वाळू उपसा करण्याचा व्यवसाय जोरदारपणे सुरु आहे. या बाबीकडे वन विभागाने त्वरित लक्ष द्यावे अशी विनंती करतो. महापेचा मी खास उल्लेख केला आहे.

सभापती महोदय, ठाणे-रायगड जिल्हयामध्ये निवडणुकीच्या निमित्ताने मी गेलो होतो. मुरुड-जंजिरा पट्टयात फिरत होतो.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

सभापती महोदय, आपण जेव्हा जंजि-यावरुन रोहा गावाकडे येतो त्यावेळेस जंगलाची काय परिस्थिती आहे हे दिसून येते. तशीच परिस्थिती पणवेलवरुन पेणला जातो तेव्हा सुध्दा आपल्याला तशीच परिस्थिती दिसते. या ठिकाणची आदिवासी मंडळी प्रचंड प्रमाणात जाळण्यासाठी लाकडाची तोड करतांना दिसतात. आज प्रचंड प्रमाणात जंगलतोड होत आहे. जंगल तोडीमुळे जंगलांचा -हास झाल्याचे आपल्याला दिसून येत आहे. आपण जर जंगलाचे सवंर्धन केले नाही तर काही वर्षामध्ये आपल्याला जंगल पहायला सुध्दा मिळणार नाही. त्यामुळे जंगलतोड होणार नाही याकडे मोठया प्रमाणात लक्ष देण्याची आवश्यकता आहे. जंगलाचे संरक्षण करण्यासाठी आपण जे वनसंरक्षक नेमलेले आहेत त्यांना किती चौरस फुटाचे संरक्षण करण्याची जबाबदारी दिलेली आहे याची सुध्दा माहिती तपासण्याची आवश्यकता आहे. या वनसंरक्षकांकडे कसल्याही प्रकारचे शस्त्र नसते. जो स्वत:चे संरक्षण करु शकत नाही तो जंगलाचे संरक्षण कसे काय करणार ? किती तरी वनसंरक्षक हे व्यसनाधीन झालेले आहेत, त्यांना डास चावतात, विंचू चावतात असे असतांनाही हे वन संरक्षक अशा पध्दतीत काम करीत असतात. या वन संरक्षकांना कसल्याही प्रकारची सुविधा उपलब्ध करुन दिली जात नाही याचे दु:ख आहे. वनाचे संरक्षण करण्याच्या नावाखाली आज मोठया प्रमाणात जंगलतोड सुरु आहे. आपण जर वन विकास महामंडळाला विचारले की, किती झाडे लावली आणि त्यापैकी किती झाडे जगली तर ते काही सुध्दा माहिती सांगू शकत नाही. झाडे लावली जातात परंतु त्यांची निगा आणि त्यांना संरक्षण ज्या पध्दतीने द्यावयास पाहिजे त्या पध्दतीने मिळत नसल्यामुळे जंगल वाढायचे सोडा परंतु जंगलाचाच -हास होत चालला आहे. सभापती महोदय, ज्या प्रमाणे पोलिसांची मानसशास्त्र चाचणी होत असते त्याच प्रकारची शारीरिक आणि मानसिक चाचणी वनसंरक्षंकाची होण्याची आवश्यकता आहे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्र. 32, प्राथमिक पोषण आहाराच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. निवडणुकीच्या निमित्ताने मी मोखाडा येथे गेलो होतो तेव्हा त्या ठिकाणच्या रेशनिंग दुकानात कोणत्याही प्रकारचे धान्य नव्हते. दुकानातून धान्य विकत घेण्यासाठी आदिवासींकडे पैसेही नसतात त्यामुळे रेशनिंगमध्ये धान्य नेहमी उपलब्ध असले पाहिजे. मी निवडणुकीच्या निमित्ताने दर्यापूर येथे गेलो. खरे म्हणजे मी जेव्हा दौ-यावर असतो तेव्हा त्या ठिकाणच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

बालवाडयांना नेहमी भेट देत असतो. माझे बालपण गरिबीत गेलेले आहे. परंतु जेव्हा बालवाडयांतील मुलांची परिस्थिती बघतो तेव्हा माझ्या अंगावर काटा येतो. या मुलांचे हाल पाहिले तर यांच्यापेक्षा जनावरे बरे असे वाटते. या मुलांचा माणूस म्हणून जगण्याचा अधिकार काढून घेतला जात आहे. त्यामुळे माझी सर्व माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, आपण बालवाड्या, अंगणवाडयांना सरप्राईज भेट देत चला. सरप्राईज भेट दिली तर मुलांना निश्चितपणे चांगला आहार मिळू शकेल. मी ज्या बालवाडीला भेट दिली तेव्हा तेथील मुलांना खाण्यासाठी कडधान्य उकडून देण्यात आले होते. कडधान्य उकडले असल्यामुळे त्याला आपण ऊसळ सुध्दा म्हणून शकत नाही. मी तेथील शिक्षकेला विचारले की, हे उकडलेले कडधान्य मुले खातात का? तेव्हा त्या शिक्षकेने सांगितले की, उकडलेले कडधान्य मुले खात नाही. एखाद्यावेळेस उकडलेले कडधान्य मिळाले तर मुले खाऊ शकतील परंतु रोजच उकडलेले कडधान्य दिले तर ती मुले कशी काय खाऊ शकतील?

सभापती महोदय, मी महानगर पालिकेच्या शाळेत शिक्षण घेतलेले आहे. त्यावेळेस आम्हाला 100 एम.एल. आरेचे दूध मिळायचे. या दुधावर चांगल्या प्रकारची मलई असायची, तसेच या दुधाबरोबर एक चिकू किंवा केळे सुध्दा दिले जात असे. दूध आणि फळ दिले तर त्याला आपण आहार म्हणू शकतो. ज्या प्रमाणे मुंबई महानगर पालिकेच्या शाळेत आहार दिला जात होता तशाचा प्रकारचा आहार बालवाडी, अंगणवाडी, तसेच प्राथमिक शाळेतील मुलांना मिळणे आवश्यक आहे. कडधान्य उकडून आपले पैसे वाया जात आहे व ठेकेदारांचे पोट भरत आहे. या योजनेचा मुलांना काडीचाही उपयोग होत नाही त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी लक्ष द्यावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 79, सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. आपण सामाजिक न्याय आणि संस्कृतीच्या गोष्टी करीत असतो. 18 मार्च रोजी छत्रपती संभाजी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्ताने मी सभागृहात विषय उपस्थित केला होता. वडूज येथे संभाजी महाराजांची खाल उतरवली गेली, डोळे काढले गेले त्या ठिकाणी छत्रपती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....

संभाजी महाराजांची समाधी आहे. या ठिकाणी छत्रपतींचे स्मारक व्हावे यासाठी तेथील मंडळ सातत्याने शासनाकडे पैशांची मागणी करीत आहे. छत्रपती संभाजी महाराज हे क्षात्रतेजाने परिपूर्ण होते. त्यामुळे संभाजी महाराजांच्या स्मारकासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा. राजगुरुंच्या समाधीची सुध्दा तीच अवस्था आहे. चाफेकरांच्या समाधीच्या डागडुजीसाठी पिंपरी-चिंचवड महानगर पालिका काम करीत आहे. शिवसेना भाजपची सत्ता होती त्यावेळेस माननीय मनोहर जोशी यांनी या स्मारकांसाठी 5 लाख रुपयाचा निधी उपलब्ध करुन दिला होता. त्यामुळे शासनाने छत्रपती संभाजी महाराज, राजगुरु आणि चाफेकर यांच्या स्मारकासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती करतो.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

त्याठिकाणी फक्त पुतळे उभारु नयेत तर इतिहाससुध्दा उभा करावा.

आळंदी-देहू येथील तीर्थस्थळा सभोवती अत्यंत गलिच्छ भाग आहे. त्याठिकाणच्या पायऱ्या व घाट ज्यावरुन लाखो भाविकांची ये-जा असते त्याची अवस्था बिकट झालेली आहे. महाराष्ट्राला संताची परंपरा लाभलेली आहे. आळंदी येथे संत ज्ञानेश्वरांची समाधी आहे तर देहू येथे संत तुकारामांची समाधी आहे. माझी आपणास विनंती आहे की, आपण माझ्याबरोबर तेथे चलावे आणि तेथील भागांची प्रत्यक्ष पाहणी करावी. मी स्वत: त्याठिकाणी जाऊन आलेलो आहे. तेथील अनेक भागात गलिच्छपणा आलेला आहे. मालेगाव येथे इस्तीमा झाला त्यासाठी सरकारने दोन कोटी रुपयांची मदत केली. त्याप्रमाणे याही ठिकाणी शासनाने भरीव मदत करावी अशी मागणी करुन माझे दोन शब्द पुरे करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, बाब क्रमांक 10, पृष्ठ क्रमांक 10 - भारतीय पोलीस सेवेतील चार अधिसंख्य पदांची निर्मिती करणे- पोलीस महाव्यवस्थापक श्री.सत्यपाल सिंह हे कोकणातील एका कॉलेजच्या कार्यक्रमासाठी चीफ गेस्ट म्हणून आले असताना त्यांनी त्यांच्या भाषणात "नेते भ्रष्टाचार करु लागले तर जनतेने त्यांच्याकडून कोणता आदर्श घ्यावा ? असा उल्लेख केला. त्यांनी कोकणातील नेत्यांबाबत उल्लेख केला की राज्यातील नेत्यांबाबत उल्लेख केला की, जिल्ह्यातील नेत्यांबाबत उल्लेख केला की, कोणत्या पक्षाच्या नेत्याबाबत उल्लेख केला याचे स्पष्टीकरण माननीय गृहमंत्र्यांनी करावे.

बाब क्रमांक 15, पृष्ठ क्रमांक 14 - मंजूर अनुदानापेक्षा अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त अनुदाने- सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि एस.पी. या दोधा अधिकाऱ्यांचे नाते पती-पत्नीचे आहे. या दोन्ही अधिकाऱ्यांमार्फत काहीही कारण नसताना सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनेकवेळा 144 कलम अन्वये बंदी हुकूम लावला जातो. कोकणातील आंगणेवाडीची जत्रा हे अनेकांचे श्रध्दास्थान आहे. अंगणेवाडीच्या जत्रेला राज्यातून मोठ्या प्रमाणावर भाविक येत असतात. परंतु यावेळी आंगणेवाडीच्या जत्रेला गालबोट लावण्यात आले. मुंबईत महानगरपालिकेमध्ये पुन्हा शिवसेना-भाजप युतीचे सरकार आल्यामुळे या पक्षाचे अनेक नगरसेवक आंगणेवाडीच्या जत्रेला येऊ नयेत म्हणून त्याठिकाणी 144 कलम लावण्यात आले. या दोन अधिकाऱ्यांच्या वागणुकीमुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथे झालेल्या पोटनिवडणुकीत शिवसेनेचे कार्यकर्ते श्री.रमेश गोवेकर बेपत्ता झाले. सरकारने हे प्रकरण सी.बी.आय.कडे सुपूर्द केले. परंतु सिंधुदुर्ग जिल्ह्याचे एस.पी. सी.बी.आय.ला कोणत्याही प्रकारचे सहकार्य करीत नसल्यामुळे अजूनही श्री.रमेश गोवेकर यांचा अजून पत्ता लागलेला नाही याची दखल माननीय गृहमंत्र्यांनी घ्यावी.

बाब क्रमांक 24- पृष्ठ क्रमांक 19- वन विभाग - मंजूर अनुदानातून अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त नियत वाटप करण्यासाठी पूरक मागणी सादर करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, नुकसानी बाबत अनुदानाचे वाटप होत असताना ज्या शेतकऱ्यांकडे संरक्षणार्थ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर.....

बंदूक आहे त्यांना नुकसान भरपाई देण्यात येत नाही. कोकणात हत्तींमुळे शेतीचे आणि फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. शेतकऱ्यांकडे बंदूक असून देखील ते हत्तींना मारु शकत नाही आणि आपल्या डोळ्यादेखत ते स्वत:च्या शेतीचे वा फळबांगाचे नुकसान होताना पाहतात. तेव्हा बंदूक असलेल्या शेतकऱ्यांनासुध्दा शासन नुकसान भरपाई देणार आहे काय ?

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

सभापती महोदय, क्रीडा व युवक सेवा विभागाची बाब क्रमांक 34, पान क्रमांक 31 वर मी बोलणार आहे. सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये सिंधुदुर्ग जिल्हयाच्या क्रीडा संकुलाचा उल्लेख केला आहे. सदरचे क्रीडा संकुल उभे राहिल्यानंतर त्याठिकाणी दोन वर्षे ठेकेदाराने निधीअभावी त्या संकंलास टाळे लावून बंद अवस्थेत आपल्या ताब्यात ठेवले आहे. त्या क्रीडा संकुलाची देखभाल व दुरस्त्री होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे आपण आमच्या क्रीडा संकुलास लवकरात लवकर निधी मंजूर करुन द्यावा, ही विनंती.

सभापती महोदय, कृषि विभागाची बाब क्रमांक 71, पान क्रमांक 72 वर मी बोलणार आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील कृषि विभागाला एकात्मिक योजनेंतर्गत 2 कोटी 8 लाख रुपयाच्या तरतुदीस अर्थसंकल्पामध्ये मंजुरी घेण्यात आली. परंतु विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक 29 जानेवारीपर्यंत कुठल्याही कामाचे नियोजन किंवा कृति आराखडा तयार केलेला नाही. दिनांक 31 मार्चच्या आधीच मशीनच्या माध्यमातून कामे करण्याची प्रॅक्टीस आज आमच्या जिल्हयामध्ये चालू आहे. 4 वर्षापूर्वी मी जिल्हा परिषदेचा सदस्य असताना एका अधिकाऱ्याच्या कार्यालयात जाऊन माहिती घेण्याचा प्रयत्न केला होता व त्याबाबतचा उल्लेख मी याठिकाणीही केला होता. परंतु त्याचा खुलासा अजूनही माननीय मंत्रिमहोदयांकडून झालेला नाही. कणकवली तालुक्यातील शिरवल व करुळ या दोन गांवामध्ये 20 किलो मीटरचे अंतर असून या दोन गावांमध्ये एकाच दिवशी 25 कर्मचारी काम करीत असल्याचे मस्टरवर आढळून आले. याचा पुरावा माझ्याकडे आहे. परंतु याबाबतही माननीय मंत्रिमहोदयांनी अजूनपर्यंत कुठल्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही, तो त्यांनी करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, ग्रामविकास व जलसंधारण विभागाची बाब क्रमांक 75 व पान क्रमांक 73 वर मी बोलणार आहे. सभापती महोदय, विजेच्या बिलाची रक्कम भरण्यासंबंधी एमएसईबीकडून सातत्याने ग्रामपंचायतीकडे तगादा लावला जातो. ग्रामपंचायतीस विकासाच्या निधीतून सदरची बिले भरावी लागतात. नंतर सदर बिलांची रक्कम ग्रामविकास खात्याकडून मिळते. याबाबतीत माझी विनंती आहे की, ग्रामविकास विभागाने विजेच्या बिलाची रक्कम परस्पर एमएसईबीला अदा करावी.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

सभापती महोदय, आरोग्य विभागाची बाब क्रमांक 91, पान क्रमांक 97 वर मी बोलणार आहे. सभापती महोदय, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये आपण आपल्या सभापतीस्थानावरुन शासनास निदेश दिले होते की, 15 दिवसांच्या आत सिंधुदुर्ग जिल्हयातील रुग्णालयांत डॉक्टरांची भरती करावी. परंतु इतके दिवस होऊनही डॉक्टरांची भरती शासनाने केलेली नाही. आज सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात 16 डॉक्टरांची पदे मंजूर असून 13 डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. त्यामुळेच आज रुग्णालयात सेवा घेण्यासाठी कोणताही रुग्ण त्याठिकाणी जात नाही. त्यांना माहिती आहे की, आपण त्या रुग्णालयात उपचार घेण्यासाठी गेलो तरी आपल्याला त्याठिकाणी व्यवस्थित सेवा मिळणार नाही. त्यामुळे नाईलाजास्तव तेथील अनेक रुग्णांना कोल्हापूर, गोवा किंवा मुंबईमध्ये स्थलांतरित व्हावे लागते. त्यामुळे माझी माननीय आरोग्य मंत्र्यांना विनंती आहे की, सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात डॉक्टरांच्या नेमणुका त्वरीत कराव्यात. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद !

..3.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझिज (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2006-2007 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कामकाजपत्रिकेतील अनुक्रमांक सहामध्ये सन 2006-2007 च्या पुरवणी मागण्यांवर खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल असे म्हटले आहे. त्यामध्ये क्रमांक 5 मध्ये आपण पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय व औकाफ मंत्री असा उल्लेख केला आहे. परंतु याठिकाणी आपण जे खर्चाचे पूरक विवरणपत्र दिले आहे, त्यामध्ये औकाफ विभागाचा पत्ताच दिसत नाही. मग, आम्ही कोणत्या हेडवर बोलायचे ?

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.अे.अझिज.....

या वक्फ बोर्डासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याबाबतची विनंती मी गेल्या तीन वर्षांपासून करीत आहे. हा विषय महसूल विभागाकडे आहे. महाराष्ट्रामध्ये वक्फ बोर्ड स्थापन होऊन तीन वर्षांचा कालावधी लोटला आहे. केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशातील सर्व राज्यांमध्ये वक्फ बोर्डाची स्थापना झालेली आहे. विशेष म्हणजे इतर सर्व राज्यांनी वकफ् बोर्डासाठी आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. गुजराथ या राज्यात भारतीय जनता पक्षाचे सरकार असूनही त्या ठिकाणी तीन कोटी रुपयांची तरतूद वकफ् बोर्डासाठी करण्यात आलेली आहे. कर्नाटक राज्याने तीन कोटी रुपये, उत्तर प्रदेश सरकारने पाच कोटी रुपये या बोर्डासाठी उपलब्ध करुन दिलेले आहेत. तसेच, देशातील छोटया छोटया राज्यांनीही अशीच आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, आपल्या राज्याने अजूनपर्यन्त या बोर्डासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. संपूर्ण राज्यासाठी या बोर्डाची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच प्रत्येक जिल्हयामध्ये वक्फ अधिकायाचे पद निर्माण करण्याचे धोरण आहे. परंतु, अद्याप शासनाने निधीच उपलब्ध करुन दिलेला नसल्यामुळे ही पदे भरण्यात आलेली नाहीत. या बोर्डाचा संबंध अल्पसंख्याक समाजाशी आहे. निवडणुकीमध्ये भाषणे करतांना राष्ट्रवादी काँग्रेस किंवा काँग्रेसचे नेते 'सेक्युलर पार्टी' असा पक्षाचा उल्लेख करतात.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, औरंगाबाद येथे वक्फ बोर्डाच्या जमिनी विकण्याचा प्रयत्न होत आहे. कोणत्या अधिकाराखाली वक्फ बोर्ड जमिनी विकत आहे ?

डॉ.एम.अे.अझिज : सभापती महोदय, एक इंचही जमीन विकलेली नाही. माझे मित्र, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांना मी अशी माहिती देऊ इच्छितो की, नियमाप्रमाणे वक्फ बोर्डाच्या जमिनी विकता येत नाहीत. सन्माननीय सदस्यांकडे जर काही कागदपत्रे असतील तर ती त्यांनी द्यावीत.

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) : सन्माननीय सदस्यांच्या मी लक्षात आणून देतो की, आज सभागृहाला सादर झालेल्या पूरक मागण्यांमध्ये औकाफ या विभागाच्या पूरक मागण्या सादर झालेल्या नाहीत. त्यामुळे पूरक मागणी नसेल तर त्या विषयावर सन्माननीय सदस्यांना बोलता येत नाही.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.अे.अझिज : सभापती महोदय, मी जो मुद्दा उपस्थित करीत आहे तो महसूल विभागाशी संबंधित आहे. यासंदर्भात घेंतलेल्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले होते की, वक्फ बोर्डाला दरवर्षी अडीच कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येतील. परंतु, अद्याप हा निधी देण्यात आलेला नाही. माननीय महसूल राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. माझी त्यांना विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे त्यांनी कमीत कमी या वर्षासाठी अडिच कोटी रुपये वक्फ बोर्डाला उपलब्ध करुन द्यावेत. एवढे बोलतो आणि माझे बोलणे थांबवितो. धन्यवाद.

..3.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, मला एक सूचना करावयाची आहे. खर्चाच्या पूरक विवरणपत्रातील पृष्ठ क्रमांक 4 येथे कृषि, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग तसेच उर्जा, उद्योग व कामगार असे विभाग दर्शविले आहेत. माझी अशी सूचना आहे की, शासनाने पुढील वर्षापासून विवरणपत्रामध्ये हे विभाग स्वतंत्रपणे दर्शवावेत.

श्री.बाळासाहेब थोरात (कृषिमंत्री) : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

..4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री.मधुकर चव्हाण, श्री.रमेश निकोसे यांनी आपले विचार मांडले व वेगवेगळया मुद्यांचा परामर्श घेतला. वैधमापन शात्र विभागाच्या कार्यालयाचा मुद्दा या अनुषंगाने मांडण्यात आला. तसेच, सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे यांनी मुंबईतील केरोसीन वाटपासंबंधी महत्वाचा मुद्दा मांडला. हे मुद्दे तसेच सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या इतर मुद्यांची दखल निश्चितपणे घेण्यात येईल. वितरण व्यवस्थेअंतर्गत सर्वसामान्य नागरिकांना अन्नधान्य व केरोसीनचा पुरवठा नियमितपणे करण्याच्या दृष्टीकोनातून सरकार पावले उचलित आहे.

यानंतर कुमारी जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनिल तटकरे.....

याबाबत सा-या सभागृहाचे सहकार्य आम्हाला मिळावे व आपल्यामार्फत ज्या ज्या काही आमच्या विभागाच्या मागण्या मांडलेल्या आहेत, त्यांना मान्यता देण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

श्री.मधुकर सरपोतदार : मॉलच्या संदर्भात सुध्दा काही तरी उत्तर देण्यात यावे.

श्री.रमेश निकोसे : यापूर्वी मी सभागृहात उल्लेख केल्याप्रमाणे श्रीमती अनुजा मोरे,लघुलेखिका यांना " विशेष बाब " म्हणून कामावर रुजू करुन घेण्यात यावे, अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SS -2.....

श्री.सिध्दराम म्हेत्रे (गृह,तुरुंग फलोत्पादन राज्यमंत्री) : सन्माननीय सदस्य सर्वश्री. मधुकरराव सरपोतदार,विनोद तावडे,डॉ.दीपक सावंत, सर्वश्री.अरविंद सावंत,परशुराम उपरकर, मधुकर चव्हाण यांनी ज्या काही गृह विभागाच्या बाब क्रमांक 7 ते 12 मधील मागण्यांवर आपले विचार व्यक्त केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.मधुकरराव सरपोतदार यांनी पोलिसांना वेतनवाढ कधी मिळणार,असे विचारले होते. पोलिसांच्या वेतनवाढीचा आदेश निघालेला आहे. वेतनवाढीकरिता राज्यशासनाने 8 कोटी सहा लाख रुपयांची तरतूद केली आहे. वेतनवाढीकरिता एवढा खर्च कशामुळे झाला, असेही विचारण्यात आले होते. त्याबाबतीत बोलावयाचे झाले तर डी.ए.मध्ये वाढ होत असते, त्यामुळे या तरतुदीमध्ये वाढ होत असते. पोलिसांकरिता अर्थसंकल्पामध्ये सुमारे 2774 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दिपक सावंत यांनी विचारले होते की, " एशियन हार्ट " या हॉस्पीटलकरिता जो 30 लाखाचा चेक देण्यात येणार होता तो कधी देणार आहे, त्यांना माझे सांगणे आहे की, त्या बिलाचा 30 लाखाचा चेक तयार आहे, तो येत्या सोमवारी अदा करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी विचारले होते की, पोलिसांच्या भरतीकरिता सन 2007 उजाडले तरीही 1960 चे निकष लावण्यात येतात. सन 1960 चे जे निकष आहेत, ते पदनिर्मितीचे निकष आहेत. पूर्वी इयत्ता 10 वी उत्तीर्ण या अर्हतेवर पोलिसांची भरती करण्यात येत होती, परंतु आता इयत्ता 12 वी उत्तीर्ण या अर्हतेवर पोलिसांची भरती करण्यात येते. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी विचारले होते की, आपल्या राज्यातील पोलीस शिपाई आणि इतर राज्यातील पोलीस शिपाई यांच्या वेतनामध्ये फरक आहे. आपल्या राज्यातील पोलीस शिपाई यांची वेतनश्रेणी 3050 - 4590 होती, ती आता 3200 - 4900 इतकी करण्यात आली आहे. ही वाढ मान्य करण्यासाठी शासन निर्णय निघाल्यावर अंमलबजावणी करण्यात येईल. एप्रिल,2007 मध्ये या सर्व मागण्या नक्की मान्य करण्यात येतील. इतर सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या सूचना केल्या आहेत त्याबद्दलही निश्चितपणे विचार केला जाईल. मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो की, गृह विभागाच्या पुरवणी मागण्या मान्य करण्यात याव्यात.

SS -3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार : हायवेवर असलेल्या ढाब्यांमध्ये आणि हॉटेल्समध्ये दारु विकण्यासाठी परमिट्स घेणे छोटया छोटया हॉटेलमालकांना देखील इतके सोपे झालेले आहे की, आता कोणालाही सहजपणे दारु उपलब्ध होऊ शकते व त्यामुळे रोडवर होणा-या ॲक्सीडंट्सचे प्रमाण वाढलेले आहे. शासन हे सर्व जर महसूल वाढविण्याच्या दृष्टीने करीत असेल तर ते बरोबर नाही, असे मला वाटते. या विषयावर लवकरात लवकर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मी आपल्याला विनंती करतो, अन्यथा वेगळया माध्यमातून मला सदर विषय सभागृहामध्ये चर्चेला आणावा लागेल.

श्री.अरविंद सावंत : या विषयावर जर लवकर निर्णय झाला नाही तर हायवे ला आता ट्रॉमा सेंटर देखील बांधावे लागतील.

श्री.सिध्दराम म्हेत्रे : याच्याबाबत काय करता येईल याचा लवकरात लवकर शासन निर्णय घेईल.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रवीशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम, आदिवासी विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी बी.ओ.टी. तत्वावर शासकीय जागांचा विकास करावा, अशी सूचना केलेली आहे. एम.एम.आर.डी.ए.ला याबाबत सूचना देऊन लवकरात लवकर काम मार्गी लावावे, असे सांगण्यात आलेले आहे.

तसेच, त्यांनी देवनार व मानखुर्द येथील बाल सुधार गृहासंदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात महिला व बाल विकास विभागाकडे सूचना करुन हा मुद्दा मार्गी लावण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी भिक्षागृह, चेंबूर येथील स्वच्छतेच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. या भिक्षागृहातील कामाचे निरीक्षण करुन योग्य ती कार्यवाही केली जाईल.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र.43 ते 54 या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2006-07 च्या महसूल विभागाच्या पूरक मागण्यांवर सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत, त्या सूचना निश्चितपणे विचारात घेण्यात येतील.

सन्माननीय सदस्य डॉ.एम.ए.अझिज यांनी वक्फ बोर्डाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे. कर्नाटक, उत्तर प्रदेश, हरियाणा या राज्यांकडून वक्फ बोर्डाला निधी उपलब्ध करुन दिला जातो. परंतु महाराष्ट्र राज्यात वक्फ बोर्डाला निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. तरी या राज्यातील वक्फ बोर्डाला निधी उपलब्ध करुन दिला जावा, अशा प्रकारची सूचना त्यांनी केलेली आहे. यासंदर्भात कायद्यातील तरतूद तपासून घेतली जाईल आणि निश्चितपणे वित्त विभागाशी चर्चा करुन वक्फ बोर्डाला निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही केली जाईल, असे मी आजच्या चर्चेच्या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, महसूल विभागाच्या बाब क्र.17 ते 21 या 3074.77 लाखाच्या मागण्या आहेत. सभागृहाने या मागण्या मंजूर कराव्यात, अशी माझी सभागृहाला विनंती आहे

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात (कृषी, जलसंधारण, खार जमीन मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी व्यक्तिगत संगणक म्हणजे काय, असा मुद्दा उपस्थित केला. याबाबत मी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबांना सांगू इच्छितो की, शासनाच्या वर्ग 1 व वर्ग 2 च्या अधिका-यांनाच बिगर व्याजी संगणक देण्याची योजना लागू होती. परंतु जुलै, 2006 पासून वर्ग 3 च्या कर्मचा-यांना सुद्धा ही योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेमध्ये संगणक खरेदी करण्यासाठी 20 हजार रुपये अग्रिम दिला जातो. 50 हप्त्यांमध्ये त्याची परतफेड करावयाची आहे. संगणक साक्षरता वाढावी आणि शासकीय कामामध्ये अधिका-यांची जास्त मदत व्हावी, यासाठी ही योजना लागू करण्यात आली आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, अधिकारी, कर्मचा-यांना संगणक देण्यास हरकत नाही. अधिका-यांना बिगर व्याजी पैसे देऊन संगणक देणे ही चांगली गोष्ट आहे. परंतु तसा उल्लेख या बाबीमध्ये करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, कृषी व जलसंधारण विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी आपले मत व्यक्त केले आहे. 2 कोटी 8 लाख रुपयांची मागणी यापूर्वी मंजूर झालेली आहे. त्यांनी असे सांगितले की, तेथील काम व्यवस्थित होत नसून चुकीच्या पध्दतीने होत आहे. कणकवली येथे मस्टरसंबंधीच्या तक्रारी आहेत हे त्यांनी मांडले आहे अशा तक्रारींची जिल्हाधिकाऱ्यांकडून पूर्णपणे तपासणी केली जाईल. सभागृहाने कृषी व जलसंधारण विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, बाब क्रमांक 91, 92 सार्वजनिक आरोग्य विभागासंबंधी आहे. सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे, डॉ.दीपक सावंत, श्री.परशुराम उपरकर यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भात सूचना केल्या आहेत. हिवताप अधिकारी डॉ.विजय मोडक यांची चौकशी करुन त्यांच्यावर योग्य ती कारवाई केलेली आहे. त्याबद्दल करण्यात आलेली कारवाई व निर्णय संबंधितांना कळविण्यात येईल. डॉ.दीपक सावंत यांनी उल्लेख केलेला आहे की, बाब क्रमांक 99 मध्ये सरबत साठी 12 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु याबाबत मी सांगू इच्छिते की, आदिवासी विभागाकडून सार्वजनिक आरोग्य विभागाला ही रक्कम दिली गेलेली नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आदिवासी विभागाचे मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी काल सभागृहात सांगितले आहे की, याबाबत त्यांच्या विभागाचा संबंध नाही, सार्वजनिक आरोग्य खात्याने सरबत खरेदी केलेले आहे. अशा प्रकारची चुकीची माहिती सभागृहात देण्यात येत असेल तर आम्हाला माननीय मंत्र्यांविरुध्द हक्कभंगाची सूचना सभागृहात मांडावी लागेल.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने मी स्पष्ट करु इच्छिते की, महिला व बाल कल्याण विभागाला सरबतासाठी 12 कोटी रुपये दिले गेले आहेत. आदिवासी विभागाकडून आमच्या विभागातील नवसंजीवनी प्रकल्पासाठी पाच कोटी रुपये अनुदान दिले जाते. मातृत्व योजनेसाठी ग्रेड 3 व 4 या कार्यक्रमांतर्गत 400 रुपये रोखीने अनुदान दिले जाते. आदिवासी विभागाकडून मिळालेली वरील रक्कम चार टप्प्यात खर्च करीत आहोत. या अनुदानामधून औषधे, डिस्पोजेबल सामग्री, डिलीव्हरी किट, प्रोटीन सिरप, कॅल्शीअम वगैरे खरेदी करण्यात येते. आदिवासी विभागाने आमच्या विभागाकडे 12 रुपये वर्ग केलेले नाहीत हे मी सांगू इच्छिते.

(गोंधळ)

तालिका सभापती : काल पुरवणी मागण्यांवर चर्चा होती. त्यावेळी आदिवासी विभागाचे मंत्री डॉ.विजयकुमार गावीत यांनी जे सांगितले ते ही रेकॉर्डवर आलेले आहे आणि माननीय मंत्री डॉ.विमल मुंदडा सांगत आहेत ते ही रेकॉर्डवर येत आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, सन्माननीय मंत्र्यांना उत्तराचे भाषण पूर्ण करु द्यावे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले आहे की, प्राथमिक आरोग्य केंद्राकडे तसेच ग्रामीण रुग्णालयाकडे वाहने उपलब्ध नाहीत, याबाबत मी त्यांना सांगू इच्छिते की, आता नवीन वाहने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. त्यामुळे आता आरोग्यासंबंधीच्या सोयी सुविधा रुग्णांना उपलब्ध होणार आहेत. श्री.परशुराम उपरकर यांनी जी सूचना केलेली आहे, त्यासंबंधी कार्यवाही केली जाईल. सभागृहाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पूरक मागण्या मान्य कराव्यात अशा प्रकारची विनंती करते.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, काल हा 12 कोटी रूपयांच्या सरबताचा विषय येथे आला होता तेव्हा आपणच तालिका सभापती म्हणून सभापती आसनावर होता. तेव्हा आपणच याबाबत आम्ही काय करावयाचे ते सांगावे.

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, काल सभागृहामध्ये जेव्हा हा विषय उपस्थित झाला होता तेव्हा मीच सभापती आसनावर होतो. पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये बाब क्र.99 च्या संदर्भात त्यावेळी माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.गावित यांनी सांगितले की, आमच्या आदिवासी कल्याण विभागाकडे अनेक खात्यांकडून मागणी होत असते आणि त्याप्रमाणे या सरबतासाठी 12 कोटीची मागणी आरोग्य विभागाकडून करण्यात आली होती त्याप्रमाणे आम्ही त्यांना हे पैसे दिलेले आहेत. त्याप्रमाणे रक्कम काल पुरवणी मागण्यांद्वारा मंजूर केली गेलेली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ही मागणी नेमकी कोणत्या विभागाची आहे, कोणत्या विभागाकडे हे पैसे आलेले आहेत आणि कोणत्या विभागाने ते खर्च केले आहेत याची माहिती सभागृहाला मिळत नाही तर मग आम्ही येथे या पुरवणी मागण्या मंजूर कशा करावयाच्या ? त्यावर आम्ही मतदान कसे काय करणार ?

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्या सभागृहामध्ये मागण्यांवर मतदान आपल्याला करता येत नाही. ..

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, परंतु ही 12 कोटी रूपयांची तरतूद असलेले विनियोजन विधेयक तर आमच्यापुढे मान्यतेसाठी येईल तेव्हा आम्ही ते कसे काय मान्य करणार ? हे पैसे कोणाला मिळाले आहेत ? कोणी खर्च केले आहेत ? ही माहिती आम्हाला मिळतच नाही. तरीही ही मागणी मंजूर झाली आहे. तेव्हा विनियोजन विधेयक मान्यतेसाठी जेव्हा आमच्या समोर येईल तेव्हा त्यावर आम्ही आमचे याबाबतचे विचार मांडायचे काय ?

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या 12 कोटी बद्दल आदिवासी विभागाच्या मंत्र्यांनी आपल्याला सांगितलेच आहे की, हे पैसे त्यांच्या खात्याकडून अन्य म्हणजे आरोग्य खात्याला दिले गेलेले आहेत. तेव्हा ते पैसे खात्यातच कोठेतरी गेलेले आहेत. ते अन्य कोठेही गेलेले नाहीत. मी देखील येथे 3 टर्म्स सदस्य म्हणून राहिलो आहे. तेव्हा मला येथे कार्यपद्धतीची आपल्या इतकीच चांगली माहिती आहे. आता येथे आरोग्य मंत्र्यांनी सांगितले की, हे

..... व्हीव्ही 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती .....

पैसे माझ्या खात्याकडे आलेले नाहीत. पण आदिवासी विकास मंत्र्यांनी काल येथे सांगितले आहे की, हे पैसे त्यांच्या खात्याकडून आरोग्य विभागाला दिलेले आहेत. तेव्हा दोन्ही विभागाच्या मंत्र्यांच्या बोलण्यामध्ये ही तफावत आहे एवढीच यामध्ये अडचण आहे. आता ही अडचण कशी सोडवावयाची याचे मार्ग आपणा सर्वांनाच माहिती आहेत, त्या मार्गांचा आपण उपयोग करू शकता.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. काल येथे आदिवासी विकास विभागाच्या मंत्र्यांच्या मागण्या चर्चेला आल्या असता आम्ही हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी आदिवासी विकास विभागाची बाब क्र. 99 द्वारा 12 कोटी रूपये आदिवासी समाजाला धष्टपुष्ट करण्यासाठी, कुपोषित मुलांना सुदृढ करण्यासाठी म्हणून सरबत देण्याकरिता खर्च झालेले आहेत म्हणून ही पूरक मागणी मान्य करावी अशी विनंती आदिवासी विकास मंत्र्यांनी केली. त्यावेळी त्यांनी हेही सांगितले की, ही रक्कम खर्च करण्यासाठी आरोग्य विभागाकडे दिली गेलेली आहे आणि त्या विभागाकडूनच उद्या जेव्हा आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्या चर्चेला येतील तेव्हा याबाबत अधिक खुलासा मिळू शकेल. हा प्रश्न काल मी आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी उपस्थित केला होता. पण आता माननीय आरोग्य मंत्री देखील याबाबत अधिक माहिती देऊ शकत नाहीत. तेव्हा संबंधित दोन्ही खात्याचे मंत्री याबाबतची जबाबदारी स्वीकारणार नसतील तर मग या 12 कोटी रूपयांचा विनियोग कसा झाला ? याची माहिती आम्हाला नसताना त्यासंबंधीचे विनियोजन विधेयक आम्ही कसे काय करायचे ?

डॉ. दीपक सावंत : सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी जो हरकतीचा मुद्दा येथे उपस्थित केला आहे त्याला मी सहमती देताना काल नेमके काय घडले ते मी सांगू इच्छितो. काल जेव्हा हा मुद्दा सभागृहात उपस्थित झाला होता आणि माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी जो याबाबत खुलासा केला त्यानंतर सदस्यांच्या या विषयीच्या भावना लक्षात घेऊन आपण माननीय आरोग्य मंत्र्यांना सभागृहामध्ये बोलाविले होते. त्यानंतर आरोग्य विभागाचे राज्यमंत्री सन्माननीय श्री.रणजित कांबळे हे सभागृहामध्ये आले आणि त्यांना हा विषय कळला तेव्हा ते रागा-रागाने हातवारे करीत येथून निघून गेले. मग आम्ही याबाबत काय समजायचे ? ही 12 कोटीची मागणी कुपोषित बालकांचा प्रश्न म्हणून पोस्ट फॅक्टो मंजूर केलेली आहे. ...

..... व्हीव्ही 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, बाब क्र. 99 ही महिला व बाल कल्याण विभागाची पूरक मागणी असून ती अंगणवाडीसाठी आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाचा यामध्ये काही संबंध नाही. तसा त्यात उल्लेखही नाही.

(यानंतर श्री. सरफरे ....डब्ल्यूडब्ल्यू 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव) : हा विषय दोन मंत्र्यांच्या विभागाशी संबंधित असून तो फार महत्वाचा नाही. काल मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये सांगितले आहे की, हे पैसे आम्ही आरोग्य विभागाकडे दिले. ही वस्तुस्थिती खरी आहे व ते रेकॉर्डवर आले आहे. त्या विषयावर फार मोठी चर्चा झाली आहे. याबाबत पुन्हा पुन्हा विचारणा करण्यात आल्यानंतर हे पैसे आरोग्य विभागाकडे देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. तेव्हा या संदर्भात माननीय आदिवासी विकास मंत्र्यांना सभागृहामध्ये बोलावून घेण्यात यावे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री डॉ. विजयकुमार गावीत असे म्हणाले होते की, आमच्या विभागाकडून आतापर्यंत या सर्व पैश्यांचे काय व्हावयाचे हे कुणी विचारीत नव्हते. आता आम्ही विचारावयास सुरुवात केली आहे. त्यावेळी आम्ही या 12 कोटींचा विषय काढला तेव्हा ते मला माहीत नाही असे म्हणाले...

तालिका सभापती : त्यानंतर हे 12 कोटी रुपये निश्चितपणे कोठे गेले? यासंबंधीचे निवेदन पटलावर ठेवण्यात येईल असे माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी सांगितले. मंत्रिमहोदयांनी अशाप्रकारचे निवेदन केल्यानंतर आपण सर्वजण सभागृहामध्ये शांत झालेले आहात. त्यामुळे ती माहिती आता आपणास पटलावर मिळणार आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयासंबंधी मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले होते...

(अडथळा)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, जोपर्यंत आमचे समधान होणार नाही तोपर्यंत आम्ही मागण्या मंजूर करणार नाही.

तालिका सभापती : माननीय सदस्यांना आता त्यांच्या विचारापासून मागे जाता येणार नाही. मंत्रिमहोदयांनी माहिती पटलावर ठेवू असे म्हटल्यानंतर आपले समाधान झाले व आपण माहिती पटलावर ठेवण्यात आल्यानंतर यासंबंधी निर्णय घेऊ असे म्हटले आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री डॉ. विजयकुमार गावीत साहेबांनी काल सभागृहामध्ये जे निवेदन केले ते चुकीचे नाही. त्यांनी सांगितले की, हे पैसे आदिवासी विकास विभागाकडे वळते झाले. त्यांनी काल सांगितलेल्या माहितीप्रमाणे हे पैसे महिला व बालकल्याण विभागाकडे मागण्यात आले होते. कुपोषित बालकांना शरबत आणि ड्रॉप दिल्यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख...

त्यांचे कुपोषण दूर होईल काय? यासंबंधीची माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाकडे पत्र पाठवून विचारण्यात आली होती. त्याप्रमाणे आरोग्य विभागाने लिहून दिले की, हे ड्रॉप दिल्यामुळे कुपोषित बालकांचे कुपोषण दूर होणार आहे. त्या संदर्भातील 12 कोटी रुपये हे आदिवासी विकास विभागाकडे वळते केले गेले आहेत. त्यामुळे आता सभागृहामध्ये मागणी मंजूर झाल्यानंतर ती रक्कम रिलिज होणार आहे, त्याकरिता याठिकाणी पुरवणी मागणी केली आहे.

तालिका सभापती : ही रक्कम खर्च झाली आहे म्हणून आता आपण सभागृहामध्ये त्याकरिता मंजूरी घेत आहोत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ते ड्रॉप नसून शरबत आहे...

श्री. अरविंद सावंत : शक्तिवर्धक अर्क असलेले शरबत आहे.

तालिका सभापती : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. सरपोतदार यांनी याठिकाणी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला त्याला मी उत्तर दिले आहे. त्यामुळे माझ्या दृष्टीने हा विषय संपला आहे. माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी 12 कोटी रुपयासंबंधीची माहिती पटलावर ठेवण्याचे कबूल केले आहे. ती माहिती पटलावर ठेवण्यात आल्यानंतर माननीय सदस्यांनी त्यांच्या शंकांचे निरसन करुन घ्यावे.

(अडथळा)

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य उभे राहून बोलू लागतात.)

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण आम्हाला तांत्रिक मुद्दयामध्ये अडकवू नका...

तालिका सभापती : माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी आपले भाषण सुरु करावे.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री) : सभापती महोदय, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्या विभागाच्या बाब क्रमांक 31, 32, 33, 34 व 35 च्या संदर्भात माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत...

(अडथळा)

(यांनतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...अडथळा..

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलत असतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्हाला न्याय द्यावा.

तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव) : मी न्याय देतो. कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी माझा निर्णय दिलेला आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी उभे राहून बोलत असतात.)

तालिका सभापती : काल पूरक मागण्या मंजूर केल्या त्यामध्ये ही पूरक मागणी होती. असे असले तरी देखील सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना प्रश्न उपस्थित करण्याची संधी दिली. त्यानंतर सन्माननीय अर्थ राज्यमंत्री महोदयांनी त्यावर खुलासा केला. त्या खुलाशाने आपले समाधान झाले नाही, तरी देखील आपल्याला बोलण्याची संधी दिली. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी अधिक माहिती दिली. त्या अनुषंगाने मी काही स्टेटमेंट केले. त्यानंतर सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी पाठिंबा दिला. त्यानंतर मी माझा निर्णय दिला. कालच संबंधित खात्याच्या सन्माननीय मंत्री महोदयांनी यासंबंधातील माहिती पटलावर ठेवण्यात येईल, असे सांगितलेले आहे ते आपण सगळ्यांनी मान्य केलेले आहे. ..(अडथळा)... मंत्री महोदय, निवेदन पटलावर ठेवणार आहेत...

काही सन्माननीय सदस्य : आम्हाला हक्कभंग प्रस्ताव आणावा लागेल.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांचे हक्क शाबूत आहेत. प्रस्ताव कोणता आणायचा हा सन्माननीय सदस्याचा अधिकार आहे.

श्री.विनोद तावडे : माझा पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे.....

श्री.अरविंद सावंत : माझा पॉईन्ट ऑफ प्रोप्रायटी आहे. सभापती महोदय, मी आपल्या निर्णयाच्या संदर्भात आव्हानात्मक बोलू इच्छित नाही. मंत्री महोदय यासंबंधीचे निवेदन पटलावर ठेवणार असल्याचे आपण सांगितले. निवेदन पटलावर ठेवावयाचे असेल तर विनियोजन विधेयक पास होण्यापूर्वी ते निवेदन आले पाहिजे अन्यथा विनियोजन विधेयक कसे मंजूर करायचे ? असा आमच्यासमोर प्रश्न आहे. मंत्री महोदयांनी यासंबंधीचे निवेदन पटलावर ठेवतो असे सांगितले. ते आम्ही मान्य करतो परंतु विनियोजन विधेयकामध्ये ती पूरक मागणी असल्यामुळे विनियोजन विधेयक मंजूर करण्यापूर्वी मंत्री महोदयांना निवेदन करावयास सांगावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

तालिका सभापती : आता सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी त्यांचा पॉईंट ऑफ ऑर्डर मांडावा.

श्री.विनोद तावडे : मला हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले मनापासून आभारी आहे. माननीय आरोग्य मंत्री महोदयांच्या मदतीला अर्थ राज्यमंत्री महोदय आले. त्यांनी 12 कोटी रुपये खर्च व्हावयाचे आहेत असे सांगितले. काल आदिवासी विकास मंत्र्यांनी सांगितले की, आम्ही हे पैसे वर्ग केलेले आहेत. हे पैसे वर्ग केलेले आहेत, की ते खर्च झालेले आहेत, हे एकदा स्पष्ट करुन सांगावे. नेमकी यामधील वस्तुस्थिती काय आहे ? कारण पुरवणी मागण्या सभागृहासमोर येतात, त्या झालेल्या खर्चासंबंधी असतात. या संदर्भाने स्पष्टीकरण करावे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या बाब क्रमांक 99 मध्ये अंगणवाडीच्या मुलांना जीवनसत्वासह शक्तिवर्धक अर्क असलेले सरबत पुरविणे यासाठी पूरक मागणी करण्यात आलेली आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, राज्यातील, खर्चाच्या आधारे चालू वित्तीय वर्षामध्ये आदिवासी क्षेत्रातील कुपोषण कमी करण्यासाठी अंगणवाडीच्या मुलांना जीवनसत्वासह शक्तिवर्धक अर्क असलेले सरबत द्यावयाचे ठरविण्यात आले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी आता जे वाचून दाखविले त्यामध्ये "चालू वित्तीय वर्षामध्ये" असा उल्लेख आहे. चालू वर्ष म्हणजे कोणते वर्ष ? हे वित्तीय वर्ष 31 मार्चला संपणार आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या पूरक मागण्या मंजूर झाल्यानंतर आदिवासी विकास विभागाकडून हे 12 कोटी रुपये महिला व बालकल्याण विभागाला रिलीज होतील. हे पैसे आदिवासी विकास विभागाचे आहेत. सभागृहाने मागण्या मंजूर केल्यानंतर पैसे रिलीज होतील.

श्री. दिवाकर रावते : आपण हे कशाकरिता सांगत आहात ? आपण कशाला बाजू घेत आहात ?

डॉ. सुनील देशमुख : मी बिलकुल बाजू वगैरे घेत नाही.

श्री. दिवाकर रावते : 12 कोटी रुपयांचे सरबत आजपासून 31 तारखेपर्यंत कसे वाटणार ? सभापती महोदय, हे विधिमंडळ आहे. या ठिकाणी नाक्यावरच्या गप्पा होत नाहीत.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात)

तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव) : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.47 ते 3.57 पर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी तालिकासभापती श्री. भास्कर जाधव

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य मार्गिकेमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन 2006-2007च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतलेला आहे. शालेय शिक्षण विभागाच्या मागणी क्रमांक 31 ते 35 मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी भाग घेऊन काही सूचना केलेल्या आहेत. त्यांनी केलेल्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल. सामाजिक न्याय विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

--

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य मार्गिकेमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

तालिका सभापती : काल ठरल्याप्रमाणे निवेदन पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : तालिका सभापती महोदय, विनियोजन विधेयक सभागृहापुढे येण्यापूर्वी ती माहिती पटलावर ठेवावी असे आपण माननीय मंत्री महोदयांना निदेश द्यावेत.

तालिका सभापती : केवळ तांत्रिक बाब काढून एकच विषय पुढे नेणे इष्ट नाही. निवेदन आधी पटलावर ठेवायचे की नंतर ठेवायचे ही तांत्रिक बाब आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य मार्गिकेमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य मार्गिकेमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

श्री. बबनराव पाचपुते (वन मंत्री) : सभापती महोदय, सन 2006-2007च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेत असताना सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत आणि सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी वन विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात आपले विचार मांडले.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ SBT/ 15:55

श्री.बबनराव पाचपुते.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी अधिक खर्च कशासाठी अशी विचारणा केली आहे. वनाचे प्रमाण वाढवावयाचे असेल तर अधिक खर्चाची आवश्यकता आहे. त्यासाठीच पुरवणी मागणी सादर केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.निकोसे यांनी बांबूच्या संदर्भात उल्लेख केला. जास्तीत जास्त बांबू पुरविण्याचे काम केले जात आहे. अभयारण्यामध्ये बांबू तोडण्याचे काम बंद केले आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी वन विभागातील अस्थायी कामगारांचा प्रश्न उपस्थित केला आहे. या संदर्भात निर्णय घेतला जाईल. त्यांच्या ज्या अडचणी आहेत त्या लक्षात घेऊन त्यांना न्याय कसा देता येईल या संदर्भात

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये घोषणा देत असतात)

विचार केला जाईल. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी वृक्षतोड आणि वनामधील वणव्यांचा उल्लेख केला आहे. लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे काम सुरु आहे. खाणीच्या संदर्भात योग्य मागणी असेल तर तशी परवानगी दिली जाते. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो ही वस्तुस्थिती आहे. त्या संदर्भात योग्य ती कारवाई केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी जंगली हत्तींच्या उपद्रवामुळे नुकसान होत असल्यामुळे हत्तींचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे. लायसन्स असले तरी बंदूक दिली जात नाही असे सांगितले. हा केंद्र सरकारचा निर्णय आहे. बंदुकीचे लायसन्स असले तरी हत्तींना मारता येत नाही. या संदर्भात लवकरात लवकर केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येईल आणि योग्य पध्दतीने न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल एवढे बोलून वन विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये घोषणा देत असतात)

तालिका सभापती : सन 2006-07 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये घोषणा देत असतात)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: (पुरवणी) विनियोजन विधेयक.

मु.शी.: L.A.BILL No.XV OF 2007

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2007)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये घोषणा देत असतात)

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक-15 दिनांक 31 मार्च 2007 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये घोषणा देत असतात)

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

डॉ.दीपक सावंत : आम्हाला पोल हवे आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य पोलची मागणी करतात)

तालिका सभापती : पोल कधी मागायचा असतो? व्होटींग संदर्भात सभागृहाला आवाहन केले का? सन्माननीय सदस्य चुकीच्या वेळी पोलची मागणी करीत आहेत. मंत्रीमहोदयांना भाषण करावयाचे आहे.

श्री.मधुकर चव्हाण : मंत्रीमहोदयांनी बिल मांडल्यानंतर ते आपल्या जागेवर बसले आहेत.

तालिका सभापती : पोलची मागणी केव्हा करावी याची वेळ ठरलेली आहे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य पोलची मागणी करतात)

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आमची एवढीच मागणी आहे की, 12 कोटीच्या पुरवणी मागणीच्या संदर्भात सत्य परिस्थिती सभागृहापुढे यावी.

उपसभापती : सभागृहाची बैठक 20 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 04 मिनिटांनी 20 मिनिटांकरिता स्थगित झाली)

(नंतर कु.गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी :माननीय उपसभापती

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये 12 कोटीच्या सरबता बाबत अत्यंत विचित्र इतिहास घडलेला आहे. काल ती मागणी या सभागृहात मंजुरीकरीता मांडण्यात आली होती. त्यावेळी सन्माननीय सदस्य डॉ. दिपक सावंत यांनी विचारले की, त्या सरबताचे इंग्रिडियन्स काय होते ? यावर सन्माननीय सदस्य डॉ. सुनील देशमुख यांनी उत्तर दिले की , मी स्वत: डॉक्टर असल्याने त्यात कोणते घटक होते याची मला माहिती आहे. परंतु माझ्या खात्यातील पैसे हे इतर खात्यात घेतात आणि मला त्या पैशाचा हिशोब मात्र दिला जात नाही. हे 12 कोटी कोणाला दिले असे त्यांना विचारले गेले त्यावर त्यांनी उत्तर दिले की, हे पैसे आरोग्य खात्याला दिले गेले.

यानंतर श्री. जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

त्यांनी नंतर असे सांगितले की, हा विषय महिला व बालकल्याण विभागाच्या संदर्भात आहे. त्यामुळे मग महिला व बालकल्याण मंत्र्यांना विचारणा केली असता ते म्हणाले की, माझाही काही संबंध नाही. विश्वामित्री पावित्रा घेऊन माननीय डॉ.सुनील देशमुख यांनी सभागृहाला सांगितले पाहिजे की, नेमकी ही रक्कम कोणत्या विभागाकडे जाणार आहे ? माननीय अर्थ राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख साहेबांनी सांगितले की, सदर मागणी मान्य झाल्यानंतर पैसे खर्च होतील. अजून पर्यंत सरबतासाठीचे 12 कोटी रुपये खर्च झालेले नाहीत. त्यामुळे यासंदर्भात आम्ही प्रश्न उपस्थित केला की, मागणी मंजूर झाल्यानंतर 31 मार्च, 2007 पर्यंत खर्च करणार आहात काय? त्यावेळेस माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी सांगितले की, "हे पैसे 31 मार्चपर्यंत खर्च करण्यात येणार आहेत." त्यामुळे सभापती महोदय, आमच्यासमोर प्रश्न पडला आहे की, येत्या चार दिवसात 12 कोटी रुपये सरबतावर कसे काय खर्च करणार आहात ? ही रक्कम पुढील काळात खर्च करावयाची असती तर या खरेदीसाठी खर्च करावयाच्या रकमेची तरतूद नियमित अर्थसंकल्पात करण्यात आली असती. परंतु प्रश्न असा आहे की, या ठिकाणी माननीय अर्थमंत्र्यांनी निवेदन केले आहे की, "हे पैसे अजून खर्च झाले नाहीत, सरबतासाठीचे 12 कोटी रुपये अद्यापि खर्च झालेले नाहीत" यासंदर्भातील निवेदन रेकॉर्ड झालेले आहे. आम्ही या मुद्याच्या संदर्भात पोल मागितला असला तरी सत्ताधारी पक्ष पोल जिंकणार आहे. खरे म्हणजे पोटुशी बाईला मुलगा होणार, असे सांगून कौतुक करण्याचा जो प्रकार असतो तोच या ठिकाणी झालेला आहे. प्रश्न असा आहे की, या सदनात अशारीतीने मागणी मांडत असतांना विरोधी पक्षाच्या मुद्यांचा देखील विचार करण्याची आवश्यकता आहे. विरोधी पक्षाने काही मुद्दे उपस्थित केले तर त्याचे समाधान सत्ताधारी पक्षाने केले पाहिजे. त्यामुळे 12 कोटी रुपयांच्या सरबत खरेदीच्या संदर्भात आम्ही विचारणा केली असता माननीय अर्थमंत्री म्हणाले की, माझ्या खात्यातून इतर विभाग पैसे घेतात परंतु त्याचा कोणत्याही प्रकारचा हिशोब मला देत नाहीत, त्यामुळे मी आता हिशोब मागण्यास सुरुवात केलेली आहे. दुस-या विभागाच्या मंत्र्यांना विचारले तर ते म्हणतात याच्याशी आमचा काही संबंध नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

वित्त विभागाकडून इतर विभागांना पैसे उपलब्ध करुन दिले जात असतात. जे पैसे खर्च झालेले आहेत किंवा खर्च होणार आहेत त्यास मान्यता घेणे बरोबर आहे. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, माननीय मंत्रीमहोदयांनी सरबत खरेदीच्यासंदर्भातील पूरक मागणी मागे घेतली तर इतर पूरक मागण्या मान्य करण्यास आमची तयारी आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सरबताच्या मुद्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी विस्तृत विचार मांडलेले आहेत. या ठिकाणी जो विषय उपस्थित झालेला आहे तो पूरक मागणीच्या मुद्यामुळे उपस्थित झालेला आहे. 12 कोटी रुपयांचे सरबत खरेदीबाबत मागील अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली नव्हती. कुपोषित बालकांसाठी सरबत खरेदी केली गेली असती, रक्कम खर्च केली असती आणि त्यासाठी पूरक मागणी सभागृहाला सादर केली असती तर आम्ही समजू शकलो असतो. परंतु या ठिकाणी, या मुद्याच्या संदर्भात पूरक मागणी का करण्यात आलेली आहे हे समजत नाही. या मुद्याच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, मी निवेदन सादर करतो. परंतु या मुद्याच्या संदर्भात तीन मंत्र्यांनी तीन निवेदने केलेली आहेत, तीन विसंगत विचार मांडलेले आहेत. तीनही मंत्र्यांनी विसंगत उत्तरे दिल्यामुळे या ठिकाणी प्रश्न उपस्थित झालेला आहे. तीन प्रकारची विसंगत उत्तरे दिल्यामुळे वैचारिक गोंधळ उडालेला आहे. आता आमच्या समोर विनियोजन विधेयक येणार आहे. परंतु सरबत खरेदीसंदर्भातील मुद्दा विवादीत असल्यामुळे त्यावर मतदान घेणे कितपत योग्य आहे हे आपण ठरवावे. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, या मुद्याच्या संदर्भात शासनाने स्पष्टीकरण करावे व त्यानंतरच पुढील कामकाजास सुरुवात करावी.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, या मुद्याच्या संदर्भात मतदान घेतले जाणार नाही.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, पूरक मागण्यावर चर्चा करतांना मी मुद्दा उपस्थित केला होता की, शासन जे 12 कोटी रुपयांचे सरबत खरेदी करणार आहे त्या सरबतामध्ये कोणकोणते घटक आहेत? मी ज्यावेळेस हा मुद्दा उपस्थित केला होता त्यावेळेस आदिवासी विकासमंत्री डॉ. गावीत साहेब सुध्दा उपस्थित होते. त्यामुळे त्यांना मी विचारले की, या सरबतामध्ये कोणकोणते घटक आहेत. तेव्हा ते म्हणाले की, "माझा या बाबीशी संबंध नाही". अर्थ राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांना हा प्रश्न विचारला तेव्हा ते म्हणाले की, आम्ही फक्त विभागाला पैसे देतो. आम्ही जे पैसे देतो त्यासंदर्भात संबंधित विभाग कोणत्याही प्रकारचा हिशोब देत नाही. आता आम्ही हिशोब मागण्यास सुरुवात केलेली आहे. त्यामुळे हा विषय नेमका कोणाचा आहे, असा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागाकडे बोट दाखवले गेले.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते त्यांच्या मुद्यामध्ये एक बाब सांगायचे विसरले, ती मी सांगतो. सभागृहात पुरवणी मागण्यांच्या चर्चेच्या वेळी हा मुद्दा उपस्थित झाला त्यावेळी सभापतीस्थानी असलेल्या तालिका सभापती यांनी सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री.रणजित कांबळे यांना सभागृहात बोलावून घेतले. त्यांना या चर्चेचा विषय समजल्यानंतर त्यांनी विचित्र हातवारे करुन, माझा हा विषय नाही, असा अविर्भाव आणून ते सभागृहातून निघून गेले. नंतर सन्माननीय मंत्रिमहोदया डॉ.विमल मुंदडा सभागृहात उपस्थित झाल्या. आम्ही त्यांना ही रक्कम कशाप्रकारे खर्च करणार आहात ? असे प्रश्न विचारले असता, त्यांनी सांगितले की, माझ्या विभागाशी संबंधित हा प्रश्न नाही. कदाचित महिला व बालकल्याण विभागाशी संबंधित हा प्रश्न असेल. 12 कोटी रुपये खर्चाचा संबंध कोणत्या विभागाशी आहे हे आम्हाला जाणून घ्यावयाचे आहे. या प्रश्नाच्या संदर्भात मंत्रिमहोदयांकडून आम्हाला टोलवाटोलवीची उत्तरे मिळत आहेत. असे असताना आम्ही पूरक मागण्या कशा मान्य करायच्या ? एकतर पूरक मागण्या फार गांभीर्याने घेतल्या जात नाहीत ही शोकांतिका आहे. या पूरक मागण्यांवर मंत्रिमहोदयांची उत्तरे देखील व्यवस्थित मिळत नाहीत. आज आम्हाला त्यांच्याकडून उत्तर मिळण्याची संधी मिळाली आहे. तेव्हा आपण आम्हाला कृपया न्याय द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती महोदय, हा महाराष्ट्रातील आदिवासी भागातील कुपोषित बालकांचा प्रश्न आहे. या कुपोषित बालकांसाठी शक्तिवर्धक अर्क असलेले सरबत देण्यासाठी 12 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. हा खर्च अजून पर्यंत झालेला नाही, तेव्हा ही मागणी डिलीट करण्यात यावी. नंतरच्या अर्थसंकल्पामध्ये या मागणीचा समावेश करण्यात यावा अशी माझी मागणी आहे. आम्हाला आपल्याकडून न्यायाची अपेक्षा आहे.

उपसभापती : आता मी या संदर्भातील निर्णय देत आहे. पहिली गोष्ट म्हणजे विधानपरिषदेमध्ये पुरवणी मागण्यांवर मतदान होत नाही. सन्माननीय सदस्यांच्या या मुद्यासंदर्भात एवढेच सांगू इच्छितो की, या संदर्भात संबंधित विभागाचे मंत्री सोमवार, दिनांक 26 मार्च रोजी सभागृहात निवेदन करतील. आपण सर्वांनी माझ्यावर विश्वास ठेवावा....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये तांत्रिक मुद्यावर मतदान होत नाही हे मला माहीत आहे. या सदनामध्ये पुरवणी मागण्यांवर चर्चा होत असताना प्रत्येक बाबी संदर्भात मंत्रिमहोदयांनी समाधानकारक उत्तर देणे ही त्यांची जबाबदारी आहे. यासंबंधीचा मुद्दा काल सभागृहात उपस्थित झाल्यानंतर संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी त्यासंबंधीची माहिती घेऊन ती सभागृहापुढे ठेवणे हे त्यांचे कर्तव्य होते. सरकार जर त्यांची जबाबदारी पार पाडत नसेल तर त्याबाबत आम्हाला निषेध करावा लागेल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, अंगणवाडीतील मुलांना जीवनसत्त्वासह शक्तिवर्धक अर्क असलेले सरबत देण्यासाठी 12 कोटी रुपयांची पूरक मागणी मांडलेली आहे. हा खर्च 31 मार्च पर्यंत करावयाचा आहे. आज 24 तारीख आहे. म्हणजे फक्त सात दिवस शिल्लक आहेत. या सात दिवसांमध्ये 12 कोटी रुपयांचे शक्तिवर्धक अर्क असलेले सरबत मुलांना किती प्रमाणात देणार ? मोठ्या प्रमाणावर शक्तिवर्धक अर्क दिल्यास त्यांना हगवण लागेल, त्यांची तब्बेत बिघडेल. राज्यातील कुपोषित बालकांना शक्तिवर्धक अर्क असलेले सरबत देण्याची गरज आहे. आता जो प्रश्न निर्माण झालेला आहे, त्या संदर्भात संबंधित विभागाचे मंत्री सांगतात की, याच्याशी आमचा काही संबंध नाही. वित्त राज्यमंत्री सांगतात की, आम्ही फक्त पैसे दिलेले आहेत.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

नियम 289 अन्वये प्रश्नोतराचा तास स्थगित करण्याबाबत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्याकडे म.वि.प. नियम 289 अन्वये नियम स्थगित करण्याबाबतची सूचना दिलेली आहे. काल दिनांक 25 मार्च 2007 रोजी लातूर जिल्ह्यातील वांजरवाडी येथील शेतकरी श्री.नागनाथ आरदवाड यांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या साखर कारखान्याला वारंवार विनंती करुनही ऊस उचलला नाही म्हणून शेतातील ऊसाच्या बांधावरील चिंचेच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. हा शेतकरी 32 वर्षाचा आहे. यापूर्वी सुध्दा ऊस तोडला जात नाही म्हणून गंगापूर येथील एक तरुण शेतकरी श्री. खुदारी यांनी सुध्दा आत्महत्या केली आहे. कालपासून दोन शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. विदर्भामध्ये सुध्दा काल 8 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत इ
या शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. 2007 मध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी होत जातील असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. परंतु या तीन महिन्यात जवळपास 230 शेतकऱ्यांनी आत्म्हत्या केलेल्या आहेत. पूर्वी कापूस उत्पादक शेतकरी भरडला जात होता, आता ऊस उत्पादक शेतकरी सुध्दा आत्महत्या करायला लागले आहेत. माननीय पंतप्रधानांनी पॅकेज जाहीर केले. परंतु या पॅकेजचा कोणताही लाभ शेतकऱ्यांना मिळालेला नाही म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरु आहे. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, कामकाजपत्रिकेतील सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर ताबडतोब चर्चा घ्यावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी गेल्या आठवड्यातच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भात अत्यंत गांभीर्याने येथे विषय मांडला होता. त्यावर माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला आश्वासन दिले होते की, या संदर्भात आम्ही योग्य ती काळजी घेऊ. आपल्या निदेशामुळे माननीय सहकार मंत्र्यांना येथे निवेदन करावे लागले. त्यांनी केलेल्या निवेदनात नवीन असे काही नव्हते. सभागृहाचे कामकाज संपत असताना माननीय सहकार मंत्र्यांनी निवेदन केले. त्यांचे निवेदन ऐकून मी त्याचवेळी सांगितले होते की, या निवेदनामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत. हीच व्यथा मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत मांडली होती.

यानंतर श्री.रोझेकर.....

अशुद्धीत पत्र / शोधनासाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

माझी एकच विनंती आहे की, या गोष्टीतील सत्य सभागृहाला समजले नसल्यामुळे ही 12 कोटी रुपयांची रक्कम अशाप्रकारे मंजूर करणे, योग्य होणार नाही व यामुळे सभागृहाचा लौकिकही वाढणार नाही. 12 कोटी रुपयांची रक्कम छोटी नाही. 12 कोटी रुपयांच्या रकमेस हे सभागृह परवानगी देण्यास तयार आहे. परंतु आपण कुपोषित बालकांना द्यावयाच्या अर्काची बाब नीट समजून घ्यावी. या खरेदीस आम्ही सहकार्य करण्यास तयार आहोत. परंतु अशाप्रकारे घाईघाईने 12 कोटी रुपये मंजूर करुन घेऊ नयेत, अद्याप खरेदी झालेली नाही त्यामुळे गुटगुटीतपणाचा, आदिवासी बालकांचा, कुपोषणाचा पत्ताच नाही. आज महाराष्ट्रात 1455 कुपोषित मुले आहेत. माझी याठिकाणी माननीय आरोग्य मंत्र्यांना विनंती आहे की, 12 कोटी रुपयांचे शक्तिवर्धक अर्क आदिवासी मुलांना पाजले तर त्यांना हागवणीसारखे नवीन विकार होतील व शासनाला पुन्हा नवीन औषधे खरेदी करावी लागतील. त्यामुळे याचे मूळ व कूळ प्रथम शासनाने शोधावे व त्यानंतर पूरक मागणीस मंजूरी मागावी. सभागृहात या पूरक मागणीचे दायित्व घेण्यास कोणताही विभाग पुढे येत नाही, हे योग्य नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही बाब वाचून पाहिली तर असे दिसून येते की, आदिवासी क्षेत्रातील कुपोषण कमी करण्यासाठी अंगणवाडीच्या मुलांना जीवनसत्वासह शक्तिवर्धक अर्क असलेले सरबत द्यावयाचे ठरविण्यात आले आहे, असे यामध्ये आहे. आपण अनेकवेळा तरतूद करतो परंतु याचा अर्थ असा होत नाही की, ही सगळी तरतूद दिनांक 31 मार्चपर्यंत खर्च होते. ही ग्रामविकास विभागाची योजना आहे. अनेकवेळा आपण तरतूद करतो व सगळया नियमांचे पालन करुन नंतरच विभागाला खरेदी करावी लागते. खरेदी झाल्यानंतर केलेल्या खर्चाचे ऑडिटही होत असते. त्यामुळे 12 कोटी रुपयांचे सरबत 31 मार्चपर्यंत खरेदी केले पाहिजे व ते मुलांना पाजले पाहिजे, असा याचा अर्थ होत नाही. म्हणून माझी सभागृहाला विनंती आहे की, सदरची पूरक मागणी मान्य करावी. नियमाप्रमाणे जेवढी आवश्यक असेल तेवढीच खरेदी करण्यात येईल व तेवढीच रक्कम खर्च करण्यात येईल, उर्वरित रक्कम व्यपगत होईल.

डॉ.दीपक सावंत : परंतु, माझा प्रश्न असा आहे की, या पूरक मागणीचे पालकत्व कोणता विभाग घेणार आहे ?

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या सदनामध्ये बाब क्रमांक 99 च्या संदर्भात चर्चा झाली. ही बाब अंगणवाडी मुलांना जीवनसत्वासह शक्तिवर्धक अर्क देण्यासंदर्भातील असून त्यासाठी 12 कोटी रुपये पूरक मागणीव्दारे मागण्यात आले आहेत. महिला व बाल कल्याण विकास विभाग माझ्याकडे आहे. आताच माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे मी सदनाला आश्वासित करतो की, ही 12 कोटी रुपयांची रक्कम या विभागाने मागणी केल्याप्रमाणे पूरक मागणीत समाविष्ट करण्यात आली आहे. आदिवासी विभागाकडून ही रक्कम उपलब्ध झाली म्हणूनच पुरवणी मागण्यांद्वारे या रक्कमेचा उल्लेख आला. ....(अडथळा) सभापती महोदय, निश्चितपणे 12 कोटी रुपये मंजूर झाल्यानंतर व ही रक्कम माझ्या विभागाला प्राप्त झाल्यानंतर खर्च करण्यापूर्वी त्याचे...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी सदनाची दिशाभूल करु नये. सदनातील सर्व पक्षाच्या सदस्यांना बरोबर घेऊन जाणे ही संसदीय कार्यमंत्री म्हणून त्यांची नैतिक जबाबदारी आहे. या बाबीमध्ये कुपोषणाचा उल्लेख आहे. या बाबीमध्ये असे म्हटले आहे की, "अंगणवाडीच्या मुलांना जीवनसत्वासह शक्तिवर्धक अर्क असलेले सरबत पुरविणे--राज्यातील, खर्चाच्या आधारे चालू वित्तीय वर्षामध्ये आदिवासी क्षेत्रातील कुपोषण कमी करण्यासाठी अंगणवाडीच्या मुलांना जीवनसत्वासह शक्तिवर्धक अर्क असलेले सरबत द्यावयाचे ठरविण्यात आले आहे."

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, राज्याच्या आदिवासी भागातील कुपोषण कमी करण्याच्या दृष्टीकोनातून मी सदनाला एवढीच ग्वाही देतो की, आज मागण्या मंजूर झाल्यानंतर चार दिवसांमध्ये 12 कोटी रुपये खर्च झाले व सरबत वाटप झाले असा याचा अर्थ होत नाही. याबाबतीत निश्चितपणे नियम आहेत. ही सर्व रक्कम खर्च होईल असे मानण्याचे काहीच कारण नाही. या विभागाने ज्या पूरक मागण्या सादर केल्या आहेत, त्या सभागृहाने मंजूर कराव्यात. माननीय उपसभापतींनी जे निवेदन करण्याचा निदेश दिला आहे, त्याप्रमाणे सोमवारी निश्चितपणे निवेदन करण्यात येईल.

नंतर श्री.रोझेकर.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी या चर्चेच्या अनुषंगाने एक प्रश्न उपस्थित केला होता ज्याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले नाही. जर ही बाब एवढी तातडीची नव्हती, खर्च होणार नाही याची कल्पना होती, उर्वरित आठ दिवसांमध्ये 12 कोटी रुपये खर्च होणार नाही, याची कल्पना होती तर मग ही बाब पूरक मागण्यांव्दारा सभागृहापुढे का आणण्यात आली ? नियमित अर्थसंकल्पामध्ये या खर्चाची तरतूद का करण्यात आली नाही ? असा प्रश्न उपस्थित होतो. अशाप्रकारे पूरक मागणीच्या पद्धतीची थट्टा या शासनाने सुरु केली आहे काय ? प्रत्यक्षात रकमेचा विनियोग करीत नाही आणि मागण्या मंजूर करा म्हणून सांगत आहात. त्यावर पुन्हा कुपोषित बालकांसाठी हा अर्क नाही, असाही खुलासा मंत्री महोदय करीत आहेत. हे शासनाला शोभादायक नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, अनेकवेळा पुढच्या वर्षासाठी लागणा-या रकमेची तरतूद करण्यात येते व विभागाला जशी आवश्यकता असेल तशी खर्च करण्यात येते. या अर्काची एक्सपायरी डेट बघितली जाईल, खरेदी करतांना टेंडर मागविणे वगैरे प्रक्रिया पूर्ण केल्या जातील व नंतरच खरेदी करण्यात येईल. एक्सपायरी डेटच्या आत वापरता येईल एवढाच अर्क खरेदी करण्यात येईल व तेवढीच रक्कम खर्च करण्यात येईल, उर्वरित रक्कम लॅप्स होईल. परंतु, जर ही पूरक मागणी मंजूर झाली नाही तर या योजनेसाठी रक्कम उपलब्ध होणार नाही. गरीब मुलांसाठी ही योजना आहे. पूरक मागणी मंजूर केली तरच खरेदी करता येणार आहे. त्यामुळे सभागृहाने पूरक मागण्या मंजूर कराव्यात, अशी माझी मागणी आहे.

उपसभापती : शासनाने पूरक मागणीच्या समर्थनार्थ योग्य उत्तर सभागृहात देणे आवश्यक आहे, या विरोधी पक्षाने केलेल्या मागणीशी मी सहमत आहे. या पूरक मागणीसंबंधी शासनाने सोमवारी निवेदन करावे, असे निदेश मी अगोदरच दिलेले आहेत. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, पुरवणी मागण्या आणि विनियोजन विधेयक विधानसभेने मंजूर केलेले आहे. विधानपरिषदेला पुरवणी मागण्या मंजूरीची अधिकार नाहीत. त्यामुळे विधानपरिषदेला मागण्या मंजूरीशिवाय मागे ठेवता येणार नाहीत. असे केले तर ते संविधानाला सोडून होईल. मंत्री महोदयांनी हे कबूल केले आहे की, सोमवारी सभागृहात निवेदन करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी माझ्यावर विश्वास ठेवावा आणि विनियोजन विधेयकाला मंजूरी द्यावी.

आता विधेयक मतास टाकले जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्याबाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

उपसभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 26 मार्च, 2007 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 4 वाजून 44 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 26 मार्च, 2007 च्या दुपारी 1.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही